# 2019

# चालू घडामोडी
## अंतिम सत्य™

# YEARBOOK

**जानेवारी 2018 ते डिसेंबर 2018**


संपादक
**समाधान निमसरकार**
एम.ए. राज्यशास्त्र, एम.ए. समाजशास्त्र, एम.ए. मराठी, बी.एड्, बि.लिब

**डॉ. प्रज्ञदिप खोब्रागडे**
सहायक विक्रीकर आयुक्त


## विश्लेषक लेखक


**डॉ. एम.एस. स्वामिनाथन**
कृषी शास्त्रज्ञ, हरितक्रांतीचे जनक,
पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण,
रेमन मॅगेसेसे पुरस्कार विजेते

**पी. साईनाथ**
लेखक, पत्रकार, पद्मभूषण व
रेमन मॅगेसेसे पुरस्कार विजेते

**डॉ. फक्रुद्दिन बेन्नूर**
लेखक, विचारवंत, राज्यशास्त्राचे प्राध्यापक,
मुस्लिम मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक

**हरी नरके**
लेखक, विचारवंत, प्रसिद्ध व्याख्याते,
सदस्य-सचिव महात्मा फुले चरित्र साधने
प्रकाशन समिती

**डॉ. राम पुनियानी**
लेखक, विचारवंत, मानवाधिकार कार्यकर्ते,
इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार विजेते

**डॉ. सोपान शेंडे**
इतिहासाचे प्राध्यापक,
इतिहास विभाग प्रमुख, एस.पी. कॉलेज, पुणे


**डॉ. विवेक दोडे**
परिविक्षाधिन, उपजिल्हाधिकारी


**अभिजित राठोड**
संरक्षण पत्रकार, सदस्य YARI International
राज्यशास्त्र व राज्यव्यवस्था अभ्यासक


**दयानंद कनकदंडे**
मुक्त पत्रकार, लेखक व अनुवादक














SAIMkatta
Student's Academic Improvement Movement

2019 मधील सर्व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त

# चालू घडामोडी

## अंतिम सत्य™

# YEARBOOK 2019

SAIMkatta™
Student's Academic Improvement Movement

# चालू घडामोडी अंतिम सत्य™ YEARBOOK 2019

संपादक

**समाधान निमसरकार**
(संचालक SAIMkatta पुणे)

**डॉ. प्रज्ञदीप खोब्रागडे**
(सहायक विक्रीकर आयुक्त)

**प्रकाशक**

**SAIMkatta प्रकाशन, पुणे**

101, वसंत प्लाझा, खजिना विहिर चौक,
सदाशिव पेठ, पुणे-411030 मो. नं. 9595382922

**प्रथम आवृत्ती : 2019** **ISBN - 978-81-938526-8-2**

**किंमत 240 ₹**

**व्यवस्थापकीय टिम**

**प्रफुल्ल खोब्रागडे, बबलू वाळके, विवेक निमसरकार, स्नेहल रायपूरे, अजय कोरडे**

**मुखपृष्ठ/अंतर्गत सजावट :**

**तौसिफ सय्यद** (डिझाईन व प्रोडक्शन विभाग प्रमुख )

**मो.** 9765198409

**वितरक**

**SAIMkatta बुक डिस्ट्रीब्युटर्स, पुणे**

मो. 9595382922 / 7038666816 / 7756822787 / 8369666057

**अंतिम सत्य™**

The Name **अंतिम सत्य** (Antim Satya) is Registered under the Trade Marks Act. 1999 Registration No. 3889070

## विशेष सूचना

पुस्तकातील माहिती शक्य तितकी अद्ययावत व अचूक देण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही नजरचुकीने काही त्रुटी असल्याचे, निदर्शनास आणून दिल्यास योग्य त्या सूचनांचा पुढील आवृत्तीत अवश्य विचार करू. तसेच पुस्तक वाचताना काही समस्या निर्माण झाल्यास **9422872805** या भ्रमणध्वनी क्रमांकावर कॉल करून (रात्री 8 ते 9) प्रत्यक्ष निराकरण करू शकता. तसेच विविध संकेतस्थळ, विविध संदर्भ ग्रंथांचा उपयोग करून पुस्तकाची रचना केली आहे. तरी लेखक, प्रकाशक, विक्रेता सर्व बाबींशी सहमत असेलच असे नाही.

: SAIMkatta : SAIMkatta : @SAIMkatta : SAIMkatta




## 1 चर्चेतील विशेष घडामोडी


- मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यामध्ये 16% आरक्षण देणारे विधेयक मंजूर .................................... 10
- आठ देशांच्या 30 उपग्रहांचे प्रक्षेपण .................... 12
- इंडियन पोस्ट पेमेंटस् बँक ................................ 12
- ट्रिपल तलाक फौजदारी गुन्हा ............................ 13
- नवे शैक्षणिक धोरण ...................................... 13
- 158 वर्ष लागू असलेले कलम 497 रद्द ................ 14
- दंडसंहितेतील 377 कलम रद्द............................. 15
- आधार वैध पण सक्ती अवैध ............................ 16
- ब्रह्मपालसिंह यांना कीर्तिचक्र ............................ 17
- महाराष्ट्रात प्लॅस्टिक बंदी लागू.......................... 18
- एकात्मिक जल आराखड्यास मान्यता.................... 19
- महाराष्ट्राच्या महाधिवक्त्याला राज्यमंत्र्याचा दर्जा ......... 19
- संगीत नाटक अकादमी पुरस्कार ........................ 20
- पवन चामलिंग देशातील सर्वाधिक काळ मुख्यमंत्रीपद भूषवणारे व्यक्ती.................................20
- भारत जगातील सर्वाधिक अब्जाधीस असणारा तिसरा देश............................21
- सरोगसी विधेयकात सुधारणा ............................ 21
- अण्वस्त्रवाहू अग्नी-5 क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी ...... 22
- स्वच्छ सर्वेक्षण अहवाल - 2018...................... 23
- 15 व्या वित्त आयोगाच्या संदर्भअटी मध्ये दुरुस्ती ....... 24
- 18 वी शांघाय परिषद - 2018 ........................ 25
- राज्यात पाचव्या वित्त आयोगाची स्थापना ............... 26
- फोर्ब्सच्या प्रभावशाली व्यक्तीच्या यादीत नरेंद्र मोदी यांना स्थान .................................................. 26
- जगातील सर्वाधिक प्रदूषीत शहरांमध्ये भारतातील 14 शहरांचा समावेश................................................ 27
- उच्च शिक्षण संस्था क्रमवारी - 2018 .................. 27
- राष्ट्रकूल देशांची चोगम परीषद - 2018 ............... 28
- अनु कुमारी बेटी बचाओ, बेटी पढाओच्या ब्रॅण्ड ॲम्बेसिडर पदी नियुक्ती............................................ 29
- येडियुरपा देशातील सर्वात कमी कालावधीचे मुख्यमंत्री... 32
- राज्यसभेच्या उपाध्यक्षपदी हरिवंश ........................ 33
- पाकिस्तानचे 22 वे पंतप्रधान इम्रान खान................ 34
- मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी हरिश्चंद्र पाटील ................................................ 34
- ओबीसी आयोगाला घटनात्मक दर्जा ..................... 35


## 2 आर्थिक व कृषी घडामोडी


- स्वच्छ सर्वेक्षण - 2019 ................................ 45
- तीन मोठ्या बँकांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया सुरु...... 46
- भारत सहाव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था.................. 46
- जैव इंधन विषयक राष्ट्रीय धोरण : 2018............... 47
- नादारी आणि दिवाळखोरी संहिता (दुरुस्ती) अध्यादेश - 2018......................................48
- महाबँकेच्या अध्यक्षपदी राजीव यांची नियुक्ती............ 49
- एसबीआयच्या सीएफओ पदी प्रशांत कुमार.............. 49
- फळांचा राजा हापूसला भौगोलिक मानांकन ............. 50
- रोजगारनिर्मितीत महाराष्ट्र अव्वल ........................ 51
- युनोस्कोच्या जैवविविधता क्षेत्रात कांचनगंगाचा समावेश . 51
- कृषी जनगणना ............................................ 52
- भारतातील जैवविविधता क्षेत्रे ............................ 52
- महाराष्ट्र अर्थसंकल्प 2018-19......................... 53
- केंद्रीय अर्थसंकल्प - 2018-19 ........................ 60
- मुंबई 12 वे सर्वात श्रीमंत शहर ......................... 65




## 3 सामाजिक व राजकीय घडामोडी


- पंधरा वर्षातील पहिला अविश्वास ठराव ................ 71
- सर्वोच्च न्यायालयात प्रथमच तीन महिला न्यायाधीश ..... 71
- स्कॉट मॉरिसन ऑस्ट्रेलियाचे नवनियुक्त पंतप्रधान ........ 72
- जगातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या अभिनेत्यांमध्ये अक्षय कुमार................................................ 72
- संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेच्या सदस्यपदासाठी भारताची निवड ........................................ 72
- मुकेश अंबानी 11व्या वर्षी सर्वाधिक भारतीय श्रीमंत .... 73
- सॉरिडॉनसह 328 गोळ्यांवर बंदी ...................... 73
- कावेरी जलव्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना........... 74
- भारत राज्य वन अहवाल – 2017 ........................ 74
- वन अहवालात महाराष्ट्र ................................. 76
- प्रजासत्ताक दिन संचलनाचे प्रमुख पाहुणे................. 76
- पेसा कायदा ............................................ 77
- मुंबईत मराठीचे पहिले विद्यापीठ......................... 78
- जगातील सर्वात स्वस्त शहरे............................. 78
- शिवरायांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या चित्ररथाला प्रथक क्रमांक.................................................. 79
- भारतातील विविध साहित्य संमेलने....................... 79
- अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन.................... 80
- विश्व मराठी साहित्य संमेलन............................ 80
- भारतीय विज्ञान कॉंग्रेस – 2018........................ 80
- कुंभमेळा जागतिक सांस्कृतिक वारसा जतन ............. 81


## 4 विज्ञान व तंत्रज्ञान घडामोडी


- पुण्यातील औंधमध्ये बिम्सटेक देशांचा युद्ध सराव........ 87
- 2022 मध्ये गगनयानाचे प्रक्षेपण ...................... 88
- 'जीसॅट-29'चे यशस्वी प्रक्षेपण ......................... 88
- समिट जगातील सर्वांत शक्तिशाली महासंगणक ........ 89
- भारतातील महासंगणक.................................. 89
- ब्राम्होस क्षेपणास्त्राची पहिली यशस्वी चाचणी............ 90
- IRNSS-II उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण .................. 90
- पीएसएलव्ही-सी 37 द्वारे एकाच उड्डाणात 104 उपग्रहाचे प्रक्षेपण ................................................ 90
- भारताला ऑस्ट्रेलियन ग्रुपचे सदस्यत्व बहाल ............ 91
- जीएसएलव्हीचे यशस्वी उड्डाण ......................... 92
- भारतीय संरक्षण दलांच्या युद्ध कसरती.................. 92
- भारतातील अणुभट्ट्या.................................. 94


## 5 विशेष चर्चेतील व्यक्तिमत्वे

**निधन वार्ता**


- अटलबिहारी वाजपेयी................................ 104
- कोफी अन्नान ....................................... 107
- व्ही.एस. नायपॉल .................................. 107
- एम करुणानिधी .................................... 108
- सोमनाथ चटर्जी .................................... 109
- अजित वाडेकर ..................................... 110
- कुलदीप नय्यर ...................................... 110





- विजय चव्हाण ........................................ 111
- दादा जे.पी. वासवानी................................ 111
- यशवंत देव .......................................... 112
- दादाजी खोब्रागडे.................................... 113
- यमुनाबाई वाईकर .................................... 113
- जिव्या सोमा मशे .................................... 113
- स्टीफन हॉकिंग....................................... 114
- श्रीदेवी................................................ 115
- कविता महाजन ...................................... 115


**चर्चेतील व्यक्ती**


- रंजन गोगोई .......................................... 116
- गीता गोपीनाथ........................................ 117
- कमलेश व्यास ........................................ 117
- एम. के. जैन ......................................... 118
- भानू प्रसाद शर्मा .................................... 119
- राजीव महर्षी.......................................... 119
- सुनिल अरोरा ........................................ 120
- के. के. वेणूगोपाल.................................... 121


## 6 आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक पुरस्कार


- नोबेल पुरस्कार....................................... 130
- मॅन बुकर पुरस्कार – 2018 .......................... 135
- मॅन बुकर इंटरनॅशनल पुरस्कार – 2018 .............. 136
- ऑस्कर पुरस्कार – 2018............................. 136
- रेमन मॅगसेसे पुरस्कार – 2018 ...................... 137
- ग्रॅमी पुरस्कार 2018 .................................. 138
- पुलित्झर पुरस्कार ..................................... 138
- भारतरत्न पुरस्कार..................................... 139
- पद्मविभूषण ........................................... 141
- पद्मभूषण.............................................. 141
- पद्मश्री पुरस्कार....................................... 141
- ज्ञानपीठ पुरस्कार...................................... 141
- आयफा पुरस्कार 2018................................ 142
- महाराष्ट्रभूषण पुरस्कार ................................ 142
- 65 वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार........................ 143
- दादासाहेब फाळके पुरस्कार .......................... 144
- जनस्थान पुरस्कार..................................... 145
- लता मंगेशकर पुरस्कार................................ 145
- पुण्यभूषण पुरस्कार .................................... 145
- ज्ञानोबा – तुकाराम पुरस्कार .......................... 145
- लोकमान्य टिळक पुरस्कार ............................ 145
- फिल्मफेअर अवॉर्ड मराठी – 2018 ................. 145
- विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ................... 146
- लोकमान्य टिळक राष्ट्रीय पत्र पुरस्कार – 2018....... 146
- राज्य चित्रपट पुरस्कार – 2018 ...................... 146
- राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार – 2018 ...................... 147
- राष्ट्रीय खेल प्रोत्साहन पुरस्कार– 2018 .............. 147
- आयसीसी क्रिकेट पुरस्कार – 2017.................. 148
- विस्डेन पुरस्कार – 2017 ............................ 148
- बिसीसीआय पुरस्कार 2016-17 आणि 2017-18.. 148
- सिएट पुरस्कार – 2018.............................. 149
- फर्स्ट लेडी पुरस्कार 2018............................ 149
- इतर आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक पुरस्कार........... 150




## 7 क्रिडा घडामोडी


- जागतिक बॉक्सिंग स्पर्धेत मेरी कोम सहाव्यांदा जगज्जेतेपद....................................163
- आशियाई क्रिडा स्पर्धा : 2018....................... 163
- बिसीसीआयसाठी घटनेच्या नव्या मसूद्याला मान्यता ... 165
- पृथ्वी शॉचे पदार्पणात शतक .......................... 166
- राष्ट्रीय कौशल्य स्पर्धेत महाराष्ट्राने पटकावले 9 सुवर्ण पदक..........................................167
- फिफा विश्वचषक स्पर्धा 2018 ....................... 168
- राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा – 2018........................ 169
- रणजी क्रिकेट स्पर्धा 2018 .......................... 170
- खेलो इंडिया कार्यक्रम................................ 171
- हिंद केसरी कुस्ती स्पर्धा – 2017 .................... 171
- महाराष्ट्र केसरी – 2017............................. 172
- आयसीसी एकदिवसीय क्रिकेट चॅम्पियन ट्रॉफी – 2017.................................172
- सुलतान अझलन शहा हॉकी स्पर्धा – 2017.......... 172
- आशिया हॉकी स्पर्धा – 2017 ....................... 173
- आशिया महिला हॉकी स्पर्धा – 2017 ............... 173
- 17 वर्षाखालील फिफा फुटबॉल विश्वकरंडक स्पर्धा – 2017.............................173
- विश्वचषक क्रिकेट स्पर्धा................................ 174
- T-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धा....................... 175
- ग्रँड स्लॅम टेनिस स्पर्धा – 2018...................... 175
- इंडियन प्रिमीयर क्रीडा खझड) स्पर्धा ................. 176
- शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार....................... 176


## 8 परीक्षाभिमुख्र अहवाल निर्देशांक


- मानव विकास अहवाल 2018........................ 184
- चालू आर्थिक गुंतवणूकीत कर्नाटक प्रथम ............ 185
- सुलभ जीवनमान निर्देशांक .......................... 186
- जागतिक जीवनमान स्नेही निर्देशांक ................. 187
- प्रतिस्पर्धी अर्थव्यवस्थेच्या देशांच्या यादीत भारत 58 व्या स्थानी ............................................... 187
- दहशतवाद पीडित देशांच्या यादीत भारत तिसऱ्या स्थानी....................................188
- उत्साही देशांच्या यादीत भारताचा 117 वा क्रमांक ... 188
- देशातील जगण्यायोग्य शहरांच्या यादीत पुणे ........... 189
- जगातील कल्पक शहरांच्या यादीत मुंबई देशात प्रथम 189
- संपूर्ण देशात आर्थिकदृष्ट्यामहाराष्ट्र राज्य प्रथमस्थानी ... 190
- बालमृत्यूंचे प्रमाण भारतात सर्वाधिक .................. 190
- स्वच्छता अहवालात वांद्रे देशात 7 व्या स्थानी........ 191
- इज ऑफ डुइंग बिझनेस अहवाल – 2018........... 192
- जागतिक शांतता निर्देशांकात भारत 136 व्या स्थानावर 192
- जागतिक आशा निर्देशांकात भारत 84 व्या क्रमांकावर. 192
- जागतिक वृत्तपत्र स्वातंत्र्य निर्देशांकात भारत 138 व्या स्थानी...................................193
- भ्रष्ट देशांच्या यादीत भारत 81 व्या स्थानी............. 193
- जागतिक उत्पादन निर्देशांकात भारत तिसाव्या क्रमांकावर................................194
- आनंदी देशांच्या यादीत भारत 133 व्या क्रमांकावर ... 194
- लॉजिस्टीक निर्देशांमध्ये गुजरात प्रथम ................. 195
- समावेशक विकास निर्देशांकात भारत 62 व्या स्थानावर 195
- जागतीक भूक निर्देशांकात भारत 100 व्या स्थानी..... 195
- स्त्री–पुरुष समानता निर्देशांकात भारत 108 व्या क्रमांकावर................................196
- भारतीय युवा निर्देशांक – 2017...................... 196
- जागतिक लोकशाही निर्देशांकात भारत 42 व्या स्थानी 197
- भारत नाविन्यता निर्देशांकाची घोषणा................... 198
- परिक्षाभिमुख विविध निर्देशांक व अहवाल ............ 198
- विविध मासिकामधील क्रमवारी ....................... 199



## 9 लेटेस्ट व परीक्षाभिमुख्र योजना


- आयुष्यमान भारत योजना ............................ 204
- नारळ विकास योजना ................................ 204
- राष्ट्रीय स्वराज अभियान ............................ 204
- प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना...................... 205
- प्रधानमंत्री वय वंदना योजना........................... 205
- प्रधानमंत्री मातृवंदना योजना........................... 206
- गोबर धन योजना ..................................... 206
- अटल पेंशन योजना..................................... 206
- प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना ..................... 207
- बेटी बचाओ बेटी पढाओ योजना ..................... 207
- अमृत आहार योजना.................................... 208
- स्वयंरोजगाराची मुद्रा योजना........................... 208
- आत्मसमर्पण योजना .................................... 208
- महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम.................... 209
- संसद आदर्श ग्राम योजना .............................. 209
- उज्ज्वला योजना ......................................... 210
- राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान..................... 210
- मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना...................... 210
- प्रधानमंत्री फसल विमा योजना ........................ 211
- बळीराजा चेतना अभियान.............................. 211
- महात्मा जोतिराव फुले जीवनदायी आरोग्य योजना ..... 211
- श्यामाप्रसाद मुखर्जी रुर्बन अभियान..................... 211
- पंडीत दीनदयाळ उपाध्याय उन्नत कृषी शिक्षा योजना... 212
- स्किल सखी ............................................ 212
- महापणन अभियान..................................... 212
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना............. 213
- छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना...... 213


## 10 विशेष संकिर्ण घडामोडी


- देशातील पहिल्यावाल्या घटना......................... 220
- महाराष्ट्रातील पहिल्यावाल्या घटना...................... 223
- जगातील पहिल्यावाल्या घटना......................... 224
- संस्था, संघटना व परिषदा............................. 233
- संयुक्त राष्ट्राच्या विशेष समित्या ....................... 237
- सार्क संघटना .......................................... 237
- केंद्रीय मंत्रिमंडळ...................................... 237
- राज्यमंत्रीमंडळ महाराष्ट्र सरकार ....................... 241
- राष्ट्रीय स्तरावरील उच्च पदस्य ........................ 242
- महाराष्ट्रातील उच्च पदस्थ.............................. 243
- आंतरराष्ट्रीय स्तरावरील उच्च पदस्य...................... 244
- भारतातील राज्यपाल व मुख्यमंत्री ..................... 244


## 11 परीक्षेला जाता जाता

# मनोगत






**अ**थक परिश्रमांची जिगिषा मनात बाळगून, सर्वंकष यशाची स्वप्ने उराशी कवटाळत हजारो तरुण-तरुणी स्पर्धा परीक्षांचा मार्ग स्वीकारतात, प्रारंभीच्या काळात अडखळत-चाचपडत चाललेल्या या वाटचालीत, समज-असमज, भय-आशंका याचेच मनावर गारूड असते. विद्यार्थ्यांच्या नेमक्या याच मन:स्थितीचा फायदा उठवीत बाजारू दर्जा असलेली पुस्तके, नोट्स, बाजारात भाऊगर्दी करतात. आजपर्यंत पुस्तकांमध्ये तेच ते रितीरीवाजाप्रमाणे पाठीमागील माहिती आपल्याला पुढच्या पुस्तकात मिळते; पण काहीतरी दुसऱ्यापेक्षा आगळीवेगळी माहिती देण्याचा प्रामाणिक प्रयत्न म्हणून गेल्या काही वर्षांपासून स्पर्धा परीक्षेच्या चळवळीमध्ये विविध उपक्रमांच्या माध्यमांतून कार्य करीत आहोत. हे उपक्रम राबवित असताना या उपक्रमांद्वारे लाभान्वित झालेल्या व प्रेरणा मिळालेल्या काही हितचिंतक लोकांनी या उपक्रमाला पुस्तकबद्ध करण्याच्या सूचना केल्या.

या सूचना व काही लोकांच्या सहकार्यामुळे स्पर्धा परीक्षेला उपयुक्त असे अनेक परीक्षाभिमुख अभ्यास संदर्भाची निर्मिती आजपर्यंत करण्यात आली आहे. याचाच एक भाग म्हणून **'चालू घडामोडी अंतिम सत्य इयर बुक** 2019' या पुस्तकाची रचना करण्यात आली आहे.

आज कोणतीही परीक्षा घ्या त्यामध्ये चालू घडामोडी हा अतिशय महत्त्वाचा घटक ठरला आहे. चालू घडामोडीशिवाय कोणत्याही स्पर्धा परीक्षेची तयारी होत नाही. अशी परिस्थिती गेल्या काही वर्षामध्ये निर्माण झालेली आहे. त्यामुळेच चालू घडामोडी या घटकाला स्पर्धा परीक्षेची तयारी करताना अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासक्रमातील इतर घटकांची तयारी करताना ज्या अडचणी येतात, त्यापेक्षा अधिक अडचणी चालू घडामोडी या घटकाची तयारी करताना येत असते. कारण इतर घटकाचे अभ्यासक्रम, साहित्य तयार असते. आणि थोडेसे प्रयत्न केल्यास विविध स्तरावरील पाठ्यपुस्तकामधून ही माहिती उपलब्ध होऊ शकते. पण 'चालू घडामोडी'घटकांची पाठ्यपुस्तके तयार नसल्यास आणि असली तरी काही मर्यादेपर्यंत विद्यार्थ्यांची गरज भागवू शकतात. या मर्यादेच्या पलीकडे विद्यार्थ्यांना स्वत:ला स्वत:ची तयारी करावी लागते. आता आयोगाने जास्तीत जास्त चालू घडामोडीचे प्रश्न विचारण्याची पद्धत चालू केल्यामुळे अचूकतेला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. त्या दृष्टिकोनातून विचार केल्यास चालू घडामोडी या घटकाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. सध्या चालू घडामोडी घटकावरील प्रश्न विचारण्याची पद्धत वारंवार बदलत आहे. हे नुकत्याच झालेल्या आयोगाच्या परीक्षेवरून लक्षात आले आहे. त्यामुळे चालू घडामोडी घटकाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

चालू घडामोडी घटकाचे महत्त्व लक्षात घेता आगामी होणाऱ्या महिला व बालविकास, राज्यसेवा, PSI, STI, ASO/ESI, संयुक्त गट-क, वन सेवा, कृषी सेवा, राज्य सेवा मुख्य परीक्षा तसेच इतर स्पर्धा परीक्षा उपयुक्त चालू घडामोडीच्या अभ्यासासाठी वर्षभरातील घटनांचा आढावा घेणारे व सोबतच त्या संबंधांने काही विश्लेषणात्मक असे लेख असणारे पुस्तक आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. SAIMkatta प्रकाशनातर्फे प्रकाशित झालेल्या आधीच्या सर्व पुस्तकाप्रमाणे याही पुस्तकाचे आपण स्वागत कराल हा विश्वास वाटतो.

दिलेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल धन्यवाद! आगामी सर्व स्पर्धा परीक्षेसाठी शुभेच्छा...!

**–समाधान निमसरकार**

# विभाग 1
# चर्चेतील विशेष घडामोडी



## मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यामध्ये 16% आरक्षण देणारे विधेयक मंजूर





- **राज्य मागासवर्गीय आयोगाच्या शिफारशीनुसार मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यामध्ये 16% आरक्षण देणारे ऐतिहासिक विधेयक 29 नोव्हेंबर 2018 रोजी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने मंजूर झाले.**
- मराठा समाजाला सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास(एसईबीसी) हा विशेष प्रवर्ग तयार करून स्वतंत्र आरक्षण देण्यात आले असून मराठा समाजातील उन्नत व प्रगत गटातील (क्रिमिलेअर) व्यक्तींना या आरक्षणाचा लाभ मिळणार नाही.
- या विधेयकाला राज्यपालाची मंजूरी मिळतात महाराष्ट्रात मराठा आरक्षण लागू होईल.
- आरक्षणाच्या मागणीसाठी एकवटलेल्या सकल मराठा समाजाने लाखोंच्या संख्येने 58 मोर्चे काढले होते. तसेच आरक्षणासाठी सुरू झालेल्या या आंदोलनात जवळपास 42 मराठा तरूणांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले.
- राज्य सरकारने राज्य मागासवर्ग आयोगाकडून मराठा आरक्षणसंबंधी अहवाल मागितला होता. 15 नोव्हेंबर 2018 रोजी आयोगाने अनुकूल अहवाल दिल्याने मराठा आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला होता.
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अहवालावर कृती अहवालाबरोबरच विधानसभा विधानपरिषदेत विधेयक मांडले. हे विधेयक चर्चेविना मंजूर व्हावे म्हणून सत्ताधारी पक्षाकडून आधीपासून पर्यंत सुरू होते.
- त्यानुसार विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे नेते अजित पवार आणि शेकापचे गटनेता गणपतराव देशमुख यांनी विधेयकाला पाठिंबा देत विधेयकाला एकमताने मंजूर करण्यास पाठिंबा दिला.



### महाराष्ट्रात सध्याची आरक्षणाची स्थिती

- आता मराठा समाजास आरक्षण घोषित केल्यामुळे त्यांची 30 टक्के लोकसंख्या आरक्षणाखाली आली असून, सर्व आरक्षित वर्गाची आकडेवारी लक्षात घेता राज्यातील 85 टक्के जनता आरक्षणाखाली येणार आहे.




| | |
|---|---|
| **अनुसुचित जमाती** (ST) 7% | **अनुसुचित जाती** (SC) 13% |
| **ओबीसी** 11% | **भटक्या जमाती** (NT) 11% |

**विशेष मागासवर्ग** (SBC) 02%

### मागास आयोगाच्या शिफारशी :

- माजी न्यायमूर्ती एम. जी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालील मागासवर्ग आयोगाने मराठा समाज सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्याचा निर्वाळा दिला असून राज्यातील सेवांमध्ये या समाजाचे प्रतिनिधित्व अपर्याप्त असल्याचे म्हटले आहे.
- मागासवर्ग आयोगाचे सदस्य म्हणून डॉ. एस.बी. निमसे, माजी सेवानिवृत्त अधिकारी सुधीर ठाकरे, डॉ. पी.जी, येवले, हो. सुवर्णा रावल, प्रा. सी. बी. देशपांडे, डॉ. डी.डी. बाळसराफ, प्रा. बी.व्ही.

कर्डिले, आर.व्ही. जाधव, डॉ. आर. एन. करपे यांनी काम पाहिले, तर डी.डी. देशमुख हे सदस्य सचिव होते. यापैकी डॉ. डी.डी. बाळसराफ यांच्यासह अन्य चार सदस्यांनी आपली वेगळी भूमिका मांडणारे स्वतंत्र अहवान दिले आहेत.



- नागरिकांच्या मराठा वर्गास, नागरिकांचा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) म्हणून घोषित करण्यात येत आहे आणि त्याचे राज्यातील सेवांमध्ये अपर्याप्त प्रतिनिधित्व आहे.
- नागरिकांचा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग घोषित करण्यात आलेला नागरिकांचा मराठा वर्ग, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 15 (4) व 16 (4) मध्ये समाविष्ट केलेले आरक्षणाचे लाभ व फायदे मिळण्यास हक्कदार आहे.
- नागरिकांच्या मराठा वर्गास नागरिकांच्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग म्हणून घोषित केल्यावर निर्माण झालेली असामान्य परिस्थिती व असाधारण स्थिती आणि त्यांच्या आरक्षणाच्या लाभाचे परिणामस्वरुप हक्क विचारात घेता, शासनास, राज्यात उद्भवलेल्या परिस्थितीचे निवारण करण्यासाठी घटनात्मक तरतुदींमध्ये उचित निर्णय घेता येईल.


- मराठा समाजास किती टक्के आरक्षण द्यावे याविषयी आयोगाने कोणतेही भाष्य केलेले नाही, मात्र सरकारने 16 टक्के आरक्षण देण्याची भूमिका घेत तसे विधेयक आणले.
- सदर अहवालातील शिफारशींवर सर्व वैधानिक कार्यवाही करण्यासाठी **22 नोव्हेंबर 2018 रोजी महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली होती. सदस्य म्हणून शिक्षणमंत्री विनोद तावडे, सार्वजनिक बांधकाममंत्री एकनाथ शिंदे, सहकारमंत्री सुभाष देशमुख, जलसंधारणमंत्री राम शिंदे, उनमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा यांचा समावेश होता. या समितीच्या एकूण 7 बैठका झाल्या.**

## आरक्षणाच्या लढाईचे टप्पे

- 1981 मध्ये मराठा महासंघाचे अध्यक्ष आण्णासाहेब पाटील यांनी मराठा समाजाची शिक्षण व नोकरी यामध्ये होत असलेली पीछेहाट लक्षात घेऊन मराठा समाजाच्या आरक्षणाची भूमिका मांडली.
- 22 मार्च 1982 ला अण्णासाहेब पाटील यांनी मुंबईत भव्य मोर्चा काढून मराठा आरक्षणासह 11 मागण्या मांडून शासनाचे लक्ष वेधले. एक लाख लोकांचा हा भव्य मोर्चा होता.
- 1989 मध्ये आण्णासाहेब पाटील यांच्या प्रयत्नांचेच फलित म्हणून कुणबींचा समावेश इतर मागासवर्गीयात (ओबीसी) झाला.
- 2004 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी मराठ्यांच्या आरक्षणासंदर्भात न्यायमूर्ती बापट आयोग नेमला. मात्र, या आयोगाने मराठ्यांना मागासवर्गीय आरक्षणाची गरज नसल्याचा अहवाल दिला.
- 2014 मध्ये मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मराठ्यांना 16 टक्के व मुस्लिमांना 5 टक्के आरक्षणाचा अध्यादेश जारी केला,
- 9 ऑगस्ट 2016 मध्ये औरंगाबाद येथे पहिला मराठा क्रांती मोर्चा निघाला. लाखोंच्या सहभागामुळे हा मोर्चा चर्चेचा विषय ठरला. यानंतर लोण राज्यभर पेटले.
- 5 डिसेंबर 2016 : मराठा मोर्चाचे तिव्रता लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने मुंबई उच्च न्यायालयात आरक्षणासंदर्भात प्रतिज्ञापत्र दाखल केले, घटनात्मकदृष्ट्या आरक्षण देता येईल, असे सांगितले.
- 4 जानेवारी 2017 : राज्य सरकारकडून आठ सदस्यीय राज्य मागासवर्गीय आयोगाची स्थापना.
- 9 ऑगस्ट 2017 : मुंबई येथे 'ऑगस्ट क्रांतिदिनी 58 वा भव्य मराठा क्रांती मूक मोर्चा काढण्यात आला.
- 23 जुलै 2018 : औरंगाबादमध्ये काकासाहेब शिंदे या तरुणाने गोदावरी नदीत मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केल्यानंतर राज्यात सर्वत्र हिंसेचे लोण पसरले, अनेक शहरात तरुणांनी आत्महत्या केल्या.
- 1 ऑगस्ट 2018 : राज्य सरकारने मराठा समाज मागासवर्गीय असल्याचे पुरावे जमा टण्यासाठी समिती नेमली.
- 18 नोव्हेंबर 2098 : राज्य सरकारने राज्य मागासवर्गीय आयोगाचा अहवाल स्वीकारला.
- 29 नोव्हेंबर 2018 मराठा समाजाला 16 टक्के आरक्षण देणारे विधेयक मंजूर झाले.



## आठ देशांच्या 30 उपग्रहांचे प्रक्षेपण



- **भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) आपल्या पोलर सॅटेलाइट लाँच व्हेईकल (पीएसएलव्ही) सी 43 च्या मदतीने आठ देशांचे 30 उपग्रह 23 नोव्हेंबर 2018 रोजी अवकाशात प्रक्षेपित केले.**
- या 30 पैकी 23 उपग्रह अमेरिकेचे असून त्यासोबत भारताचा हायपरस्पेक्ट्रल इमेजिंग सॅटेलाईट (हायसिस) देखील अवकाशात झेपावणार आहे. पीएसएलव्हीचे हे 45 वे प्रक्षेपण आहे तर गेल्या महिन्यातील आंध्रप्रदेशातील श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून प्रक्षेपण करण्यात आले.
- पीएसएलव्ही सी-43 मोहिमेच हा प्राथमिक उपग्रह आहे. हा उपग्रह सूर्याच्या कक्षेत 97.957 अंशांमध्ये फिरणार असून तो 5 वर्षे कार्यरत राहील, विद्युतचुंबकीय वर्णपटाच्या (इलेक्ट्रोमॅग्नेटिक स्पेक्ट्रम) अवरक्त (इन्फ्रारेड) क्षेत्रानजिकच्या पृथ्वीच्या पृष्ठभागाचा अभ्यास करणे हा त्याचा प्राथमिक उद्देश आहे.
- या उपग्रहासह अवकाशात झेपावणाच्या 30 विदेशी उपग्रहांपैकी ऍक मायक्रो, तर 29 नॅनो उपग्रह आहेत.
- अमेरिकेसह कॅनडा, ऑस्ट्रेलिया, फिनलँड, मलेशिया, नेदरलँड आणि स्पेन या आठ देशांचे हे उपग्रह असतील.

### निरीक्षक उपग्रह म्हणजे काय?




- हायपर स्पेक्ट्रल इमेजिंग सॅटेलाइट असे या उपग्रहाचे नाव
- भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनकडून विकसित
- उपग्रहाचा कार्यरत कालावधी पाच वर्षे
- वजन 30 किलो
- हा उपग्रह पृथ्वीपासून 636 किलोमीटरवर चौरस्थिर कक्षेत स्थिर होणार पृथ्वीभोवतालच्या विद्युतचुंबकीय आवरणातील पृष्ठभागाचा इन्न रेड आणि शॉर्ट वेव्ह इन्फ्रारेड किरणांच्या साह्याने अभ्यास करणार.
- या आठ विविध देशांचे एक लघु (मायक्रो ) आणि 29 अतिलघु (नॅनो) उपग्रह.
- हे उपग्रह पृथ्वीपासून 504 किलोमीटरच्या कक्षेत सोडले जाणार.

## इंडियन पोस्ट पेमेंटस् बँक




- **देशातील टपाल जाळ्याला बळकटी देणाऱ्या आणि या टपाल जाळ्याचा वापर करून सर्वसामान्यांच्या दारात वित्तीय सेवा पोहोचवत बचतीला चालना देणाच्या 'इंडियन पोस्ट पेमेन्टस बँकेचे (आयपीपीबी) पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्घाटन केले.**
- विशेष म्हणजे या बँकची स्थापना 17 ऑगस्ट 2016 रोजीच झाली होती. 30 जानेवारी 2017 रोजी प्रायोगिक तत्त्वावर या बँकेच्या रायपूर आणि रांची येथील दोन शाखांचे उद्घाटनही झाले होते. त्यामुळे याआधीच प्रत्यक्षात आलेली ही योजना आता देशाच्या सर्व जिल्ह्यात पंतप्रधानांच्या हस्ते कार्यान्वित झाली आहे.
- टपाल कार्यालयांचे जाळे आणि जवळपास तीन लाख पोस्टमन आणि ग्रामीण टपाल सेवकांच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकांच्या दारात बँकिंग सेवा त्याद्वारे पोहोचविण्यात येणार आहे.
- आयपीपीबी ही अन्य कोणत्याही बँकेप्रमाणेच आहे. मात्र या बँकेची कार्यकक्षा छोट्या प्रमाणावरील आणि कोणतीही पतजोखीम नसलेली आहे.
- या बँकेत अनामत ठेवी स्वीकारण्यात येणार आहेत, मात्र ही बँक अग्रिम कर्ज अथवा क्रेडिट कार्ड देणार नाही.
- दळणवळणमंत्री मनोज

### अर्थकारणाला चालना

- संपूर्ण सरकारी मालकीच्या या बँकेची सेवा 650 शाखांमध्ये उपलब्ध झाली आहे. मात्र देशातील सर्व एक लाख 75 हजार टपाल कार्यालयांत या बँकची सेवा उपलब्ध होण्यास डिसेंबर 2018 पर्यंतचा अवधी लागणार आहे, यातील एक लाख 30 हजार शाखा या ग्रामीण भागात आहेत. देशातील टपाल कार्यालयांची ही संख्या देशातील बँक जाळ्याच्या अडीचपट असल्याने ही बँक म्हणजे नागरी आणि ग्रामीण अर्थकारणाला चालना देणारी ठरणार आहे.

सिन्हा यांनी सांगितले की, 650 शाखा आणि 3250 संपर्कांद्वारे आयपीपीबीची सेवा देशभर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कोणत्याही खात्यामध्ये एक लाख रुपयांहून अधिक रक्कम भरल्यास त्याचे आपोआप टपाल कार्यालय बचत खात्यामध्ये रूपांतर होणार आहे.

## टपाल बँकेची वैशिष्ट्ये

- आयपीपीबी 100 टक्के सरकारी आणि टपाल खात्याच्या अखत्यारित स्थापन.
- एअरटेल आणि पेटीएमनंतर पेमेन्ट बँक म्हणून परवाना लाभलेली तिसरी सेवा.
- तब्बल 900 हून अधिक देयकांचा भरणा आणि आर्थिक व्यवहार पार पाहण्याची सोय.
- बचत आणि चालू खात्यांची सेवा उपलब्ध.
- निधी हस्तांतरण, लाभार्थी अनुदान हस्तांतरण, गॅस, दूरध्वनी, वीज आदी देयकांचा भरणा, सेवामूल्यांचा भरणा, एटीएम आणि डेबिट कार्ड, नेटबँकिंग आदी सेवा उपलब्ध.
- खाते उघडण्यासाठी आधारचा वापर, तर वैधता, व्यवहार आणि पैसे भरण्यासाठी बायोमेट्रिक यंत्रणेचा वापर.
- खात्यात किमान ठेवीची अट नाही.
- कमाल ठेवीची मर्यादा एक लाख रुपयांपर्यंतच.
- त्यापुढील ठेवी या थेट टपाल कार्यालय बचत खात्यात जमा होणार.
- बचत खात्यावर चार टक्के व्याजदर.
- मायक्रो एटीएम, मोबाइल बँकिंग ॲप, संदेश आदींद्वारे सेवा.

## ट्रिपल तलाक फौजदारी गुन्हा



- **मुस्लिम पुरुषाने 'तलाक' हा शब्द तीनदा उच्चारून पतीला घटस्फोट देणे (तलाक–ए–बिद्दत) हा फौजदारी गुन्हा ठरविणाऱ्या वटहुकमास केंद्रीय मंत्रिमंडळाने 19 सप्टेंबर 2018 रोजी मंजुरी दिली.**

- राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर हा कायदा लागू होईल. त्यानुसार 'ट्रिपल तलाक' देणाऱ्या पतीला तीन वर्षांचा कारावास व दंडाची शिक्षा होऊ शकेल.
- सर्वोच्च न्यायालयाने ट्रिपल तलाक' घटनाबाह्य ठरवूनही देशात असे अन्याय्य तलाक देण्याच्या 201 घटना घडल्या आहेत. त्यामुळे मुस्लिम स्त्रियांना न्याय देण्यासाठी अपरिहार्यता म्हणून सरकारला वटहुकमाचा मार्ग नाईलाजाने स्वीकारावा लागला, असे केंद्रीय विधी व न्यायमंत्री रविशंकर प्रसाद यांनी सांगितले.
- प्रसाद म्हणाले, की हाच कायदा संसदेत मंजूर करून घेण्यासाठी गेल्या 10 महिन्यांत सरकारने सर्व प्रयल केले. विरोधकांच्या चिंतांचा आदर करून सरकारने मूळ विधेयकात तीन महत्त्वाच्या दुरुस्त्याही केल्या.

## काही ठळक तरतुदी



- ट्रिपल तलाक अवैध. त्याने वैवाहिक संबंध संपुष्टात येणार नाहीत.
- दखलपात्र व जामीनपात्र फौजदारी गुन्हा फक्त कोर्टातूनच जामीन मिळेल.
- तलाक दिलेली पत्नी किंवा तिच्या कुटुंबातील व्यक्तीची फिर्याद करू शकेल.
- गुन्हा सिद्ध झाल्यास पतीला तीन वर्षे कैद व दंड.
- पत्नीला स्वत: व मुलांसाठी पोटगी व मुलांचा ताबा मागण्याचा हक्क.
- दाखल झालेली फिर्याद उभयपक्षी तडजोडी मार्गेही घेता येईल.
- ही प्रकरणे दंडाधिकारी न्यायालयात चालतील.

## नवे शैक्षणिक धोरण



- विद्यार्थ्यांवरील शैक्षणिक ओझे कमी व्हावे आणि खेळाला अधिक वेळ मिळावा, असे उद्दिष्ट्य ठेवून नवे शैक्षणिक धोरण

आखण्यात येत आहे. या धोरणाचा मसुदा तयार झाला असून, 31 ऑक्टोबर 2018 रोजी केंद्र सरकारकडे सादर केला.

- इस्रोचे माजी प्रमुख के, कस्तुरीरंगन यांच्या नेतृत्वाखालील एका समितीकडून नव्या शैक्षणिक धोरणाचा मसुदा तयार करण्यात येत आहे.
- समितीला 24 जून 2017पासून चार वेळा मुदतवाढ मिळाली.
- माजी मंत्रिमंडळ सचिव टीएसआर सुब्रह्मण्यम समितीने 2016 च्या मे महिन्यात सरकारसमोर एक अहवाल सादर केला. या अहवालात शिक्षण क्षेत्राला बळ देण्याची गरज नमूद करण्यात आली होती.
- सुब्रह्मण्यम समितीच्या अहवालानंतरही आणखी विचारविनीमय करण्याची आवश्यकता असल्याचे सांगून सरकारने कस्तुरीरंगन समितीची स्थापना केली.
- सध्या अंमलबाजवणी होत असलेले शैणिक धोरण हे 1986 मध्ये अस्तित्वात आले आणि 1992 मध्ये या धोरणाची पुनर्माडणी करण्यात आली.
- कस्तुरीरंगन समितीकडून मनुष्यबळ मंत्रालयाकडे अंतिम मसुदा सादर होणार. मंत्रालय स्तरावर त्याचा अभ्यास झाल्यावर तो संसदेसमोर मंजुरीसाठी सादर केला जाणार,
- नवे शैक्षणिक धोरण 2020 ते 2040 हा काळ डोळ्यासमोर ठेवून निश्चित करण्यात येणार आहे.

## नव्या धोरणाचा भर



- बहुनियंत्रक पद्धती रद्द करणार.
- मुलींचे शिक्षण आणि सार्वजनिक संस्थांची बळकटी.
- पारंपरिक ज्ञानाचे पुनरुज्जीवन : संस्कृत, हिंदी, वैदिक अभ्यास; तसेच योग व आयुर्वेदासारख्या प्राचीन ज्ञानाचा अभ्यास. शालेय स्तरावर भाषा, खेळ आणि गणिताच्या अभ्यासावर भर. विद्याथ्यावरील भर कमी होण्यासाठी शालेय अभ्यासक्रमाची फेररचना

## 158 वर्ष लागू असलेले कलम 497 रद्द

- **पुरुषाने दुसऱ्याच्या पत्नीशी लैंगिक संबंध ठेवणे हा फौजदारी गुन्हा ठरवून त्यासाठी फक्त त्या पुरुषालाच पाच वर्षांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद असलेले भारतीय दंड विधानातील कलम 497 सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाह्य व अवैध रद्द केले.**
- या ऐतिहासिक निर्णयामुळे गेली 158 वर्षे फौजदारी न्यायव्यवस्थेत असलेला व्यभिचाराचा गुन्हा संपुष्टात आला आहे.



- सरन्यायाधीश दीपक मिश्रा, न्या, रोहिंग्टन नरिमन, न्या. अजय खानविलकर, न्या. धनंजय चंद्रचूड व न्या. इंदू मल्होत्रा योच्या घटनापीठाने हा ऐतिहासिक निकाल दिला.
- **कलम 497 सोबतच दंड प्रक्रिया संहितेमधील कलम 198 (1) व (2) हेही घटनाबाह्य ठरवून रद्द केले. केरळमधील अनिवासी भारतीय जोसेफ शाइन यांच्या जनहित याचिकेवर हा निकाल दिला गेला.**
- निकाल एकमताने असला, तरी त्यासाठी एकूण 468 पानांची चार निकालपत्रे लिहिली गेला. सरन्यायाधीशांनी स्वतः च त्या. खानविलकर यांच्यासाठी 58 पानांचे मुख्य निकालपत्र लिहिले.

## काय होता नेमका कायदा?

- भादंवि कलम 497 : पुरुषाने दुसऱ्याच्या विवाहित पत्नीशी, तिच्या पतीच्या संमतीविना लैंगिक संबंध ठेवणे हा बलात्कार नसला तरी तो व्यभिचाराचा गुन्हा असेल व त्यासाठी पाच वर्षांची कैद किंवा आणि दंडाची शिक्षा होईल, अशा घटनेत ज्या पनीशी लैंगिक संबंध ठेवले जातील ती या गुन्ह्यातील साथीदार मानली जाणार नाही.
- दंड प्रक्रिया संहिता कलम 198 : भादंवि कलम 199 या व्यभिचाराच्या गुन्ह्यात ज्या विवाहित पतीशी लैंगिक संबंध ठेवलेले असतील, तिचा फक्त पतीच बाधित व्यक्ती मानले जाईल आणि यासंबंधीची फिर्याद फक्त त्यालाच दाखल करता येईल.

| व्यभिचार हा गुन्हा असणारे देश | व्यभिचार हा गुन्हा नसणारे देश |
|---|---|
| अफगाणिस्तान, बांग्लादेश, इंडोनेशिया, इराण, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान, फिलिपाइन्स, संयुक्त अरब अमिरात, अल्जेरिया, डेमोक्रेटिक रिपब्लिक ऑफ कांगो, इजिप्त, मोरोक्को, नायजेरियाचा काही भाग, अमेरिकेतील काही राज्ये. | जपान, ब्राझील, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, स्कॉटलँड, नेदरलँड, डेन्मार्क, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, रिपब्लिक ऑफ आयर्लंड, बार्बाडोस, बडा, जमैका, त्रिनिदाद आणि टोबॅगो, सेशेल्स, दक्षिण कोरिया, ग्वाटेमाला. |

## दंडसंहितेतील 377 कलम रद्द




- **दंडसंहितेतील कलम 377 मधील, दोन प्रौढ व्यक्तींमधील सहमतीने झालेल्या समलैंगिक संबंधांना गुन्हा ठरवणारा अनुच्छेद सर्वोच्च न्यायालयाने 6 सप्टेंबर 2018 रोजी रद्दबातल ठरवला.**
- सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय खंडपीठाने एकमताने हा ऐतिहासिक निर्णय दिला आहे. गेली 158 वर्षे या अनुच्छेदाच्या आधारे समलैंगिक संबंध ठेवणाऱ्या व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबीयांना जो मनस्ताप, अन्याय आणि सामाजिक अवमानाचे भय सोसावे लागले त्याबद्दल आणि हा निर्णय देण्यात न्याययंत्रणेने घेतलेल्या दीर्घ वेळाबद्दल आम्ही दिलगीर आहोत, असे खंडपीठातील न्या. इंदू मल्होत्रा यांनी निकालपत्रात म्हटले आहे.
- **सरन्यायाधीश मिश्रा यांच्यासह न्या. धनंजय चंद्रचूड, न्या. इंदू मल्होत्रा, न्या. आर. एफ. नरिमन, न्या. अजय खानविलकर यांचा या खंडपीठात समावेश होता.** निर्णय एकमताने झाला असला तरी, न्या चंद्रचूड, न्या मल्होत्रा आणि न्या. नरीमन या तिघांनी स्वतंत्र निकालपत्रे लिहिली आहेत.
- हा ऐतिहासिक निकाल देताना खंडपीठाने मानवी लैंगिकता, घटनादत्त व्यक्तिस्वातंत्र्य आणि अत्यंत खासगी अशा प्रेमभावनेच्या पोषणाचा अधिकार, याचा तात्विक आणि शुद्ध तार्किक मागोवाही घेतला आहे.
- कलम 377 मधील हा अनुच्छेद व्यक्तीच्या खासगीपणाच्या हक्काचा संकोच करून त्याला गुन्हेगार ठरवण्याचे सोपे हत्यार म्हणून वापरला गेला, असे न्या. चंद्रचूड यांनी नमूद केले आहे.
- लैंगिकतेच्या विराट पटलावर समलैंगिकतेची भावना ही अत्यंत नैसर्गिक असू शकते, याचीच बहुसंख्यकांनी उपेक्षा केली. त्यामुळे समलैंगिक व्यक्तिंना भयगंडाव ओझे शिरी घेऊन जगावे लागत होते, असे न्या. मल्होत्रा यांनी आपल्या 50 पानी स्वतंत्र निकालपत्रात नमूद केले आहे.
- समलैंगिक तसेच तृतीयपंथी समुदायातील लोकांना देशातील इतर नागरिकांच्या बरोबरीने हक्क आहेत, असा निर्वाळा घटनापीठाने एकमताने दिला.

### काय म्हणते न्यायालय?

- दोन प्रौढांमधील उभयपक्षी संमतीने ठेवलेल्या खासगी लैंगिक संबंधांना गुन्हा ठरविणारी भारतीय दंड संहितेतील कलम 377मधील तरतूद राज्यघटनेच्या कलम 14, 15, 19 आणि 21चे उल्लंघन करणारी आहे.
- हे संबंध पूर्णपणे उभयपक्षी संमतीने असले पाहिजेत. बळजबरी वा अपहरणाद्वारे ठेवलेले संबंध हा गुन्हाच आहे.
- समलिंगी संबंधांना अटकाव करणारी ही तरतूद घटनेने दिलेल्या समानतेच्या आणि प्रतिष्ठेने जगण्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करणारी आहे.
- 377 कलम समाजातील चाकोरीबद्धतेचे निदर्शक आहे.
- एखाद्या (खासगी) गोष्टीला परवानगी द्यायची की नाही, हे सरकार लोकांना सांगू शकत नाही; तसेच त्यावरून त्यांचा छळही करू शकत नाही.
- एखाद्या व्यक्तीने प्राणी व लहान मुलांशी अनैसर्गिक कृत्य करणे हा मात्र गुन्हाच आहे.
- समलैंगिकता ही मानसिक विकृती नसून ती पूर्णपणे नैसर्गिक अवस्था आहे.
- हा निकाल पूर्वीच्या प्रकरणांत लागू होणार नाही. मात्र, सध्या विविध न्यायालयांत सुरू असलेल्या खटल्यांसाठी तो लागू राहील.

**समलिंगी विवाह मान्य असणारे देश**

| | | | |
|---|---|---|---|
| अर्जेंटिना | 2009 | न्यूझीलंड | 2013 |
| ऑस्ट्रेलिया | 2017 | इंग्लंड/ वेल्स | 2013 |
| आयलंड | 2015 | नॉर्वे | 2008 |
| बेल्जियम | 2003 | फिनलंड | 2015 |
| के लक्झेमबर्ग | 2014 | पोर्तुगाल | 2010 |
| ब्राझील | 2013 | फ्रान्स | 2013 |
| माल्टा | 2017 | स्कॉटलंड | 2014 |
| कॅनडा | 2005 | जर्मनी | 2017 |
| उरूग्वे | 2013 | दक्षिण आफ्रिका | 2006 |
| कोलंबिया | 2016 | ग्रीनलँड | 2015 |
| नेदरलँड | 2000 | स्पेन | 2005 |
| डेन्मार्क | 2012 | आईसलँड | 2010 |
| स्वीडन | 2009 | अमेरिका | 2015 |
| काहीअंशी मान्यता : मेक्सिको | | 2009 | |

## समलिंगी संदर्भातील महत्त्वाची माहिती

- **भारतीय दंड संहिती (आयपीसी) मान्यता :** 1 ऑक्टोबर 1960 (लॉर्ड मेकाले)
- **समलैंगिक संबंध गुन्हा ठरविणारे प्रथम आव्हान :** 1994
- **समलैंगिक विवाहाला मान्यता देणारा पहिला देश :** नेदरलँड
- **शासकीय पदावर विराजमान पहिली समलिंगी व्यक्ती :** शबनम मौसी
- **पहिली भारतीय समलिंगी खासदार :** शबनम मौसी (2000 साली)
- **पहिली भारतीय समलिंगी प्राचार्य :** मनाली बंडोपाध्याय (वाडिया, पं.बंगाल)
- **समलिंगी धोरण जाहीर करणारे पहिले राज्य :** तामिळनाडू
- **भारतातील पहिल्या समलिंगी न्यायाधीश :** मयुरी आळवेकर व युवराज अळवणकर
- **महाराष्ट्रातील पहिला समलिंगी विवाह :** यवतमाळ (30 डिसेंबर, 2017)
- **LGBTQ** चे पूर्ण रूप : **Lesbian, Gay, Bisexual, Transgender, Queer.**

## आधार वैध पण सक्ती अवैध




- केंद्राची महत्त्वाकांक्षी योजना असलेले आधार कार्ड घटनात्मकदृष्ट्या वैध आहे, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला. मात्र, आधार कायद्यातील काही तरतुदी घटनाविरोधी असून, त्या आम्ही रद्द करीत आहोत,' असेही न्यायालयाने म्हटले आहे. त्यानुसार यापुढे बँक खाते, शाळा प्रवेश, मोबाइल कंपन्या, खासगी कंपन्या यांमध्ये आधाराची सक्ती करता येणार नाही.
- सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली न्या. धनंजय चंद्रचूड, न्या. ए. के. सिक्री, न्या. अजय खानविलकर आणि न्या. अशोक भूषण यांच्या पाच सदस्यीय खंडपीठाने 4 विरुद्ध 1 अशा बहुमताने हा निकाल दिला.
- प्राप्तिकराची विवरणपत्रे, पर्मनंट अकाउंट नंबर (पॅन) काढणे यासाठी आधार कार्ड आवश्यक असेल. मात्र, बँक खात्यांना आधार जोडणे बंधनकारक नाही; तसेच टेलिकॉम कंपन्यांनी मोबाइल जोडणीसाठी आधारची सक्ती करणे बंधनकारक नाही, असेही खंडपीठाने 1448 पानी निकालपत्रात म्हटले आहे.
- आधार कायद्यातील राष्ट्रीय सुरक्षाविषयक अपवादही न्यायालयाने रद्दबातल ठरवले. आधार क्रमांक नाही म्हणून कोणतेही बालक लाभाविना राहता कामा नये आणि सरकारने घुसखोरांना आधार कार्ड देऊ नये अशा सूचनाही न्यायालयाने दिल्या समाजातील वंचित घटकांना साथ मिळवून देण्यासाठी आधार योजना राबविण्यात आल्याचे मत न्यायालयाने नोंदवले. तसे, अधार विधयेक हे वित्त विधेयक असू शकते हेही न्यायालयाने मान्य केले.
- न्या. धनंजय चंद्रचूड यांनी आपल्या वैयक्तिक निकालपत्रात खंडपीठाच्या काही मतांशी असहमती दर्शवली.
- आधार कायदा वित्त विधेयक म्हणून मंजूर करणे चुकीचे असून, सध्याच्या स्वरूपातील हा कायदा घटनेचे उल्लंघन करणारा आहे. माहितीची सुरक्षेसाठी पुरेसे उपाय केलेले नाहीत, असे मत चंद्रचूड यांनी नोंदवले. मोदी सरकारने बहुमताअभावी राज्यसभेला टाळण्यासाठी लोकसभेत 'आधार' विधेयक अर्थ विधेयक म्हणून संमत केले होते.

## चार कलमे रद्द

- सर्वोच्च न्यायालयाने 'आधार'ची सक्ती सरकारी योजनांपुरतीच मर्यादित केली असल्याने भाजपप्रणीत एनडीए सरकारला दणका बसला आहे. न्यायालयाने आधार कायद्यातील कलम 17, कलम 33(1), कलम 32(2), कलम 47 अशी चार कलमे रद्द केली. त्यामुळे खासगी क्षेत्राला 'आधार'द्वारे वैयक्तिक माहिती मिळण्याचा अधिकार काढून घेण्यात आला आहे.
- जिल्हा न्यायालयाच्या आदेशावरून एखाद्याची वैयक्तिक माहिती गोळा करता येईल, मात्र त्यापूर्वी संबंधित व्यक्तीचे म्हणणे ऐकले जाईल. संयुक्त सचिव दर्जाच्या खालच्या सरकारी अधिकाऱ्यांना आधारद्वारे वैयक्तिक माहिती गोळा करता येणार नाही.
- आधारच्या माहितीचा गैरवापर होत असल्याची तक्रार संबंधित व्यक्तीलाही करता येणार आहे. ही चारही कलमे रद्द झाल्याने 'आधार'चा वापर फक्त सरकारी यंत्रणानांच करता येणार आहे.


### आधारशी जोडलेल्या योजना :

- गॅस सिलिंडर आणि रॉकेलवरील अनुदान.
- शेतकऱ्याचा पिकविमा
- केंद्र सरकारकडून देण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्त्या
- बिडी, लोहखनिज व चुनखडीच्या कामगारांना घर बांधण्यासाठीचे अनुदान.
- कुपोषित मुलांसाठीच्या पूरक पोषणमूल्ये कार्यक्रमासाठीचे अनुदान.
- मृदा आरोग्य कार्ड योजना आणि मृदा आरोग्य व्यवस्थापन योजना.
- जननी सुरक्षा योजना.
- महिला सबलीकरण राष्ट्रीय कार्यक्रम

### आधारशी जोडलेली कागदपत्रे :

- बँक खाते, पॅन कार्ड, रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, मोबाइल क्रमांक, गॅस सिलिंडर कार्ड, वाहन परवाना, ईपीएफ क्रमांक

## ब्रह्मपालसिंह यांना कीर्तिचक्र



- जम्मू-काश्मीरमध्ये चकमकीत वीरमरण आलेले शिपाई ब्रह्मपाल सिंह यांना कीर्तिचक्र शांततेच्या काळातील दुसऱ्या क्रमांकाचे शौर्य पदक जाहीर करण्यात आले.
- मेजर आदित्य कुमार आणि हुतात्मा रायफलमन औरंगजेब यांच्यासह 14 जणांना शौर्य चक्राने सन्मानित करण्यात आले आहे. या खेरीज सेना मेडलही जाहीर करण्यात आली.
- ब्रह्मपाल सिंह उत्तर प्रदेशातील बुलंद शहर जिल्ह्यातील शुजाना राणी गावचे रहिवासी होते. नोव्हेंबर 2017 मध्ये पुलवामा जिल्ह्यातील कंडी अलगर येथे झालेल्या चकमकीत त्यांना वीरमरण आले.
- मेजर आदित्य कुमार यांच्या नेतृत्वाखालील तुकडी शोपियाँ येथे नियुक्त होती. जवानांवर दगडफेक करणाऱ्या जमावावर लष्करी तुकडीने गोळीबार केला. त्यात तीन जण मृत्युमुखी पडले. त्यानंतर जम्मू-काश्मीर पोलिसांनी लष्करी तुकडीविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला होता.
- रायफलमन औरंगजेब हे मूळचे काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यातील रहिवासी. ते 44 राष्ट्रीय रायफल्समध्ये नियुक्त होते. ईदसाठी सुटी घेऊन घरी आले असताना दहशतवाद्यांनी त्यांचे अपहरण करून त्यांना ठार मारले. त्यांच्या मृत्युमुळे काश्मीरमध्ये दहशतवाद्यांविरोधात संतापाची लाट उसळली होती.
- आयएनएस तारिणी या शिडाच्या नौकेतून जगप्रदक्षिणा पूर्ण करणाऱ्या नौदलातील महिला अधिकाऱ्यांच्या त्यांच्या अतुलनीय धाडसाबद्दल पथकाला नौसेना मेडल जाहीर झाले आहे. या पथकात लेफ्टनंट कमांडर वर्तिका जोशी यांच्या नेतृत्वाखाली लेफ्टनंट स्वाती पतरपल्ली, ऐश्वर्या बोड्डुपती, एस. विजया देवी आणि पायल गुप्ता यांचा समावेश होता.
- स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला पोलिस शौर्य पदकांची घोषणा करण्यात आली असून, केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या दोन हुतात्मा जवानांना हे पदक देऊन सन्मानित करण्यात आले आहे. देशभरातील एकूण 942 पोलिस आणि निमलष्करी दलाच्या जवानांचा या यादीत समावेश आहे.

### किर्ती चक्र

- शिपाई ब्रह्मपाल सिंह (मरणोत्तर, 44 राष्ट्रीय रायफल्स)

### शौर्य चक्र विजेते



- रायफलमन औरंगजेब (मरणोत्तर)
- लेफ्टनंट कर्नल अर्जुन शर्मा
- मेजर पवन गौतम
- मेजर आदित्य कुमार (10 गढ़वाल रायफल्स)
- कॅप्टन कमिंदरपाल सिंह
- कॅप्टन जयेश राजेश वर्मा
- नायब सुभेदार अनिलकुमार दहिया
- नायब सुभेदार विजयकुमार यादव
- हवालदार कुल बहादुर थापा
- हवालदार जावेद अहमद भट्ट
- गनर रणजितसिंह
- रायफलमन लीलेश भाई
- रायफलमन जयप्रकाश ओरांव (मरणोत्तर)



### सेना मेडल

- मेजर नंदकिशोर दीपक खडसे (तोफखाना, 19 राष्ट्रीय रायफल्स)
- कॅप्टन सागर प्रकाश परदेशी (आर्मर्ड कोअर, 22 राष्ट्रीय रायफल्स)

### वायू सेना मेडल

- विंग कमांडर अभिषेक शर्मा
- स्क्वाड्रन लीडर व्हर्नन डेस्मंड कीन
- सार्जंट शशिधर प्रसाद

## महाराष्ट्रात प्लॅस्टिक बंदी लागू



- राज्य सरकारच्या प्लॅस्टिक बंदीच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवरील सुनावणी उच्च न्यायालयाने 20 जुलै 2018 पर्यंत तहकुब केल्याने महाराष्ट्र राज्यात 23 जून 2018 पासून प्लॅस्टिक बंदी लागू करण्यात आली आहे.
- प्लॅस्टिक बंदीची अंमलबजावणीची जबाबदारी महापालिका, नगरपालिकांचे प्रशासन, जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि तलाठी व ग्रामसेवकांवर असणार आहे.
- येत्या तीन महिन्यात राज्य प्लॅस्टिकमुक्त करण्याचा निर्धार राज्य सरकारने केला असल्याची माहिती पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी दिली आहे.
- **भारतात आतापर्यंत 17 राज्यांनी प्लॅस्टीक बंदी केली असून म हाराष्ट्र प्लॅस्टीक बंदी करणारे 18 वे राज्य ठरले आहे. तर पहिले राज्य अरुणाचल प्रदेश ठरले आहे.**

### आतापर्यंत भारतात 18 राज्यात प्लॅस्टिक बंदी लागू करण्यात आली आहे. त्यामध्ये

1. **अरुणाचल प्रदेश** (6 जिल्ह्यांत)
2. **हिमाचल प्रदेश** (सर्वत्र)
3. **चंदिगड** (सर्वत्र)
4. **राजस्थान** (सर्वत्र)
5. **हरियाणा** (सर्वत्र)
6. **गुजरात** (कच्छ व जुनागड)
7. **झारखंड** (सर्वत्र)
8. **केरळ (**सन्निधन निटवक्कल व एलमेली)
9. **मध्य प्रदेश** (सर्व पर्यटन व आध्यात्मिक क्षेत्र)
10. **मेघालय** (सर्वत्र)
11. **नागालँड** (सर्वत्र)
12. **ओरिसा** (प्रवासी थांबे)
13. **सिक्कीम** (सर्वत्र)
14. **त्रिपुरा** (सर्वत्र)
15. **उत्तर प्रदेश** (सर्वत्र)
16. **पश्चिम बंगाल** (पर्यटन जैवविविधता आणि सांस्कृतिक क्षेत्र)
17. **दिल्ली** (सर्वत्र)
18. **महाराष्ट्र** (सर्वत्र)



**दंडाचे स्वरूप**

- **पहिल्यांदा नियम मोडल्यास** 5,000 रु.
- **दुसऱ्यांदा नियम मोडल्यास** 10,000 रु.
- **तिसऱ्यांदा नियम मोडल्यास** 25,000 रु. आणि 3 महिन्याचा कारावास.
- **बंदी असलेली गुजरातमधील कच्छ व जुनागड) प्लॅस्टीक आणल्यास** तीन महिन्याची शिक्षा.

### बंदी नसलेल्या वस्तू

- उत्पादनासाठी वापरण्यात येणारे प्लॅस्टीक आणि थर्माकोल.
- कृषी क्षेत्रातील सामान साठविण्याचे प्लॅस्टीक.
- नर्सरीतील प्लॅस्टीक, दूधाच्या पिशव्या (50 मायक्रॉनच्या वर)
- कच्चा माल साठविण्यासाठी वापरात असलेले प्लॅस्टीक, रेनकोट.
- टीव्ही, फ्रीज, कॉम्प्युटर यासारख्या उत्पादनांना पॅकिंग करताना वापरण्यात येणारे थर्माकोल आणि प्लॅस्टीक.
- बिस्कीट, चिप्स आदी पदार्थांची प्लॅस्टीक आवरणे.




- **प्लॅस्टीक वस्तूवर बंदी घालणारा फ्रान्स पहिला देश ठरला आहे.**
- प्लॅस्टीक बंदीची अंमलबजावणी योग्य रीतीने झाली पाहिजे यासाठी महापालिका क्षेत्रात 'आरोग्य निरीक्षकाची' नियुक्ती करण्यात येणार आहे.
- प्लॅस्टीकच्या पाण्याच्या बाटल्या नष्ट करण्यासाठी मुंबईत 50 ठिकाणी यंत्रणा निर्माण केली आहे. याच धर्तीवर येत्या तीन महिन्यात राज्यभरात केंद्र उभारण्यात येणार आहे.

## एकात्मिक जल आराखड्यास मान्यता




- **राज्यातील महत्त्वपूर्ण अशा कृष्णा, तापी, नर्मदा, पश्चिम वाहिनी नद्या व महानदी खोऱ्याच्या एकात्मिक राज्य जल आराखड्यास 23 जून 2018 रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य जलपरीषदेच्या पाचव्या बैठकीत मान्यता देण्यात आली.**
- राज्यात गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा, पश्चिम वाहिनी नद्या व महानदी या सहा खोऱ्याचा अभ्यास करून स्वतंत्रपणे जल आराखडे तयार करण्यात आले.
- यापैकी गोदावरी खोऱ्याच्या जल आराखड्याला 30 नोव्हेंबर 2017 रोजी मान्यता देण्यात आली. उर्वरीत पाच आराखड्याचे सादरीकरण 23 जून 2018 रोजी सादरीकरण करण्यात आले.
- **नदी खोऱ्याचे आराखडे तयार करणारे महाराष्ट्र पहिलेच राज्य ठरले आहे.**

### जल आराखड्या विषयी....



- **राज्यात गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा, पश्चिम वाहिनी नद्या व महानदी या सहा खोऱ्याचा अभ्यास करून जल आराखडा तयार.**
- सहाही खोऱ्यातील नद्यांचे जल आराखडा तयार करणारे महाराष्ट्र पहिले राज्य.
- **राज्य जलपरीषदेचे गठण** – 2005
- **पहिली बैठक** – 17 जून 2015.
- जल आराखड्यात 19 प्रकरणे समाविष्ट.
- **राज्यातील सर्वात मोठे खोरे**–गोदावरी (गोदावरी **आराखड्याला मान्यता** – 30 नोव्हेंबर 2017)
- उपखोऱ्याची माहिती, मृदेची माहिती, नदी खोऱ्यांची संरचना, जलस्त्रोताचे व्यवस्थापन, पाणलोट विकास व व्यवस्थापन पाण्याचा ताळेबंद, सांडपाणी पुर्नवापर आदी बाबीचा आराखड्यामध्ये समावेश

## महाराष्ट्राच्या महाधिवक्त्याला राज्यमंत्र्याचा दर्जा



- उच्च न्यायालयासह इतर न्यायालयात राज्याची न्यायिक बाजू मांडण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या राज्याच्या महाधिवक्त्यांना राज्य सरकारने राज्यमंत्रीपदाचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे.
- सरकारच्या या निर्णयामुळे इतिहासात पहिल्यांदाच न्यायीक बाजू मांडणाऱ्या व्यक्तीला राज्यमंत्रीपदाचा दर्जा मिळाला आहे.
- **आशुतोष कुंभकोणी हे राज्यमंत्र्याचा दर्जा मिळालेले पहिले महाधिवक्ता ठरले आहे.**
- **महाधिवक्त्याला मंत्री पदाचा दर्जा देणारे महाराष्ट्र तिसरे राज्य ठरले आहे. यापूर्वी पंजाब व हरियाणा राज्याने महाधिवक्त्याला थेट कॅबीनेट मंत्र्याचा दर्जा दिला आहे.**

### राज्यमंत्री झाल्याचा महाधिवक्त्याला फायदा

- सरकारी निवासस्थान मिळेल तसेच 20 लाखापर्यंत नवी गाडी घेता येईल. न्यायालयामध्ये प्रतिनिधीत्व करण्यासाठी दरमहा मानधन मिळेल.
- राज्यभरात कुठल्याही न्यायालयात जाण्यासाठी किंवा सरकारी कार्यक्रमांना जाण्यासाठी विमानाच्या बिझनेस क्लासने प्रवास करता येईल.
- टेलीफोन बिलासाठी दरमहा 3 हजार रुपये मिळतील तसेच सरकारी कार्यक्रमात राज्यमंत्र्याच्या पंक्तीमध्ये आसन मिळेल.

### महाधिवक्ता विषयी



- **घटनात्मक कलम** – 165
- **नेमणूक** – राज्यपाल
- **कार्यकाल** – 62 वर्ष
- **मानधन** – 80 हजार रुपये
- **कार्य** – राज्याची न्यायालयात कायदेविषयी बाजू मांडणे, राज्यपाल कायदेविषयक सल्ला देणे इत्यादी. महाधिवक्ता
- **सध्याचे महाधिवक्ता** – आशुतोष कुंभकोणी

- 17 ऑगस्ट 2018 - पंतप्रधानपदाच्या निवडणुकीत खान यांनी पाकिस्तान मुस्लिम लीगचे उमेदवार शहाबाझ शरीफ यचा पराभव केला.
- 18 ऑगस्ट 2018 - पाकिस्तानचे 22 वे पंतप्रधान म्हणून इमरान खान यांचा शपथविधी.

## ओबीसी आयोगाला घटनात्मक दर्जा



- **ओबीसी आयोगाला घटनात्मक दर्जा देणारे 123 घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत मंजूर झाले. सर्व पक्षांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे 403 विरुद्ध शून्य अशा दोन तृतीयांशहून अधिक मतांनी विधेयक संमत झाले अनुसूचित जाती, जमातीच्या यादीमध्ये एखाद्या जातीचा समावेश करणे किंवा वगळणे याचे अधिकार राज्य सरकारांना या विधेयकामुळे मिळणार आहेत. यापूर्वी हे अधिकार राज्यपालांकडे होते.**
- गेल्या वर्षी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लोकसभने हे विधेयक मंजूर केले होते. परंतु पावसाळी अधिवेशनात राज्यसभेने यामध्ये दुरुस्त्या सुचवून विधेयक लोकसभेकडे परत पाठविले होते. या दुरुस्त्यांचा समावेश असलेल्या सुधारित विधेयकावरील चर्चे दरम्यान लोकसभेत चांगलीच जुगलबंदी रंगली.
- आयोगाला घटनात्मक दर्जा देण्याला सर्व पक्षांचा पाठिंबा असला, तरी विधेयकावर भूमिका मांडताना राजकीय पक्षांनी एकमेकांना लक्ष्य करण्याची संधी साधली.
- विधेयक मंजुरीच्या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देखील सभागृहात उपस्थित होते. चर्चेच्या उत्तरादाखल सामाजिक न्यायमंत्री थावरचंद गेहलोत यांनी मागासवर्गीय आयोगाला घटनात्मक दर्जा देण्याबाबत 1980 पासूनच्या मागणीचा उल्लेख करताना काँग्रेसच्या दहा वर्षाच्या सत्ताकाळात हा निर्णय झाला नसल्याचा चिमटा काढला. तसेच विधेकातील तरतुदींचीही माहिती दिली.
- राज्यसभेने सुचविलेल्या दुरुस्त्यांचा या विधेयकात समावेश करण्यात आला आहे. थावरचंद गेहलोत यांनी याबाबतची प्रक्रियाही बोलताना सांगितली. तसेच भटक्या विमुक्तांसाठी केलेल्या कामांची जंत्री मांडली. भटक्या विमुक्त जातींसाठी स्वतंत्र आयोग बनविण्यात आला होता.

## चर्चेतील विशेष घडामोडी अंतिम सत्य

### शिवसेना देशातील धनाड्य प्रादेशिक पक्ष :

- असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रीफॉर्म्स या संस्थेने केलेल्या एका सर्व्हेक्षणानुसार 2016-17 या वर्षात 29 प्रादेशिक पक्षामध्ये शिवसेना देशातील प्रादेशिक पक्षात सर्वांत धनाड्य पक्ष ठरला आहे.
- या सर्व्हेक्षणानुसार 2016-17 चा आर्थिक वर्षात ज्ञात स्रोताकडून शिवसेनेला तब्बल 25.65 कोटी रूपयांच्या देणग्या मिळाल्या आहेत. त्यात कॉर्पोरेट कंपन्यांकडून मिळालेल्या 22.77 कोटी रूपयांचा समावेश आहे.
- शिवसेनेपाठोपाठ दिल्लीतील आम आदमी पक्षाला सर्वाधिक देणग्या मिळाल्या. आम आदमी पक्षाला 24.74 कोटी रूपये मिळाले. मात्र आपच्या उत्पन्नात कॉर्पोरेट क्षेत्राचा वाटा केवळ 3.83 कोटी इतकाच आहे.
- पंजाबमधील शिरोमणी अकाली दल तिसऱ्या क्रमांकावर आहे. या पक्षाला 15.45 कोटीच्या देणग्या मिळाल्या असून कॉर्पोरेट कंपन्यांचा वाटा 14.36 कोटी इतका आहे.
- 2015-16 च्या तुलनेत शिवसेनेच्या देणग्यामध्ये 70 टक्क्यांनी घट झाली आहे. 2015-16 मध्ये शिवसेनेला 61.19 कोटी रूपयांच्या देणग्या मिळाल्या होत्या.
- शिवसेना (महाराष्ट्र) हा भारतातील एक प्रादेशिक पक्ष असून या पक्षाची स्थापना बाळासाहेब ठाकरे यांनी 19 जून 1966 रोजी केली. धनुष्यबान या पक्षाचे निवडणूक चिन्ह असून सध्या पक्षाचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे आहेत.

### मातृवंदना योजनेमध्ये सातारा जिल्हा राज्यात पहिला

- माता व बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी गर्भवती महिला व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी सुरू करण्यता आलेल्या प्रधानमंत्री मातृवंदना योजनेत सातारा जिल्हा राज्यात पहिला आला आहे.
- सातारा जिल्ह्यात एकूण 20 हजार 381 लाभार्थ्यांना 4 कोटी 73 लाख 55 हजारांच्या अनुदानाचा लाभ मिळाला आहे.
- सातारा जिल्ह्यात एकूण 76 हजार 720 अर्जाची नोंद करण्यता आली असून जिल्ह्यात 20 हजार 381 लाभार्थींना 4 कोटी 73 लाख 55 हजारांच्या अनुदानांचा लाभ देण्यात आला आहे.
- आई कामावर गेल्याने बाळाला आईचे दूध मिळत नाही. बाळाचेही पोषण होत नाही. आणि त्यातून कुपोषणाची

समस्या जन्म घेते हीच बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारने प्रधानमंत्री मातृवंदना योजना 1 जानेवारी 2017 पासून राबविण्यात सुरूवात केली.

### लोकतांत्रिक जनता दलाची स्थापना :



- जनता दलाचे नेते शरद यादव यांनी 27 एप्रिल 2018 रोजी 'लोकतांत्रिक जनता दल' या नवीन पक्षाची घोषणा केली.
- निवडणूक आयोगाकडून या पक्षाला मान्यता देण्यात आली असून या पक्षाच्या राष्ट्रीय सरचिटणीस सुशिला मोराळे राहणार आहेत.
- लोकतांत्रिक जनता दल या पक्षाच्या पहिल्या अधिवेशनाचे आयोजन 18 मे 2018 रोजी करण्यात आले होते.
- शरद यादव यांच्या गटाचा पक्ष आहे. परंतु सध्या जनता दल या पक्षाचे राज्यसभा सदस्य आहेत.
- जनता दलाची स्थापना 11 ऑक्टोबर 1988 मध्ये व्ही.पी. सिंग यांनी केली होती. सन 1989 च्या निवडणुकीत पक्षाला 142 जागा मिळाल्या आणि यांच्या पक्षाचे सरकार बनले. पण ते सरकार 11 महिन्यात संपुष्टात आले.

### महिला उद्योजकता मंचाची स्थापना :




- देशभरातील महिलांना त्यांच्यातील उद्यमशिलतेची जाणीव करून देणे, उद्योग करण्यास मदत करणे तसेच तो चालविण्यासाठी दिर्घकालीन धोरण आखण्यासाठी महिला उद्योजकता मंचाची स्थापना करण्यात आली आहे.
- निति आयोगाचे जागतिक महिला दिनाचे (8 मार्च) औचित्य साधून नवी दिल्लीमध्ये महिला उद्योजकता मंचाची स्थापना केली.
- महिला उद्योजकता मंच इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती, कर्मशक्ती या तीन आधारस्तंभावर आधारित असणार आहे.
- यासाठी सिडबी (स्थापना - 2 एप्रिल 1990), सेवा संस्था (स्थापना - 1972, संस्थापक - इला भट) तसेच नाबार्ड यासारख्या संस्था सहाय्य करणार आहेत.
- या उद्योजकता मंचाचे लक्ष आगामी काळात 5 वर्षांत 15 ते 20 हजार महिला उद्योजकता मार्फत 2 हजार कोटी गुंतवणूक व 1 लाख रोजगार उपलब्ध करून देणे आहे.
- तसेच राज्यस्तरीय महिला संचलित उद्योगांचे प्रमाण 9 टक्क्यांवरून 20 टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे लक्ष आहे.

### बस्तरला भेट देणारे रामनाथ कोविंद चौथे राष्ट्रपती



- छत्तीसगडमधील बस्तर भागाला भेट देणारे रामनाथ कोविंद हे भारताचे चौथे 2018 रोजी देशातील मध्यवर्ती असलेल्या छत्तीसगड या राज्याला भेट दिली होती.
- देशाचे पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांची 23 मार्च 1953 रोजी छत्तीसगड मधील बस्तर गावाला भेट दिली होती.
- माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम हे बस्तरला भेट देणारे दुसरे राष्ट्रपती होते. त्यांनी 4 जून 2004 मध्ये भेट दिली होती.
- प्रतिभा पाटील या बस्तरला भेट देणाऱ्या तिसऱ्या राष्ट्रपती आहेत. त्या 29 सप्टेंबर 2008 मध्ये भेट दिली होती.

### युनेस्कोच्या कार्यकारी मंडळावर प्रा.जे. एम. राजपूत यांची नियुक्ती



- भारत सरकाच्या केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने प्रा. जे. एम. राजपूत यांना युनेस्कोच्या कार्यकारी मंडळावर भारताचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यता आली आहे.
- प्रख्यात लेखक व शिक्षणतज्ज्ञ प्रा. जे. एस. राजपूत केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे संयुक्त शैक्षणिक सल्लागार म्हणून 1988-1994 या कार्यकाळात कार्य केले आहेत.
- तसेच 1999 मध्ये राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (NCERT - National Council of Education Research and Training स्थापना : 1961, मुख्यालय : नवी दिल्ली, अध्यक्ष : प्रकाश जावडेकर, संचालक : डॉ. ऋषिकेश सेनापती) चे संचालक म्हणून काम केले आहे.
- 1994 मध्ये स्थापन झालेल्या National Council of Teacher Education या संस्थेचे अध्यक्ष म्हणून कार्य केले आहे.
- त्यांना 2015 मध्ये पद्मश्री पुरस्काराने तसेच युनेस्कोच्या जॉन अमोस कॉमोनिअम पदकाने सन्मानित करण्यात आले आहे.
- युनेस्कोची (UNESCO- United Nations Educational, Scientific and Cultural Organisation) स्थापना जागतिक सहयोगाने शिक्षण, विज्ञान व संस्कृती या क्षेत्रात विकास घडवून शांतता प्रस्थापित करण्यासाठी 4 नोव्हेंबर 1946 रोजी करण्यात आली असून सध्या 195 सदस्य आहे. मुख्यालय पॅरिस (फ्रान्स) येथे आहे.

## निती आयोगाचा महत्त्वाकांक्षी जिल्हे रूपांतरण कार्यक्रम :

- अविकसित जिल्ह्याचा विकास करण्यासाठी निती आयोगाने महत्त्वाकांक्षी जिल्हे रूपांतरण कार्यक्रम सुरू केला आहे.
- या कार्यक्रमांतर्गत शिक्षण, पायाभूत सुविधा, जलसंधारण, आरोग्य, कौशल्य विकास इत्यादी निकषावर 115 जिल्ह्याची निवड करण्यात आली.
- 115 जिल्हे निवडतांना तीन गटामध्ये वर्गवारी करण्यात आली आहे. यानुसार निती आयोगाचे 30, मंत्रालयाने 50 आणि नक्षलवादाने प्रभावित 35 जिल्हे असे 115 जिल्हे निवडले आहेत.
- या कार्यक्रमांतर्गत गडचिरोली नंदूरबार, वाशिम, उस्मानाबाद या चार जिल्ह्यांची निवड करण्यता आली आहे.

## IMF चा जागतिक आर्थिक आढावा :




- आंतरराष्ट्रीय नाणे निधी (International Monetary Fund - IMF) या संस्थेने एप्रिल 2018 मध्ये जाहीर केलेल्या जागतिक आर्थिक आढावा, 2018 (World Economic Outlook, 2018) नुसार भारताचा विकास दर आर्थिक वर्ष 2018 मध्ये 7.4 आणि आर्थिक वर्ष 2019 मध्ये 7.8 टक्के राहिल.
- आशियाई विकास बँक (Asian Development Bank - ADB) या संस्थेने जाहीर केलेल्या आशियाई विकास आढाव्यानुसार भारताचा विकास दर आर्थिक वर्ष 2018 मध्ये 7.3 टक्के तर आर्थिक वर्ष 2019 मध्ये 7.6 टक्के असेल.

विकास दर (टक्केवारी)

| देश | आयएमएफ | | एडीबी | |
|---|---|---|---|---|
| | 2018 | 2019 | 2018 | 2019 |
| भारत | 7.4 | 7.8 | 7.3 | 7.6 |
| चीन | 6.6 | 6.4 | 6.6 | 6.4 |
| आशिया | -- | -- | 5 | 6.9 |
| जग | 3.6 | 3.9 | -- | -- |

## 2018 चे पावसाळी अधिवेशन नागपूर मध्ये :

- 2018 चे पावसाळी अधिवेशन नागपूर येथे पडले असून विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन मुंबईला होत असते. परंतु नागपूर करारानुसार एक अधिवेशन नागपूरला घेण्याची तरतूद करण्यात आली आहे.
- यावर्षी सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय मंत्र्याची समिती निश्चित करून ठिकाण ठरविण्यात आले.
- आतापर्यंत 1961 मध्ये, 1966 मध्ये, 1971 मध्ये आणि 2018 मध्ये राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन नागपूरला पार पडले आहे.

## पहिले बोलीभाषा संमेलन पूण्यात :

- राज्यातील पहिले बोलीभाषेचे राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती संमेलन पूण्यात 25 नोव्हेंबर 2018 रोजी आयोजित करण्यात आले होते.
- या संमलेनाचे अध्यक्षस्थान पूणे विभागाचे वनसंरक्षक रंगनाथ नाईकडे भूषविले आहे.

## झुलन गोस्वामी टी–20 तून निवृत्त :




- भारताची अनुभवी महिला क्रिकेटपटू शुलन गोस्वामीने आंतरराष्ट्रीय टी–20 क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली.
- 35 वर्षीय झुलनने 68 आंतरराष्ट्रीय टी–20 सामनन्यामध्ये 56 विकेट घेतल्या आहेत.
- झुलनने यापुढे भारताकडून केवळ वन–डे क्रिकेटमध्ये खेळण्याचा निर्णय घेतला आहे. आंतरराष्ट्रीय वन–डे क्रिकेटमध्ये झुलनच्या नावावर 169 सामन्यांत 200 विकेट जमा आहेत.

## महात्मा गांधीजींना मरणोत्तर सुवर्णपदक :



- अहिंसा व शांती या गोष्टींसाठी महात्मा गांधींनी केलेल्या महान कार्याबद्दल त्यांचा अमेरिकन काँग्रेसचे मानाचे सुवर्णपदक प्रदान करून मरणोत्तर गौरव करण्यात यावा असा प्रस्ताव हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हजच्या सहा सदस्यांनी सभागृहासमोर सादर केला आहे.
- त्यामध्ये मूळ भारतीय वंशाच्या चार सदस्यांचा समावेश आहे. कैरोलिन भलोनी, अमी बेरा, राजा कृष्णमूती, रो खन्ना, प्रमिला जयपाल तसेच भारतविषयक अमेरिकी काँग्रेसच्या समितीच्या सहअध्यक्ष तुलसी गबार्ड या सहा जणांचा हा प्रस्ताव 23 सप्टेंबर 2018 रोजी सभागृहात मांडण्यात आला.
- गबार्ड यांनी हा प्रस्ताव हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हजच्या वित्तीय सेवा व सभागृह प्रशासन समित्यांकडे पुढील कारवाईसाठी पाठविला आहे.
- अमेरिकी काँग्रेसतर्फे देण्यात येणारे सुवर्णपदक हा सर्वोच्च नागरी सन्मान मूळ अमेरिकी नागरिक वगळता आजवर मोजक्याच विदेशी नागरिकांना प्रदान करण्यात आला आहे.

## हिमा दासचे ऐतिहासिक सुवर्ण :



- भारताच्या हिमा दासने महिलांच्या 400 मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक जिंकून 20 वर्षांखालील जागतिक मैदानी अजिंक्यपद स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी केली. दखल घेण्याची बाब म्हणजे या स्पर्धेच्या **ट्रॅक ॲण्ड फील्ड स्पर्धेत सुवर्ण जिंकणारी पहिली भारतीय खेळाडू असा पराक्रमक हीमाने केला आहे.**
- महिलांच्या 400 मीटर शर्यतीत हिमा चौथ्या लेनमधून घावत होती. 18 वर्षीय हिमाने पहिले 100 मीटर पूर्ण झाल्यानंतर आघाडी घेत शेवटपर्यंत ती टिकवून 51,46 सेकंदांची वेळ नोंदवून सुवर्णपदक आपल्या नावावर केले. रोमानियाच्या आंद्रिया मिलोसने रौप्य (52.07 से.) तर अमेरिकेच्या टेलर मान्सूनने कांस्यपदक (52.28 से.) जिंकले.
- जागतिक मैदानी स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी हिमा ही दुसरी भारतीय ठरली. यापूर्वी नीरज चौपाने 2016च्या स्पर्धेत भालाफेकीमध्ये सुवर्णपदक जिंकले होते.

## प्रा. फकरुद्दीन बेन्नूर यांचे सोलापुरात निधन :



- ज्येष्ठ विचारवंत फक्रुद्दीन हजरत बेन्नूर यांचे नुकतेच निधन झाले. ते 80 वर्षांचे होते. काही दिवसांपासून ते मूत्रपिंडाच्या आजारावर उपचार घेत होते.
- मुस्लिम समाजातील अभ्यासू आणि बुद्धिवंत समाजसुधारकांमध्ये बेन्नूर यांचे नाव आदराने घेतले जाते. समाजात वाढलेला जमातवाद, वाईट रूढी-परंपरा आणि हिंदुत्ववाद इत्यादी विषयांवर त्यांनी 1968 पासून सातत्याने लिखाण केले.
- 1989 मध्ये मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची स्थापना करून मराठी साहित्य चळवळीला प्रोत्साहन दिले.
- 1992 साली त्यांनी महाराष्ट्र मुस्लिम ओबीसी संघटना स्थापन केली होती.
- प्रा. फकरुद्दीन बेन्नूर यांच्या साहित्य आणि सामाजिक योगदानाविषयी सोलापुरात त्यांचा गौरव करण्यात येणार होता. या कार्यक्रमामध्ये त्यांना मानपत्र देण्यात येणार होते. तसेच, त्यांच्या तीन पुस्तकांचे प्रकाशनही होणार होते.

## ज्येष्ठ साहित्यिक के. जे. पुरोहित यांचे निधन :



- ज्येष्ठ साहित्यिक केशव जगन्नाथ पुरोहित उर्फ शांताराम यांचे वृद्धपकाळाने नुकतेच वांद्रे येथील साहित्य सहवासातील निवासस्थानी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय 95 होते.
- के.ज.पुरोहित हे 'शांताराम' नावाने लेखन करीत. त्यांचा जन्म नागपूरला झाला. नागपूर विद्यापीठातून त्यांनी इंग्रजी विषयातून पदव्युत्तर शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी अमरावती, नागपूर, मुंबईमधील विविध महाविद्यालयांमध्ये 40 वर्षे प्राध्यापक म्हणून नोकरी केली. जोगेश्वरीच्या इस्माइल युसुफ महाविद्यालयात त्यांनी प्राचार्य म्हणून काम पाहिले.
- पुरोहित यांचे पूर्ण नाव केशव जगन्नाथ पुरोहित पण त्यांनी 'शांताराम' या टोपणनावाने लेखन केले. 1989 साली अमरावती येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले होते.
- अंधारवाट, आठवणींचा पार, उद्विग्न सरोवर, काय गाववाले, चंद्र माझा सखा, चेटूक, छळ आणि इतर गोष्टी, जमिनीवरची माणसं, ठेवणीतल्या चीजा, धर्म, मनमोर, रेलाँ रेलाँ, लाटा, शांताराम कथा, शिरवा, संत्र्यांचा बाग, संध्याराग, सावळाच रंग तुझा, हेल्गेलंडचे चांचे (अनुवाद) आदी पुरोहित यांची साहित्य संपदा आहे.
- 2013 साली राज्य सरकारचा विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

## एअर मार्शल अमित देव यांनी वायुदलाच्या महासंचालक पदाचा कार्यभार स्वीकारला :



- एअर मार्शल अमित देव व्हीएसएम, यांनी महासंचालक पदाचा कार्यभार स्वीकारला. त्यांनी डिसेंबर 1981 मध्ये राष्ट्रीय संरक्षण अकादमीतून पदवी प्राप्त केली आणि 29 डिसेंबर 1982 रोजी भारतीय वायुदलाच्या फ्लाइंग ब्रांचमध्ये त्यांची नियुक्ती झाली.
- वायू दलातल्या त्यांच्या आजवरच्या कारकीर्दीत त्यांनी विविध प्रकारची लष्करी व प्रशिक्षक विमान चालवली आहेत आणि जवळजवळ 2500 तास उड्डाण करण्याचा त्यांना अनुभव आहे. ते स्ट्रॅटेजिक आणि एअर कॉम्बॅट डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट, डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेज, कॉलेज ऑफ एयर वारफेयर आणि नॅशनल डिफेन्स कॉलेजचे विद्यार्थी आहेत.
- त्याच्या 36 वर्षांच्या उत्कृष्ट सेवेमध्ये त्यांनी वायु दलाच्या

# विभाग 2

# आर्थिक व कृषी घडामोडी






## स्वच्छ सर्वेक्षण – 2019




- स्वच्छ सर्वेक्षण 2019 मध्ये शाश्वत आणि नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग तसेच कचरामुक्त आणि हागणदारीमुक्त शहरांची प्रगती सुनिश्चित करण्यावर भर देण्यात येणार असून सुलभ जीवनमान निर्देशांकामुळे शहरांना नियोजन आणि व्यवस्थापनसंदर्भात सकारात्मक दृष्टीकोन अंगीकारण्यास प्रोत्साहन मिळेल असे गृहनिर्माण आणि शहरी कामकाज राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) हरदीप पुरी यांनी म्हटले आहे.
- पुरी यांनी नवी दिल्लीत स्वच्छ सर्वेक्षणाचा चौथा वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला. यावेळी एसबीएम ओडीएफ+ आणि एसबीएम ओडीएफ++ प्रोटोकॉल्स, वेब आधारित स्वच्छ मंच, सुलभ जीवनमान निर्देशांक आणि सुलभ जीवनमान निर्देशांक डॅशबोर्डचा प्रारंभ करण्यात आला. गृहनिर्माण आणि शहरी कामकाज मंत्रालयाचे सचिव दुर्गाशंकर मिश्रा आणि वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.
- **देशभरात 4 ते 31 जानेवारी 2019 दरम्यान सर्व शहरांमध्ये स्वच्छ सर्वेक्षण 2019 चे आयोजन केले जाणार आहे. नागरिकांच्या मोठ्या प्रमाणावर सहभागाला प्रोत्साहन देणे, कचरामुक्त आणि हागणदारीमुक्त शहरांच्या दिशेने कायमस्वरुपी उपाययोजना, ऑनलाईन प्रक्रियांद्वारे सध्याच्या प्रणालींची स्थापना, राहण्यासाठी शहरांना उत्तम ठिकाण बनवण्यासाठी एकत्रितपणे काम करण्याच्या महत्वाबाबत समाजातील सर्व घटकात जागरुकता निर्माण करणे ही या सर्वेक्षणाची ठळक वैशिष्ट्ये आहेत.**
- स्वच्छ भारत अभियानात नागरिकांचा सहभाग वाढवण्याबरोबरच स्वच्छता आणि कचरामुक्तीचे त्रयस्थ पक्षाकडून प्रमाणीकरण करण्यावर यंदाच्या स्वच्छ सर्वेक्षणाचा भर असेल. याशिवाय स्वच्छ शहरे निर्माण करण्यासाठी नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा सुधारण्याबाबत शहरांमध्ये निकोप स्पर्धेला प्रोत्साहन देण्याचा या सर्वेक्षणाचा उद्देश आहे.

## स्वच्छ सर्वेक्षण 2019 ची प्रमुख वैशिष्ट्ये



- ऑनलाईन एमआयएसच्या माध्यमातून संपूर्ण डिजिटाईज्ड सर्वेक्षणसर्वेक्षणातील प्रश्नांना एकूण 5 हजार गुण असतील.
- स्वच्छ सर्वेक्षण 2018 मध्ये 4 हजार गुण होते.‘सर्व्हिस लेव्हल प्रोग्रेम’, ‘डायरेक्ट ऑब्झर्वेशन, सिटीजन्स फिडबॅक आणि सर्टिफिकेशन’ या 4 व्यापक स्रोतांद्वारे माहिती संकलित करणारप्रमाणीकरण (कचरामुक्त शहरे आणि हागणदारीमुक्त प्रोटोकॉलसाठी स्टार मानांकन)थेट निरीक्षण – थेट निरीक्षणाद्वारे संकलित केलेली माहिती सर्वेक्षण संस्थेच्या प्रत्यक्ष निरीक्षणावर आधारित आणायला हवी.
- नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून, दूरध्वनीद्वारे, स्वच्छता स्वच्छता मंच आणि स्वच्छ सर्वेक्षण-2019 पोर्टलच्या माध्यमातून नागरिकांचा प्रतिसाद संकलित केला जाईल

### एसबीएम ओडीएफ+ आणि ओडीएफ++ प्रोटोकॉल्स :

- गृहनिर्माण आणि शहरी कामकाज मंत्रालय आता शौचालयांच्या संख्येऐवजी हागणदारीमुक्त शहरांच्या संख्येवरुन स्वच्छतेचे मूल्यमापन करत आहे.
- शहरांना ओडीएफ दर्जा देण्यासाठी कठोर निकषांचे पालन केले जात आहे. एसबीएम ओडीएफ+ प्रोटोकॉलचा भर शोचालयांच्या कायमस्वरुपी वापर करण्यावर आहे तर एसबीएम ओडीएफ++ प्रोटोकॉलचा भर कायमस्वरुपी स्वच्छतेवर आहे.
- स्वच्छ मंच-हा वेब आधारित मंच असून नागरिकांना स्वेच्छेने स्वच्छता अभियानात सहभागी होता येईल.

### सुलभ जीवनमान निर्देशांक :

- जागतिक तसेच राष्ट्रीय निकषांनुसार जीवनमानाचे मूल्यमापन करणे यामुळे शक्य होणार आहे. राहण्यायोग्य निकषांच्या आधारे शहरांना मानांकन देण्याचा निर्णय जून 2017 मध्ये घेण्यात आला होता.
- सुलभ जीवनमान निर्देशांकाच्या क्रमवारीतील 10 शहरांमध्ये महाराष्ट्रातील पुणे, नवी मुंबई, बृहन्मुंबई आणि ठाणे या चार शहरांचा समावेश आहे. तसेच स्वच्छ शहरांच्या यादीत सोलापूर, औरंगाबाद, कल्याण-डोंबिवली, नागपूर, अमरावती, नाशिक, पिंपरी-चिंचवड, वसई-विरार यांचा समावेश आहे.

## तीन मोठ्या बँकांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया सुरु

- मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि सेवा तसेच जागतिक लाभाचा दृष्टिकोन बाळगून प्रवेशाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने वित्तमंत्री अरुण जेटली, केंद्रीय मंत्री पियुष गोयल आणि निर्मला सीतारामन यांनी पर्यायी यंत्रणेची ओळख करून देण्यासाठी 17 सप्टेंबर 2018 रोजी एकत्रित भेट घेतली. भारताच्या तीन सर्वाधिक बँकांच्या विलीनीकरणाचा निर्णय त्यांनी घेतला. या **तीन बँकांमध्ये बँक ऑफ बडोदा, विजया बँक आणि देना बँकेचा समावेश आहे.**
- **विलीनीकरणाचा हा निर्णय 14. 82 लाख कोटी एकत्रित व्यापाराचे उद्दिष्ट ठेवून घेण्यात आला असून याद्वारे भारतात तिसरी सर्वाधिक मोठी बँक कार्यरत होणार आहे.**
- एकत्रित बँकेमुळे जागतिक बँकेतील स्पर्धेला आर्थिक आणि विस्तारित दृष्टिकोनातून तोंड देता येईल. नेटवर्कचे फायदे , कमी किमतीच्या ठेवी आणि तीन बँकांच्या विविध शाखा यामुळे संभाव्य विशेष सहकार्य मिळणार आहे. ग्राहक संबंधी सेवा , बाजारपेठेपर्यंत पोहोच, परिचालन कार्यक्षमता , व्यापक उत्पादन सेवा आणि त्वरित ग्राहक भेट यामध्ये वाढ होईल.

**बँकांच्या विलीनीकरणाला प्रोत्सहनासाठीचे ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे :**

- सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या सरासरीच्या (63.7% च्या ) तुलनेत प्रोव्हिजन कव्हरेज रेशो 67.5 %असून तो संथ गतीने वाढत आहे.
- निव्वळ अनुत्पादित मालमत्ता गुणोत्तर एनपीए रेशो हे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या 12.13 % च्या तुलनेत 5.71 % आहे. आणि तो कमी कमी होत आहे.
- पहिल्या तिमाहीत एकत्रित उद्योगांचा सकल अनुत्पादित मालमत्ता अर्थात ग्रॉस एनपीए 1048 कोटी रुपयांवरून घटली आहे.
- सार्वजनिक बँकांच्या सरासरी 53.92%च्या तुलनेत संयुक्त उद्योगांचे उत्पादित गुणोत्तर मूल्य (कॉस्ट टू इन्कम रेशो) 48.94 % आहे.
- एमएसएमई उद्यमीमित्र साठी विलीनीकरण झालेल्या इतर दोन बँकांची स्थिती बळकट करण्यासाठी देना बँकेद्वारे एमएसएमई क्षेत्र सशक्त करण्यावर भर देण्यात येणार आहे.
- भांडवली बाजारपेठेचे फायदे घेण्यासाठी पर्याप्त भांडवल गुणोत्तर अर्थात कॅपिटल अडिकवेसी रेशो हा सध्या नियामक दराच्या 10.875 % पेक्षा 12.25% आहे.
- सहकार्यातून विशेष मूल्य फायदा – विलीनीकरण झालेल्या बँकेला, ग्राहकाना आणि त्यांच्या शाखांना परिचालन , वितरण मूल्याचे फायदे मिळावे यासाठी मोठ्या प्रमाणावरील वितरण नेटवर्कमध्ये कपात करण्यात येणार आहे.
- जागतिक नेटवर्कद्वारे बँक ऑफ बडोद्याला बळकट करणे – विजया आणि देना बँकेच्या ग्राहकांना बँक ऑफ बडोद्याच्या जागतिक नेटवर्कचा फायदा मिळावा यासाठी प्रयत्न
- नेटवर्कच्या विलीनीकरणाद्वारे बँकिंग नेटवर्कमध्ये सुधारणा
- बँकांच्या शाखांना आणि मोठ्या नेटवर्कद्वारे उत्पादन आणि सेवांचे मोठ्या प्रमाणावर फायदे मिळावे यासाठी मूल्यवर्धित गैरबँकिंग सेवा आणि उत्पादनांची तरतूद

## भारत सहाव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था



- भारत आता जागतिक पातळीवर सहाव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झाला आहे. सहाव्या क्रमांकावरील फ्रान्स आता सातव्या क्रमांकावर गेला आहे. जागतिक बँकेने जाहीर केलेल्या नव्या आकडेवारीनुसार भारताची अर्थव्यवस्था आता 2.597 लाख कोटी डॉलरची झाली आहे. तर फ्रान्सची अर्थव्यवस्था 2.582 लाख कोटी डॉलरची झाली आहे.
- जुलै 2017 पर्यंत भारताची अर्थव्यवस्था पिछाडीवर होती. कारण त्यावेळी भारतीय अर्थव्यवस्थेवर नोटाबंदीचा नकारात्मक परिणाम झाला होता. मात्र, त्यानंतर आता भारतातील विविध क्षेत्रातील उत्पादकता वाढू लागली आहे. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडत असल्याचे या अहवालात नमून करण्यात आले आहे.
- भारताचे राष्ट्रीय उत्पन्न जरी मोठे असले तरी लोकसंख्याही प्रचंड

असल्यामुळे दरडोई उत्पन्न मात्र फारच कमी आहे. भारताची लोकसंख्या आता 1.34 अब्ज इतकी झाली आहे. मात्र, फ्रान्सची लोकसंख्या केवळ 6 कोटी 70 लाख आहे. म्हणजे भारताचे दरडोई उत्पन्न फ्रान्सच्या तब्बल 20 पट कमी आहे. गेल्या वर्षापासून भारताची मॅन्युफॅक्चरींग क्षेत्राची आणि ग्राहक वस्तू क्षेत्राची उत्पादकता वाढत आहे. भारताची अर्थव्यवस्था केवळ एका दशकात दुप्पटीने वाढली आहे. त्यामुळे भारत आता आशियायी अर्थव्यवस्थेला चांगलाच आधार ठरू लागला आहे. कारण चीनच्या अर्थव्यवस्थेचा वेग मंद होऊ लागला आहे.



## मोठ्या अर्थव्यवस्था असलेले देश

| क्र. | देश | जीडीपी |
|---|---|---|
| 1 | अमेरिका | 19.9 |
| 2 | चीन | 12.23 |
| 3 | जपान | 4.87 |
| 4 | जर्मनी | 4.87 |
| 5 | ब्रिटन | 2.62 |
| **6** | **भारत** | **2.59** |
| 7 | फ्रान्स | 2.58 |


- जागतिक नाणेनिधीने जाहीर केलेल्या अंदाजानुसार या वर्षी भारताचा विकासदर 7.4 टक्के राहणार आहे. तर पुढील वर्षी तो 7.8 टक्के होणार आहे. तर याच काळात जागतिक विकासदर 3.9 टक्के राहणार आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगवान अर्थव्यवस्थापैकी एक असणार आहे. या क्षेत्रात भारत चीनला चांगला स्पर्धक होता. मात्र आता चीनचा विकासदर भारताच्या विकासदरापेक्षा कमी होणार आहे. कारण चीनची अर्थव्यवस्था बऱ्यापैकी विकसित झाली आहे.
- आता भारत लवकरच पाचच्या क्रमांकावर असलेल्या ब्रिटनला मागे टाकणार आहे. ब्रिटनचे राष्ट्रीय उत्पन्न सध्या भारतापेक्षा थोडे जास्त म्हणजे 2.622 लाख कोटी डॉलर इतके आहे. पहिल्या क्रमांकावर अमेरिका, दुसऱ्या क्रमांकावर चीन, तिसऱ्या क्रमांकावर जपान तर चौथ्या क्रमांकावर जर्मनी आहे.
- जपान आणि जर्मनीच्या राष्ट्रीय उत्पन्नात आणि भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात जास्त फरक नाही. आता भारताने 2025 पर्यंत अर्थव्यवस्था दुप्पट करून पाच लाख डॉलरची करण्याचे ठरविले आहे.

## जैव इंधन विषयक राष्ट्रीय धोरण : 2018



### या धोरणाची ठळक वैशिष्ट्ये :

- या धोरणानुसार, जैवइंधनाचे, त्याच्या प्रकारानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. यात फर्स्ट जनरेशन जैव इंधन म्हणजे बायोइथेनॉल आणि अत्याधुनिक जैवइंधन, सेकंड जनरेशन इथेनॉल, महापालिकेचा घनकचरा, तसेच,थर्ड जनरेशन जैवइंधन म्हणजे, बायो सीएनजी इत्यादी. या वर्गीकरणामुळे, प्रत्येक प्रकारातील इंधनाला योग्य आर्थिक मदत किंवा सवलत देणे शक्य होईल.
- या धोरणामुळे, कृषी उत्पादने जसे की, ऊसाचा रस, बीटामधील साखर, शलगमसारख्या कंदमुळातील साखर, बटाटे, मका यातील स्टार्च, यासह, खाण्या योग्य नसलेल्या कृषी उत्पादनांचा उपयोग इथेनॉल निर्मितीसाठी करता येईल.
- शेतकऱ्याकडे असलेल्या अतिरिक्त धान्यसाठ्याचा उपयोग इथेनॉल निर्मितीसाठी करता येईल. मात्र, त्यासाठी राष्ट्रीय जैवइंधन समन्वय समितीची मान्यता लागेल.
- अत्याधुनिक आणि सुधारित जैवइंधनाच्या





### धोरणाचे लाभ

या धोरणामुळे देशाचे पेट्रोल-डीझेल सारख्या इंधनावरील अवलंबित्व कमी होईल आणि इंधनाची बचत होईल. पर्यावरणाच्या दृष्टीनेही जैवइंधन फायद्याचे आहे. या इंधनासाठी तळणीच्या तेलाचा वापर होणार आहे, त्यामुळे खाण्यास अपायकारक अशा या तेलाचा, अन्नप्रकिया उद्योगातील वापर कमी होऊन, जनतेच्या आरोग्याची काळजी घेतली जाईल. ह्या इंधनाची निर्मिती ग्रामीण भागात होणार असल्याने, ग्रामीण भागात पायाभूत सुविधा आणि रोजगार निर्मिती होईल. शेतकऱ्याना उत्पन्नाचा आणखी एक स्त्रोत मिळेल. तसेच घनकचरा व्यवस्थापनामुळे कचऱ्याचा प्रश्नही सुटू शकेल.

निर्मितीचा उद्देश्य डोळ्यांपुढे ठेवून, टू-जी दर्जाच्या इथेनॉल शुद्धीकरण प्रकल्पासाठी सरकार येत्या सहा वर्षात 5000 कोटी रुपये निधी खर्च करु शकेल.

- या धोरणामुळे, जैवइंधन निर्मितीपासून ते पुरवठ्यापर्यतची एक साखळीच तयार केली जाऊ शकेल.
- जैवइंधन निर्मितीसाठी एकत्रित प्रयत्न करण्याच्या हेतूने त्याच्याशी संबंधित मंत्रालये आणि विभागांच्या भूमिकाही निश्चित करण्यात आल्या आहेत.

## नादारी आणि दिवाळखोरी संहिता (दुरुस्ती) अध्यादेश – 2018



- **नादारी आणि दिवाळखोरी संहिता (दुरुस्ती) अध्यादेश 2018 ला राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी मंजुरी दिली. या अध्यादेशामुळे बांधकाम व्यावसायिकांकडून घर विकत घेणाऱ्यांना वित्तीय पतधारक अर्थात फायनान्शियल क्रेडिटर असा दर्जा मिळणार आहे.**
- अध्यादेशात करण्यात आलेल्या दुरूस्तीनुसार ज्या बांधकाम व्यावसायिकांकडे ग्राहकाने घर विकत घेण्यासाठी नोंदणी केली असेल, तो व्यावसायिक किंवा त्याची कंपनी दिवाळखोरीत निघाली तरी ग्राहकाने भरलेले पैसे वाया जाणार नाहीत, तर ते परत मिळू शकणार आहेत. अशा प्रकरणात संबंधित व्यावसायिकाच्या मालमत्तांची विक्री करून विहित नियमांच्या आधारे ग्राहकाला नुकसान भरपाई देण्याची तरतूद या अध्यादेशाद्वारे करण्यात आली आहे.
- मल्ल्या यांसारख्या आर्थिक गुन्हेगारांना चाप लावण्यासाठी केंद्र सरकारने नुकतेच 'फरार आर्थिक गुन्हेगार विधेयक 2018' मंजूर केले आहे. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री शिव प्रताप शुक्ल यांनी ते लोकसभेत सादर केले. गेल्या वर्षी 9000 कोटी रुपयांच्या गैरव्यवहारप्रकरणी फरार झालेल्या विजय मल्ल्यानंतर हे विधेयक चर्चेत आले होते. परंतु, आता नीरव मोदी गैरव्यवहार प्रकरणानंतर ते प्रत्यक्षात आले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या विधेयकाची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. नवीन कायदयानुसार, फरार आर्थिक गुन्हेगारांची देश तसेच परदेशातील (भारत सरकार आणि तेथील सरकारच्या करारानुसार) इतर मालमत्ता जप्त कण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

### विधेयकाचे स्वरूप :

- सेबी अॅक्ट, भ्रष्टाचार विरोधी कायदा, सीमाशुल्क कायदा, कंपनी कायदा, मर्यादित भागीदारी कायदा तसेच दिवाळखोरी कायद्याच्या कक्षेत गुन्हेगार ठरणाऱ्यांचा यात समावेश होणार आहे. नवीन विधेयक बँक, कर्ज, करबुडवे तसेच काळा पैसा, बेनामी व्यवहार आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यास उपयोगी ठरणार आहे. यानुसार 100 कोटींपेक्षा अधिक गैरव्यवहार किंवा आर्थिक गुन्हा करणार्याला हा कायदा लागू असेल. असा गुन्हेगार देश सोडून जाऊ शकणार नाही. किंवा जर तो देश सोडून गेल्यास त्याची मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार सरकारला मिळणार आहे.

### गुन्हेगार कसा ठरवणार?

- 100 कोटींपेक्षा अधिक रक्कमेच्या गैरव्यवहार प्रकरणात जी व्यक्ती आर्थिक गुन्हा करून देश सोडून गेली आहे किंवा न्यायालयाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी स्वदेशात येत नाही अशा व्यक्तीस विधेयकातील कलम 4 नुसार गुन्हेगार ठरवले जाणार आहे. अशा व्यक्तीविरोधात विशेष न्यायालयात चौकशी बसवून त्याला नोटीस बजावली जाईल. व्यक्तीस आपली बाजू मांडण्यास सहा आठवड्यांचा कालावधी दिला जाईल. या व्यक्तीने जर न्यायालयाने ठरवून दिलेल्या दिवशी गैरहजर राहिल्यास त्याला गुन्हेगार म्हणून जाहीर केले जाणार आहे.

### मालमत्ता जप्ती :

- व्यक्तीने केलेल्या गैरव्यवहारातील रक्कम परत मिळवण्यासाठी त्याच्या स्थावर मालमत्ता, बँक खाती तसेच इतर गुंतवणूक जप्त करण्याचा अधिकार सरकारला मिळणार आहे. या प्रकरणात खास प्रशासकीय अधिकारी नेमुन त्याची मालमत्ता जप्त करण्यात येईल आणि ती मालमत्ता विकून मिळणारी रक्कम वसूल करण्याचा अधिकार प्रशासकीय अधिकाऱ्याला असणार आहे.



# विभाग 3
# सामाजिक व राजकीय घडामोडी
















## पंधरा वर्षातील पहिला अविश्वास ठराव



- **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात तेलगू देसम पक्षाने 20 जूलै 2018 मांडलेल्या अविश्वास ठराव मोदी सरकारने जिंकला. या ठरावाच्या बाजूने 126 तर विरोधात 325 मते पडली.**
- **सभागृहाच्या सदस्यसंस्थेपैकी (543 पैकी) प्रत्यक्षात 451 खासदार ठरावाच्यावेळी उपस्थित होते.** शिवसेना, बिजू, जनता दल, तेलंगना राष्ट्र समितीने या पक्षाचे खासदार उपस्थित होते.
- नरेंद्र मोदी सरकारविरोधातील **लोकसभेत चर्चिण्यात आलेला अविश्वास ठराव हा कुठल्याही सरकारवर गेल्या पंधरा वर्षांत आलेला पहिला, तर इतिहासातील 27 वा अविश्वास ठराव होता.**
- **एकूण 27 ठरावांपैकी 15 केवळ इंदिरा गांधी सरकारवर आले होते. लालबहादूर शास्त्री यांच्या विरोधात तीन, नरसिंहराव सरकारवर तीन,** मोरारजी देसाई सरकारवर दोन, तर राजीव गांधी व अटल बिहारी वाजपेयी यांच्याविरोधात प्रत्येकी एक अविश्वास ठराव आला.
- पहिला अविश्वास ठराव जवाहरलाल नेहरू सरकारविरोधात जे.बी कृपलानी यांनी ऑगस्ट 1963 मध्ये आणला होता.
- शेवटचा अविश्वास ठराव काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी 2003 मध्ये वाजपेयींच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारविरोधात मांडला होता.
- एकदाच अविश्वास ठरावानंतर पंतप्रधानांनी राजीनामा दिला. 1979 मधील अविश्वास ठरावावरील चर्चा अनिर्णित असताना मोरारजी यांनी राजीनामा दिला होता.
- तिसऱ्या व चौथ्या लोकसभेत सर्वाधिक म्हणजे सहा अविश्वास ठराव मांडले गेले होते. तिसऱ्या लोकसभेतच 1962 ते 1967 दरम्यान जवाहरलाल नेहर, लालबहादूर शास्त्री व इंदिरा गांधी यांच्या विरोधात अविश्वास ठराव आले.
- चौथ्या लोकसभेत 1967– 1970 दरम्यान इंदिरा गांधी यांच्यावर अविश्वास ठराव आले. त्यात त्यांच्या विरोधात एकूण 15 अविश्वास ठराव आले. त्यातील चार माकपचे नेते ज्योतिर्मय बसू यांनी मांडले होते.

(संदर्भ लोकसभा सचिवालय)

## सर्वोच्च न्यायालयात प्रथमच तीन महिला न्यायाधीश




- **न्या. इंदिरा बॅनर्जी यांच्या नियुक्तीने 68 वर्षांच्या इतिहासात सर्वोच्च न्यायालयात प्रथमच एकाच वेळी तीन महिला न्यायाधीश न्यायपीठावर स्थानापन्न झाले.**
- **न्या. बॅनर्जी रुजू झाल्यामुळे सर्वोच्च न्यायालयात त्यांच्यासह न्या. आर. भानुमती व न्या. इंदू मल्होत्रा अशा तीन महिना न्यायाधीश झाल्या.** न्या. भानुमती जुलै 2020 मध्ये, न्या. मल्होत्रा मार्च 2021 मध्ये व न्या. बॅनर्जी सप्टेंबर 2022 मध्ये सेवानिवृत्त होतील. म्हणजेच पुढील किमान दोन
- वर्षे सर्वोच्च न्यायालायत महिला न्यायाधीशांची तीन ही संख्या कायम राहिल. **एकूण 25 पैकी तीन हे महिला न्यायाधीशांचे प्रमाणही आजवरचे सर्वाधिक असेल.**
- सन 1952 ते 1981 पर्यंत सर्वोच्च न्यायालयावर सर्व न्यायाधीश फक्त पुरुषच नेमले गेले. **त्यानंतर आताच्या तिघी धरून आत्तापर्यंत या न्यायालयावर नेमलेल्या महिला न्यायाधीशांची संख्या सात होईल. आधी न्या फितिमा बिवी, न्या, सुजाता मनोहर, न्या. रुमा पाल, न्या. ज्ञानसुधा मिश्रा व न्या. रंजना देसाई या महिला न्यायाधीश नियुक्त झाल्या होत्या. तरीही लागोलाग निवृत्त्यांमुळे न्यायालयावर एकाहून अधिक महिला न्यायाधीश एकाच वेळी असण्याचा काळ फार कमी होता.**
- तसेच गीता मित्तल यांच्या नियुक्तीने जम्मू-काश्मिर उच्च न्यायालयासही पहिल्या महिला मुख्य न्यायाधीश लाभणार आहेत. किंबहुना न्या. मित्तल या त्या उच्च न्यायालयावरील पहिल्या महिला न्यायाधीश असतील. याआधी त्या दिल्ली उच्च न्यायालायच्या कार्यवाहक मुख्य न्यायाधीश होत्या.




## स्कॉट मॉरिसन ऑस्ट्रेलियाचे नवनियुक्त पंतप्रधान



- **ऑस्ट्रेलियाच्या विस्थापन विभागाचे प्रमुख आणि माजी खजिनदार स्कॉट मॉरिसन हे ऑस्ट्रेलियाचे नवीन पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.** कॉन्झरव्हेटिव्ह या सत्ताधारी पक्षाचे माल्कम टर्नबुल पंतप्रधान पदावरून पायउतार झाल्यानंतर मॉरिसन यांनी पदभार स्वीकारला.
- सत्ताधारी पक्षामधील वैचारिक मतभेद तेथील जनतेने पाहिले आहेत. उर्जाविषयक धोरणांबद्दल टर्नबुल आणि त्यांच्या पक्ष सदस्यांमध्ये मोठ्या प्रमाणात मतभेद दिसून आले. कमी मतदानामुळे टर्नबुल आधीच दबावाखाली होते, तर त्यांच्याच पक्षातील खासदारांनी विकास प्रक्रियेवर टीका केली होती.
- लिबरल पक्षाचे सदस्य आणि माजी विस्थापन मंत्री मॉरिसन यांनी पक्षांतर्गत झालेल्या या मतदानप्रक्रियेत माजी गृहमंत्री पीटर डटन यांचा 45-40 असा पराभव केला. तसेच उर्जा आणि पर्यावरणमंत्री असलेले जोश फ्रिडेनबर्ग यांची उप-पंतप्रधान म्हणून निवड झाली आहे.
- मॉरिसन हे पुराणमतवादी विचारांचे ख्रिश्चन आहेत. संसदेमध्ये 2017 साली त्यांनी समलिंगी विवाहाविरोधात मतदान केले होते, तर 2013-14 दरम्यान विस्थापन खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी कठोर भूमिका घेतली होती. गर्व्हनर जनरल पीटर कॉसग्रोव्ह यांनी त्यांना पंतप्रधानपदाची शपथ दिली.
- देशामध्ये स्थिरता आणि एकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही मॉरिसन यांनी पत्रकार परिषदेदरम्यान दिली. आमच्या पक्षाला एकत्रित आणणे हे आमचे ध्येय नाही. यामुळे गेल्या आठवड्यात बऱ्याच मारहाणीच्या घटना घडलेल्या आहेत. म्हणून आम्ही संसदेत एकत्र येऊन देशाला एकसंध ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे ते म्हणाले. यावेळी जोश फ्रिडेनबर्ग यांची उपस्थिती होती. फ्रिडेनबर्ग हे खजिनदार म्हणून शपथ घेणार आहेत.

## जगातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या अभिनेत्यांमध्ये अक्षय कुमार

- **जगात सर्वाधिक कमाई करणाऱ्या टॉप-10 अभिनेत्यांच्या यादीत बॉलिवूड अभिनेते अक्षयकुमार आणि सलमान खान यांना स्थान मिळाले आहे. फोब्स या नियतकालिकाने जारी केलेल्या या यादीत अक्षयकुमार सातव्या, तर सलमान खान नवव्या स्थानी आहे. या यादीत नेहमी स्थान मिळविणारा शाहरुख़ खान मात्र यंदा बाहेर फेकला गेला आहे.**




- फोर्ब्सने 1 जुन 2017 ते 1 जून । 2018 या काळातील अभिनेत्यांनी केलेल्या एकूण कमाईच्या आधारे ही यादी तयार केली आहे. जगातील टॉप 10 अभिनेत्यांची एकत्र कमाई 748.5 दशलक्ष डॉलर इतकी आहे.
- अभिनेता अक्षयकुमारची कमाई 40.55 दशलक्ष डॉलर, तर सलमान खानची कमाई 38.5 दशलक्ष डॉलर आहे. गेल्या महिन्यात जारी झालेल्या जगातील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या 100 अभिनेत्यांतही अक्षयकुमार आणि सलमान खान या दोघांनी स्थान मिळविले होते.
- यात अक्षयकुमार 76 व्या स्थानी होती तर सलमान खानचे स्थान 82 वे होते. शाहरुख खान आणि अमिताभ बच्चन यांची नावे या यादीतही नव्हती.

### टॉप टेन

1. **जॉर्ज क्लुनी :** 239
2. **ड्वेन जॉन्सन :** 924
3. **रॉबर्ट डॉनी ज्युः :** 86
4. **जिस हेम्सवर्थ :** 64
5. **जैकी चैन** : 45.5
6. **विल स्मिथः** 42
7. **अक्षय कुमार :** 40.5
8. **ॲडम सैन्डलर :** 39.5
9. **सलमान खान** : 38.5
10. **स्विस इव्हेन्स :** 34

## संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेच्या सदस्यपदासाठी भारताची निवड




- **संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेच्या** (UNHRC) **सदस्यपदासाठी झालेल्या निवडणुकीत भारताने मोठ्या मतांनी विजय मिळवला आहे. भारताला 188 मते मिळाली आहेत.**
- संयुक्त राष्ट्रसंघातल्या 193 सदस्यांनी पुढील 3 वर्षांसाठी मानवाधिकार परिषदेच्या नव्या सदस्यांची मतदानाद्वारे निवड केली आहे. नव्या सदस्याचा कार्यकाळ दिनांक 1 जानेवारी 2019 पासून सुरु होणार आहे.
- संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेचे सदस्य होण्यासाठी कमीत कमी 97 मतांची गरज असते. आशिया आणि प्रशांत महासागर या क्षेत्रातून मानवाधिकार परिषदेवर पाच जागा आहेत.

यापूर्वी भारत या परिषदेवर सन 2001-14, सन 2014-17 अशा दोन कालावधीसाठी सदस्य होता.

- 2006 साली स्थापित 47 सदस्यीय संयुक्त राष्ट्रसंघ मानवाधिकार परिषद (United Nations for Human Rights Council -UNHRC) ही जगभरातील मानवाधिकारांचे रक्षण करण्याकरिता आणि त्यांच्या प्रसारासंबंधित बाबींसाठी कार्य करणारी **संयुक्त राष्ट्रसंघाच्या यंत्रणेमधील सर्वोच्च आंतरसरकारी संस्था आहे. याचे मुख्यालय स्वित्झर्लंडच्या जिनेव्हा येथे आहे.**

## मुकेश अंबानी 11व्या वर्षी सर्वाधिक भारतीय श्रीमंत



- **फोर्ब्स मासिकाने प्रसिद्ध केलेल्या सर्वात श्रीमंत भारतीय व्यक्तींच्या यादीत (2018) रिलायन्स समूहाचे चेअरमन मुकेश अंबानी यांनी सलग 11 व्या वर्षी आपले पहिले स्थान कायम राखले असून, चालू वर्षात सर्वाधिक कमाई करणाऱ्यांमध्येही ते अव्वल असल्याचे स्पष्ट झाले आहे.**
- फोर्ब्सने दिलेल्या माहितीनुसार, मुकेश अंबानी यांची एकूण संपत्ती 43.5 अब्ज डॉलर असून, चालू वर्षात त्यामध्ये 9.3 अब्ज डॉलरची भर पडली आहे. अंबानी यांच्यापाठोपाठ 'विप्रो'चे चेअरमन अझिम प्रेमजी यांनीही आपले दुसरे स्थान कायम राखले असून, त्यांची एकूण संपत्ती 21 अब्ज डॉलर इतकी आहे.
- या वर्षी त्यांच्या संपत्तीत 2 अब्ज डॉलरने वाढ झाली. अर्सेलर मित्तलचे चेअरमन व मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मी मित्तल हे या यादीत तिसऱ्या स्थानी असून, त्यांची एकूण संपत्ती 18.3 अब्ज डॉलर इतकी आहे. त्यात चालू वर्षात 1.8 अब्ज डॉलरने वाढ झाली, मित्तल यांच्यापाठोपाठ हिंदूजा बंधू आणि पालनजी मिस्त्री हे चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर आहेत.
- फोर्सच्या यादीत चार महिलांचा समावेश असून, त्यापैकी एक असलेल्या बायोकॉन लिमिटेडच्या चेअरमन किरण मुजुमदार-शॉ यांच्या संपत्तीत (66.5 टक्के) सर्वाधिक वाढ झाल्याचे निदर्शनास आले. 3.6 अब्ज डॉलरच्या संपत्तीसह त्या 39 व्या स्थानावर असून, गेल्यावर्षी त्या 72 व्या क्रमांकावर होत्या.

### टॉप टेन मध्ये यांचा समावेश

- शिव नाडर (14.6)
- गोदरेज कुटुंब (14)
- दिलीप संघवी (12.6)
- कुमार बिर्ला (12.5)
- ए गौतम अदाणी (11.9)

## सॉरिडॉनसह 328 गोळ्यांवर बंदी




- **सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर केंद्र सरकारने सॅरिडॉनसह 328 गोळ्यांवर बंदी घातली आहे.**
- पेनकिलर गोळ्यांचा बेछूट वापर रोखण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले असून, या गोळ्यांतील घटकांमुळे लोकांचा काहीही फायदा होत नसल्याने सरकारने या गोळ्यांवर बंदी घातली त्यात पेनकिलरसह त्वचेचे मलम पँडर्मचाही समावेश आहे.


**न्यायालयीन लढा :**

- 2010 मध्ये औषध तांत्रिक सल्लागार मंडळाने (डीटीएबी) अशा 344 औषधांवर बंदी घातली होती. त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.
- 2016 मध्ये सरकारने 344 एफडीसींवर बंदी घातली. नंतर त्यात आणखी पाच एफडीसींचा समावेश केला.
- यात सॅरिडॉन, कोरेक्स, डी कोल्ड टोटल, फेन्सडिल आणि विक्स ॲक्शन 500 एक्स्ट्रा या औषधांचा समावेश.
- यावर 100 कंपन्यांची दिल्ली उच्च न्यायालयात धाव.
- न्यायालयाने बंदी उठविल्याने सरकारचे सर्वोच्च न्यायालयात आव्हान.याचे भवितव्य डीटीएबी ठरवील असे सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्ट.
- डीटीएबीन यातील सहा औषधांच्या उत्पादनावर मर्यादित बंधने आणली आणि त्याची विक्री काही अटींवर करता येईल असे स्पष्ट केले.
- डीटीएबीच्या अहवालावर 15 औषधांवर बंदी घालता येणार नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्ट मात्र नव्याने चौकशी करून बंदी घालता येईल, असेही स्पष्ट केले.
- त्यामुळे 349 मधील 21 औषधे वगळून उर्वरित 328 एफडीसींवर बंदी.

### बंदी कशासाठी?


- अनेक कंपन्या फिक्स्ड डोस कॉम्बिनेशन (एमडीसी) 'करून नवीन गोळी, सिरप बाजारात आणतात. रुग्णाला आराम मिळण्यासाठी त्यातील समाविष्ट घटकांना फारसे महत्त्व नाही.
- मात्र त्यामुळे रुग्ण अनावश्यक औषध घेत राहतो आणि त्याचा रुग्णाला धोका संभवतो.
- एफडीसीसाठी बहुसंख्य औषध कंपन्यांनी सुरक्षितता आणि परिणामकारकतेचा डेटा तयार नाही.
- या औषधांची सुरक्षितता, स्पष्टता आणि सुसंगतपणा स्पष्ट करण्यात 95 टक्के कंपन्या अपयशी

## कावेरी जलव्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना



- **केंद्र सरकारने कर्नाटक, तामीळनाडू, केरळ आणि पूदुच्चेरी यांच्यातील कावेरी पाणीवाटप विवादासंबंधी उपाययोजना करण्यासाठी 1 जून 2018 रोजी कावेरी जलव्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.**
- तसेच कावेरी जलविवाद लवादाच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्रसरकारने कावेरी जलनियमन समीतीची स्थापना केली आहे.
- कावेरी नदीच्या पाण्याची साठवणूक, वाटणी, नियमन व नियंत्रण याविषयी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे, राज्यांना पाणीवापर कार्यक्षमता वाढवण्यासाठी सल्ला देणे इत्यादी कामे करण्याची जबाबदारी आहे.


## कावेरी जलव्यवस्थापन प्राधिकरण विषयी :




- **स्थापना :** 1 जून 2018 (तामीळनाडू, कर्नाटक, केरळ व पुदूच्चेरी राज्यांच्या विवादासाठी)
- **रचना :** अध्यक्ष – 5 वर्षासाठी अभियंता किंवा केंद्रशासनाचा सचिव दर्जाचा आयएएस अधिकारी यांची निवड.
- **सदस्य :**

1) केंद्रशासनाकडून नियुक्त केलेले 2 पूर्णवेळ सदस्य.
2) जलस्त्रोत, नदीविकास व गंगा पुनरुज्जीवीकरण मंत्रालयाकडून एक आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाकडून एक असे दोन अर्धवेळ सदस्याची निवड
3) तामीळनाडू, कर्नाटक, केरळ व पुदूच्चेरी यांच्याकडून प्रत्येकी 1 सदस्य नियुक्त. अशा प्रकारे 4 अर्धवेळ सदस्याची नियुक्ती.

## वाद कशासंदर्भात आहे



- कर्नाटकातील तळ कावेरीत उगम पावणारी कावेरी नदी 322 किलोमीटर प्रवास करून तामिळनाडूत प्रवेश करते. तामीळनाडूत 483 किलोमीटर अंतर प्रवास करून बंगालच्या उपसागरात मिळते.
- कावेरी नदी कर्नाटक, तामीळनाडू या राज्यासाठी पाण्याची पूर्तता करण्यासाठी एक प्रमुख स्त्रोत आहे.
- या बाबतीतला संघर्ष सन 1892 आणि सन 1924 मध्ये माजी मद्रास प्रेसीडेंसी आणि म्हैसूर राज्य यांच्यामधील दोन कराराच्या आहे.
- यावर निर्णय घेण्यासाठी आणि कर्नाटक, केरळ, तामीळनाडू, केरळ व पुदूच्चेरी यांच्या सहमतीसाठी भारत सरकारने 2 जून 1990 रोजी कावेरी जल विवाद न्यायाधिकरण (CWDT) गठीत केले होते. मात्र हा वाद अजूनही सुरू आहे.

## भारत राज्य वन अहवाल – 2017



- केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाकडून 'भारत राज्य वन अहवाल 2017 (India State of Forest Report ISER) प्रसिद्ध झाला. त्यानुसार देशात मागील 10 वर्षाम ध्ये वन क्षेत्रात वाढ झाली आहे. आणि भारत वनक्षेत्राच्या बाबतीत जगातल्या अग्रेसर 10 देशांमध्ये समाविष्ट झालेला आहे.
- भारताचा 24.4 टक्के भूभाग झाडांनी आच्छादलेला आहे तर जगात हे प्रमाण 2.4 टक्के एवढे आहे. या वनावर 17 टक्के मनुष्यवस्ती आणि 18 टक्के प्राणी अवलंबून आहेत.
- संयुक्त राष्ट्रसंघ अन्न व कृषी संघटनेच्या ताज्या अहवालानुसार वार्षिक पातळीवर वनक्षेत्रामध्ये सर्वाधिक वाढ नोंदवली गेली आहे. अशा जगातल्या दहा देशांमध्ये भारताचा 8 वा क्रमांक आहे.
- देशात वनक्षेत्र व वृक्षावरणाच्या स्थितीत वर्ष 2015 च्या तुलनेत 8021 चौ. किलोमीटरची वाढ झाली आहे. यापैकी वनक्षेत्रात 6,778 चौ. किलोमीटरची तर वृक्षावरण क्षेत्रात

1243 चौ. किलोमीटरची वाढ झाली आहे.

- देशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रात वन आणि वृक्षावरण क्षेत्राचा वाटा 24.39 टक्के आहे. यामध्ये घनदाट वनांचे सर्वाधिक प्रमाण आहे.
- घनदाट वने वातावरणातून सर्वाधिक प्रमाणात कार्बन डायऑक्साइड शोषून घेण्याचे काम करते. घनदाट वन क्षेत्राच्या विस्तारामुळे खुल्या वनांचे क्षेत्र देखील वाढलेले आहे.
- 12 फेब्रुवारी 2017 रोजी भारताचे पर्यावरण मंत्री हर्षवर्धन यांनी 15 वा वनअहवाल 2017 जाहीर केला. प्रत्येक दोन वर्षांनी 1987 पासून वनअहवाल फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया **(FSI)** मार्फत प्रकाशित केला जातो.

## राज्यनिहाय स्थिती :

- वनांच्या बाबतीत आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि केरळ राज्यात अधिक वाढ झालेली आहे. आंध्रप्रदेशात वन क्षेत्रात 2141 चौ. किलोमीटरची वाढ झालेली आहे. जेव्हा की हे प्रमाण कर्नाटकासाठी 1101 चौ. किलोमीटर आणि केरळसाठी 1043 चौ. किलोमीटर एवढे आहे.
- क्षेत्राच्या तुलनेत मध्यप्रदेशाकडे 77414 चौ. किलोमीटरचे सर्वाधिक प्रमाणात वन क्षेत्र आहे. तर या बाबतीत अरुणाचलप्रदेश आणि छत्तिसगड अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आहे.
- एकूण भूभागाच्या तुलनेत लक्षद्वीपकडे 90.33 टक्के एवढे सर्वाधिक वनाच्छादित क्षेत्र आहे. त्यानंतर मिझोराम (86.27%) आणि अंदमान निकोबार बेटे (81.73%) यांचा अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक लागतो.
- देशातील 15 राज्य व केंद्रशासित प्रदेशांचा 33 टक्के भूभाग, वनाच्छादित आहे. यामध्ये मिझोराम, लक्षद्वीप, अंदमान व निकोबार बेटे, नागालँड, मेघालय आणि मणिपूर या राज्यांम धला 75 टक्केहून अधिक भूभाग वनाच्छादित आहे. तर त्रिपुरा, गोवा, सिक्किम, केरळ, उत्तराखंड, दादरा नगर हवेली, छत्तीसगड आणि आसाम यांचा 33-75 टक्के भूभाग वनाच्छादीत आहे.
- देशाचे 40 टक्के वनाच्छादित क्षेत्र 1000 चौ. किलोमीटर वा त्याहून अधिकच्या व मोठ्या क्षेत्रांच्या रुपात सध्या उपस्थित आहे.
- देशामध्ये कच्छचे वनस्पती क्षेत्र 4921 चौ. किलोमीटर आहे. ज्यामध्ये वर्ष 2015 च्या तुलनेत एकूण 181 चौ. किलोमीटरची वाढ झालेली आहे. कच्छ वनस्पती क्षेत्र असलेल्या सर्व 12 राज्यांमध्ये ही वाढ नोंदवली गेली आहे.
- देशात बाध्य वन व वृक्षावरण यांचे एकूण क्षेत्र 582.377 कोटी घन लीटर अंदाजित आहे. ज्यापैकी 421,838 कोटी घन मीटर वनाच्या अंदर आहे तर 160,3997 कोटी घनमीटर क्षेत्र वनांच्या बाहेर आहे.
- वर्ष 2015 च्या तुलनेत बाह्य वन व वृक्षावरण क्षेत्रात 5.399 कोटी घन मीटरची वाढ झालेली आहे. ज्यामध्ये 2,333 कोटी घनमीटरची वाढ वन क्षेत्राच्या आतमध्ये तर 3,0657 कोटी घनमीटरची वाढ वनक्षेत्राच्या बाहेर झालेली आहे. हे प्रमाण मागील आकड्याच्या तुलनेत 3.80 कोटी घन मीटर इतके आहे.
- देशात एकूण बाबूंचे क्षेत्र 1.569 कोटी हेक्टर एवढे आहे. वर्ष 2011 मधील आकड्यांच्या तुलनेत या क्षेत्रात 17.3 लाख हेक्टरची वाढ झालेली आहे. बांबूच्या उत्पादनात वर्ष 2011 मधील प्रमाणाच्या तुलनेत 1.9 कोटी टनाची वाढ नोंदवण्यात आली आहे.

| वनक्षेत्रात वाढ झालेली राज्ये (चौरस किलोमीटर) | |
|---|---|
| आंध्र प्रदेश | 2,141 |
| कर्नाटक | 1,101 |
| केरळ | 1,043 |
| ओडिशा | 885 |
| तेलंगण | 565 |



| सर्वाधिक वनक्षेत्र असलेली राज्ये (चौरस किलोमीटर) | |
|---|---|
| मध्य प्रदेश | 77,414 |
| अरुणाचल प्रदेश | 66,964 |
| छत्तीसगड | 55,547 |
| ओडिशा | 51,345 |
| महाराष्ट्र | 50,682 |



| क्षेत्रफळानुसार सर्वाधिक वने (आकडे टक्क्यांत) | |
|---|---|
| लक्षद्वीप | 90 |
| मिझोराम | 86 |
| अंदमान निकोबार | 81 |



| सर्वात कमी वनक्षेत्राची राज्ये (चौरस किलोमीटर) | |
|---|---|
| हरियाना | 1,588 |
| पंजाब | 1,837 |
| गोवा | 2,229 |
| सिक्कीम | 3,344 |
| बिहार | 7,299 |



## वन अहवालात महाराष्ट्र



- महाराष्ट्र सरकारने गेल्या तीन वर्षात वृक्ष लागवडीचे अनेक कार्यक्रम हाती घेतले असले तरी महाराष्ट्राची वन अहवालात प्रगती दिसून येत नाही.
- महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र 3 लाख 7 हजार 713 चौ. कि.मी. आहे. यापैकी **50 हजार 682 चौ. कि.मी. क्षेत्र वनव्याप्त असून ते भौगोलिक क्षेत्राच्या 16.47 टक्के आहे.**
- **राज्यभरात 2015 च्या तुलनेत 2017 मध्ये वनक्षेत्रात तब्बल 17 टक्के घट झाली आहे.** या जिल्ह्यामध्ये पूर्ण 32%, जळगाव 21%, नाशिक 16%, अहमदनगर 14%, गडचिरोली 13%, चंद्रपूर 12%, औरंगाबाद 11%, अमरावती 9%, नंदूरबार व धुळे 8% ने घट झाली आहे.
- तर सिंधुदुर्ग 34%, कोल्हापूर 31%, रायगड व मुंबई उपनगर यांच्यामध्ये 24%, नागपूर 9%, लातूर 6%, भंडारा, रत्नागिरी व सांगलीत 5% ने वाढ झाली आहे.
- **या सर्वेक्षणात प्रथमच जलाशयाचे मूल्यांकन करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे.**
- देशातील खारफुटी जंगलात एकूण 181 चौ. कि.मी. एवढी वाढ झालेली आहे. यात एकट्या महाराष्ट्राचा वाटा 82 चौ. कि.मी. आहे.
- 1988 पासून केंद्र सरकारने एकूण भौगोलिक क्षेत्राच्या किमान 33 टक्के जंगलाने व्यापलेले असावे यासाठी 30 वर्षापासून प्रयत्न सुरू आहेत.
- **या अहवालानुसार जंगलातील पाणथळ क्षेत्रात महाराष्ट्र (432 चौ. कि.मी.) पहिल्या क्रमांकावर आहे. तर दुसरा क्रमांक गुजरात (428 चौ. कि.मी.) तर तिसरा क्रमांक मध्यप्रदेश (389 चौ. कि.मी.) राज्याचा लागतो.**
- राज्यात एकूण 7 डोंगराळ जिल्हे, 12 आदिवासी जिल्हे, आहेत.

### महाराष्ट्रातील सर्वात कमी वनांचे जिल्हे

(एकूण भौगोलिक क्षेत्राच्या तुलनेतील टक्केवारी)

| | |
|---|---|
| लातूर | 0.17 |
| सोलापूर | 0.32 |
| जालना | 0.49 |
| उस्मानाबाद | 0.62 |
| परभणी | 0.77 |

- 33% पेक्षा जास्त वनाचे प्रमान 15 राज्यात, 75% पेक्षा जास्त वनाचे प्रमाण. 7 राज्यात मिझोराम, लक्षद्वीप, अंदमान निकोबार, अरुणाचल, नागालँड, मेघालय व मणिपूअ) आहे.
- **12 राज्यात मॅग्रोव्ह वने आढळत असून मॅग्रोव्ह संरक्षण विभागाची स्थापना करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे.**

## प्रजासत्ताक दिन संचलनाचे प्रमुख पाहुणे



- **भारताचा 69 वा प्रजासत्ताक दिन 26 जानेवारी 2018 रोजी देशभरात मोठ्या उत्साहात पार पडला. आशियान-भारत मैत्रीला 25 वर्ष पूर्ण झाल्यामुळे प्रजासत्ताक दिनाचे प्रमुख पाहुणे म्हणून पहिल्यांदाच आशियान (ASEAN) गटातील 10 राष्ट्राचे प्रमुख उपस्थित होते.**
- **1950 पासून प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला एखाद्या देशाच्या प्रमुखाला बोलवण्याची सुरवात झाली.** सर्वप्रथम प्रजासत्ताक दिनाचे **प्रमुख पाहुणे म्हणून इंडोनेशियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष राष्ट्रपती सुकानौ आले होते.** तसेच सर्वाधिक पाच वेळा फ्रान्सचे प्रमुख प्रजासत्ताक दिनाचे पाहुणे म्हणून उपस्थित होते.
- 25-26 जानेवारी 2018 रोजी असियान भारत स्मृती परिषद (ASEAN - India Commemo rative summit - AICS) नवी दिल्ली येथे पार पडली. भागीदारी मूल्य, समान ध्येय हे या परिषदेचे घोषवाक्य होते.
- या परिषदेला आसियान गटाच्या दहा राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेमध्ये आसियान गट आणि भारतादरम्यान दिल्ली जाहीरनामा (Delhi Declaration) हा सामंजस्य करार पार पडला.

- तसेच आसियान-भारत दरम्यान 22-23 जानेवारी 2018 ला व्यवसाय गुंतवणूक एक्सपोर्ट नवी दिल्ली येथे पार पडली.

**मागील काही प्रजासत्ताक दिनाचे पाहुणे :**

| | |
|---|---|
| 1950 | सुकोनौ इंडोनेशियाचे (पहिले राष्ट्राध्यक्ष) |
| 2012 | यिंगलूक शिववात्रा (थायलंडचे प्रमुख) |
| 2013 | निम्मे खेसर नामत्र्याल (भूतानचे राजे) |
| 2014 | शिंझो ॲबे जपानचे (पंतप्रधान) |
| 2015 | बराक ओबामा (अमेरिका राष्ट्राध्यक्ष) |
| 2016 | फ्रांनकोईस होलांद (फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष) |
| 2017 | मोहम्मद बीन झायेद अल नाघ्यान (अबुधाबी राजे) |

## 26 जानेवारी 2018 चे प्रमुख पाहुणे

| व्यक्तीचे नाव | पद | देशाचे नाव |
|---|---|---|
| आंग सान सू की | स्टेट कौन्सिलर | म्यानमार |
| जनरल प्रयूत-चान ओया | पंतप्रधान | थायलंड |
| जोथे विदोहो | अध्यक्ष | इंडोनेशिया |
| ली हसीन लूंग | पंतप्रधान | सिंगापूर |
| नजीब रझाक | पंतप्रधान | मलेशिया |
| शेडिगो दुतेर्त | राष्ट्रपती | फिलिपीन्स |
| नग्यूयन जुआन फुक | पंतप्रधान | व्हिएननाय |
| हून सेन | पंतप्रधान | कंबोडिया |
| हसनल बोल्कीया | सुलतान | ब्रुनेई |
| थॉगलौन सिसौलिथ | पंतप्रधान | लाओस |

- *टिप : 2019 च्या प्रजासत्ताक दिनाचे पाहुणे द. आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष सिरिल राम्फोसा उपस्थित राहणार आहे.*

## पेसा कायदा

- भारतीय राज्यघटनेच्या कलम 244 मध्ये अनुसूचित क्षेत्र आणि जनजाती क्षेत्रे व त्याचे प्रशासन यांची तरतूद करण्यात आली आहे.
- भारतातील आदिवासींची सांस्कृतिक, सामाजिक स्वायत्ता, प्रथा, परंपरा यांचे जतन व संवर्धन करून अनुसूचित क्षेत्रातील आदिवासींना स्वशासनाचा अधिकार बहाल करण्यासाठी भारताच्या माजी राष्ट्रपतींनी 24 डिसेंबर 1996 रोजी पंचायत क्षेत्रविस्तार कायदा पेसा) करून घटनेच्या कलम 2441) मध्ये व परिशिष्ट पाचमध्ये समावेश केला आहे.
- पेसा कायद्यामुळे आदिवासी लोकांना ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात आले आहे.
- घटनेच्या कलम (244अ) मध्ये अनुसूचित क्षेत्रे व त्याचे प्रशासन यांची तरतूद करण्यात आली आहे.
- पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) अधिनियम 1996 (पेसा) हा कायदा देशातील 10 राज्यात लागू करण्यात आलेला आहे.
- पेसा कायदा महाराष्ट्रातील तेरा जिल्ह्यांत लागू करण्यात आला आहे. त्यामध्ये चंद्रपूर, गडचिरोली, पुणे, ठाणे, अहमदनगर, पालघर, धुळे, नंदुरबार, नाशिक, जळगाव, अमरावती, यवतम ाळ, नांदेड इत्यादी जिल्ह्यांचा समावेश आहे.
- या कायद्यान्वये अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेस अनुसूचित क्षेत्राबाहेरील ग्रामसभेपेक्षा महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 कलम 54 ने विशेष अधिकार देण्यात आले आहेत.



- महाराष्ट्रात अनुसूचित क्षेत्रातील प्रशासनाच्या अनुषंगाने आपल्या वस्तुनिष्ठ निरीक्षणासह, राष्ट्रपतींना दरवर्षी एक अहवाल पाठवावा लागतो. अनुसूचित जमातीच्या विकासाच्या अनुषंगाने अधिसूचना जारी करण्याचा एक महत्त्वपूर्ण घटनात्मक अधिकार राज्यपालांना प्राप्त आहे.
- पेसा कायद्यातील तरतुदीनुसार अनुसूचित क्षेत्रातील सर्व गौण जलाशयाचे अधिकार ग्रामपंचायतींना हस्तांतरित करण्यात आले आहेत.
- राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना आदिवासी उपाययोजनेअंतर्गत 5% निधी थेट अनुदान देणारे देशात महाराष्ट्र पहिले राज्य ठरले आहे.
- 2015-16 च्या आदिवासी विकास विभाजनाच्या अर्थसंकल्पाचे 5 टक्के म्हणजे 258 कोटी 50 लाख रुपये निधीची तरतूद पेसा या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी करण्यात आली. त्यापैकी 180 कोटी 95 लाख रुपये आदिवासी गावात वितरित करण्यात आले. यावर्षी 367 कोटी 88 लाख रुपयांची तरतूद करून 214 कोटी रुपये निधी गावाला देण्यात आला आहे.

# सर्वोच्च न्यायालयाचा तलाक संबंधीचा निर्णय





फक्रुद्दिन बेन्नूर

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने एका बैठकीत तीन वेळा तलाक हा शब्द उच्चारून दिला जाणारा 'एकतर्फी तलाक' बेकायदेशीर ठरवून रद्द केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सतत उलटसुलट मते व्यक्त केली जात आहेत. एकतर्फी तलाक (घटस्फोट) ही भारतातील मुस्लिम महिलांमध्ये कायम असुरक्षिततेची भावना निर्माण करणारी सामाजिक समस्या आहे. 1970-71 मध्ये महाराष्ट्रातील हमीद दलवाई आणि त्यांचे समाजवादी समर्थक यांनी एकतर्फी तलाकचा प्रश्न विसाव्या शतकात पुढे आणला. तेव्हापासून त्यासंबंधीची परस्पर विरोधी मते व्यक्त केली जात आहेत. मुस्लिम सत्यशोधक मंडळाने तलाकचा प्रश्न निर्माण केल्यानंतर उत्तर भारतातील उलेमानाच्या (मुस्लिम धर्मगुरू) निरनिराळ्या संघटना कार्य करत आल्या आणि त्यांनी एकतर्फी तलाकचे समर्थन सुरू केले. टिकाकारांनी त्याला एकसारख्या नागरी कायद्याचा (युनिफॉर्म सिव्हिल कोड) संबंध कारण नसताना जोडला. आपल्या संविधानातच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जेंडर जस्टिसचा मुद्दा उपस्थित करत स्त्री-पुरुषातील समता आणि समान न्याय साध्य करण्याचा मुद्दा मांडलेला होता. या मुद्यांकडे दुर्लक्ष करून एकतर्फी तलाकचा प्रश्न भारतीय नागरिकत्वाशी जोडला. त्यामुळे तलाकच्या सुधारणेला विरोध करणारे धर्मगुरू आणि मुस्लिम धार्मिक संघटना भारताच्या राष्ट्रीय प्रवाहात नाहीत असा भडक प्रचार सुरू झाला. हा प्रचार करण्यामध्ये समाजवादी अग्रेसर होते. मुस्लिम संघटनांनी हा प्रश्न अस्मितेचा प्रश्न केला. 1980 पासून भाजप आणि रा.स्व.संघ यांनी नेमका हा प्रश्न उचलून मुस्लिम विरोधाचे राजकारण केले. नरेंद्र मोदींच्या विजयानंतर हा प्रश्न भडक स्वरूपात मांडला जाऊ लागला. हिंदूत्ववाद्यांची माध्यमे बेताल प्रचार करू लागली.

हे सर्व घडत असताना मुस्लिम स्त्रिया, उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयदेखील गप्प बसलेले नव्हते. मुस्लिम स्त्री संघटनांनी एकतर्फी तलाकविरुद्ध मोहीमच सुरू केली. भारतातील वेगवगेळ्या न्यायालयांनी 1979 पासन एकतर्फी तलाक विरुद्ध निर्णय दिलेले आहेत. वास्तविक प्रख्यात मुस्लिम कायदेपंडीत ताफिर महमूद यांच्या मते नव्याने निकाल देणाच्या आपल्या सर्वोच्च न्यायालयाला हा खटाटोप करण्याची गरज नव्हती. त्यांच्या मते शमीन आरा खटल्याचा निर्णय पुरेसा होता. मोदी सरकारच्या मंत्र्यानी आणि कायदे पंडीतांनी हा प्रश्न राजकीय करून सर्वोच्च न्यायालयात नेला. मुस्लिम संघटनादेखील धर्म स्वातंत्र्याचा मुद्दा घेऊन सर्वोच्च न्यायालयात उतरल्या. या सर्व गदारोळात काही महत्त्वाच्या गोष्टी कदाचित जाणीवपूर्वक नजरेआड करण्यात आलेल्या आहेत.

मुस्लिम संघटनांनी धर्म स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित केला आहे म्हणून इस्लाम धर्मामध्ये तलाकसंबंधी कोणत्या तरतूदी केल्या गेल्या आहेत हे पाहणे उद्बोधक ठरेल. इस्लामधर्माचे मुलभूत महत्त्वाचे दोन धर्मग्रंथ आहेत.

1) कुराण

2) पैगबर वचनांचा संग्रह (हदिस) कुराण

हे अल्लाहकडून पैगंबरांकडे आलेला प्रत्यक्ष संदेश आहे. कुराणातील प्रत्येक शब्द अल्लाहचा शब्द मानला जातो. त्या कुराणमध्ये एका बैठकीत तीन वेळा उच्चारून दिला जाणारा एकतर्फी तलाक कोठेही नाही. एकतर्फी तोंडी तलाकची तरतूदच कुराणात नाही. तीच परिस्थिती हादिसमध्ये आहे. जे कुराणात आणि हादिसमध्ये नाही ते रद्द केले तर धर्म स्वातंत्र्य भंग होण्याचा प्रश्न कोठे येतो? पवित्र कुराणात म्हटले आहे की अल्लाहाच्या दृष्टीने पत्नीला तलाक देणे ही अल्लाहाची नावडती गोष्ट आहे. कुराणानुसार पतीपत्नीने एकत्रित राहणे काही कारणामुळे अशक्य झाल्यास तलाक घेण्याची पद्धत सांगितली आहे. प्रथम तलाकची कारणे दिलेली आहेत, त्यानुसार

1) पतीपत्नीत न मिटण्याइतके वाद निर्माण होणे.

2) पुरुष हा नपुसक असणे

3) पत्नी मुल होण्याच्या दृष्टीने उपयोगाची नसणे,

4) पती-पत्नी दोघांपैकी एक असाध्य रोगाने पिडीत असणे

ही कारणे असतील तरच तलाक देता येतो. त्यानुसार पती पत्नीने आपल्यातर्फे लवाद नेमायचा त्या लवादासमोर आपली कारणे मांडायची. प्रश्न न मिटल्यास पुन्हा दुसऱ्या महिन्यात तीच पद्धत अवलंब करायची. तरी प्रश्न न मिटल्यास तिसऱ्या महिन्यात लवादासमोर दिलेला तलाक हा मंजूर केला जातो. यात कुठेही स्त्रियांवर अन्याय

होत नाही. स्त्रियांनादेखील तलाक मागता येतो. पैगंबर साहेबांकडे माझ्या पतीचे तोंडच आवडत नाही ही तक्रार घेऊन आलेल्या महिलेस पैगंबर साहेबांनी तलाकची परवानगी दिली. स्त्रीने घेतलेल्या तलाकास खुला असे म्हणतात. (संदर्भ मौलाना महमद अली दि रिलीजन ऑफ इस्लाम, पान नं 673, 674).

कोणत्याही धार्मिक जमातींमध्ये चर्चा विनिमय करून तलाक देण्याची पद्धती आहे. आपल्या न्यायालयात त्याच पद्धतीने निर्णय दिले जातात. तेव्हा तलाक किंवा घटस्फोट मागणे बेकायदेशीर ठरत नाही.

प्रश्न आहे एकतर्फी दिल्या जाणाच्या तोंडी तलाकचा! पुरुषाने पत्नीला न विचारताही दिला जाणारा तोंडी एकतर्फी तलाक हा कुराणाविरोधी आहे. तो धर्मबाह्य आहे. तो स्त्रियांवर अन्याय करणारा आहे. मग प्रश्न का निर्माण झाले? पैगंबर साहेबानंतरच्या एका खलिफांच्या काळात अपवादात्मक परिस्थितीत असा तोंडी त्रिवार तलाक मंजूर करण्यात आलेला होता. पुरुषसत्ताक सरंजामी, अरबी पुरुष समाजाने त्या अपवादात्मक उदाहरणाचे धार्मिक प्रथेमध्ये रूपांतर केले तेव्हापासून गेल्या 700 वर्षात एक पेक्षा एक मोठ्या धर्मगुरूने ज्या पद्धतीचा आग्रह धरला आहे अशा तलाकला तलाक ए बिद्दत असे म्हणतात. (कायदाबाह्य तलाक) तरी तो मान्य करावा असा आग्रह धरतात. ऑगस्ट 2017 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय महत्त्वाचा आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. हे निर्णय देणारे पाचही न्यायाधीश अहिंदू आहे. या निर्णयामध्ये सर न्यायाधीश खेहर यांनीच फक्त धर्मस्वातंत्र्याचा मुद्दा उपस्थित करून त्रिवार तलाकला मान्यता दिली आहे. न्यायमूर्ती नरिमन यांनी एका बैठकीत दिलेला त्रिवार तलाक विचारविनिमय करून दिला असल्याने घटनाबाह्य ठरवला आहे. त्यांनी पतीच्या स्वैर वर्तनाविरुद्ध पत्नीच्या हक्काला प्राधान्य दिले आहे. न्यायमूर्ती जोसेफ यांनी सरन्यायाधीशांचा धर्म स्वातंत्र्याचा मुद्दा ग्राह्य धरला आहे. परंतु असा तोंडी तलाक कुराणाचा भाग नसल्यामुळे तोंडी त्रिवार तलाकला शरियतचा भाग म्हणता येणार नाही म्हणून तो बेकायदेशीर आहे असे म्हटले आहे. ब्रिटिशांनी केलेल्या 1937 चा कायदा मुस्लिम व्यक्तिगत कायदा म्हणून ओळखला जातो. तो कायदा कुराणानुसार नसून ब्रिटिशांनी केलेला आहे. त्याला कुराणातील व्यक्तीगत कायदा म्हणता येत नाही. मुस्लिम संघटना हे लक्षात घ्यायला तयार नाही याचे कारण मुस्लिम समाज हा पूर्णपणे पुरुषसत्ताक आहे. त्यांना स्त्रियांना स्वातंत्र्य देण्याची इच्छा नाही.

***– लेखक ज्येष्ठ विचारवंत व राज्यशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक. त्यांचे 17 ऑगस्ट 2018 ला निधन झाले.***

Please Notice This

# अरविंद सक्सेना यांची युपीएससीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती



- भारताचे राष्ट्रपती, रामनाथ कोविंद यांनी 28 नोव्हेंबर 2018 रोजी अरविंद सक्सेना यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाचे (UPSC) नवीन अध्यक्ष म्हणून नियुक्त केले.
- त्यांच्या नियुक्तीचा कार्यकाळ कार्यालयात प्रवेश करण्याच्या तारखेपासून 7 ऑगस्ट, 2020 पर्यंत जेव्हा ते वयाचे 65 वर्ष पूर्ण करतील किंवा पुढील आदेशपर्यंत जे आधी असेल तो पर्यंत असेल.
- जून 2018 मध्ये सरकारने सक्सेना यांना UPSCचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्त केले होते. त्यांनी निवृत्त होत असलेल्या विनय मित्तल यांच्याकडून प्रभार आपल्या हातात घेतला.

**आयोगाविषयी थोडक्यात :**

- **स्थापना :** 1 ऑक्टोबर 1926
- **राज्यघटनेतील कलम :** 315 अंतर्गत
- **रचना :** एक अध्यक्ष व इतर दहा सदस्य
- **कार्यकाल (अध्यक्ष/सदस्य :** 6 वर्ष किंवा 65 वर्ष
- **पहिले अध्यक्ष :** सर रॉस बार्कर
- **आयोगाचे कार्य :** विविध केंद्रीय सेवांमधील अधिकाऱ्यांची निवड करणे.
- **सध्याचे सदस्य :** विजय मित्तल, डॉ. प्रदीप कुमार, भिमसेन बस्सी, एअर मार्शल ए.एस. भोसले, सुजाता मेहता, मनोज सोनी

# विभाग 4

# विज्ञान व तंत्रज्ञान घडामोडी











Meet EyeROV TUNA





## पुण्यातील औंधमध्ये बिम्सटेक देशांचा युद्ध सराव




- बिम्सटेक अंतर्गत शस्त्रसज्जतेसोबतच चकमकीमध्ये दहशतवाद्यांचा मुकाबला करण्याच्या वेगवेगळ्या पद्धतींचा सराव इथे केला होता. **नेपाळ आणि थायलंड या देशांनी सैन्य तुकडी न पाठवता फक्त निरीक्षक पाठवले आहेत. बे ऑफ बंगाल इनिशिएटिव्ह फॉर मल्टीसेक्टरल टेक्निकल अँड इकॉनॉमिक को–ऑपरेशन म्हणजेच 'बिम्सटेक' या संघटनेचे सदस्य असलेल्या सात देशांचा पहिला लष्करी युद्ध सराव पुण्यात पार पडली.**
- यामध्ये शस्त्रसज्जतेसोबतच चकमकीमध्ये दहशतवाद्यांचा मुकाबला करण्याच्या वेगवेगळ्या पद्धतींचा सराव इथे केला जातो.
- तत्परता, शिस्त, चपळता आणि धाडस हे सैनिकाचं वैशिष्ट्य. मग हा सैनिक भारतीय सैन्यातला असो किंवा इतर कुठल्याही सैन्यातला. पुण्यातील औंधमधल्या लष्करी मैदानावर हीच गुण वैशिष्ट्ये सध्या दर्शनीय आहेत. **'बिम्सटेक'मध्ये भारत, बांगलादेश, नेपाळ, भूटान, श्रीलंका, थायलंड आणि म्यानमार या देशांचा समावेश आहे.**
- **या युद्ध सरावात प्रत्यक्षपणे भारत, बांगलादेश, भूटान, श्रीलंका आणि म्यानमार हे सहभागी झाले आहेत. तर नेपाळ आणि थायलंड या देशांनी सैन्य तुकडी न पाठवता फक्त निरीक्षक पाठवले आहेत.**
- दहशतवाद्यांना तोंड देण्यासाठी ज्या कौशल्यांची आवश्यकता असते, त्यांची देवाणघेवाण या युद्ध सरावाच्या माध्यमातून केली जात आहे. 10 सप्टेंबर 2018 पासून याची सुरुवात झाली आणि 16 सप्टेंबर 2018 त्याची सांगता झाली.
- या दरम्यान सहभागी देशांच्या सैन्य तुकड्या थिअरॉटीकल आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून युद्ध सराव करत आहेत.
- शहरी भाग तसेच घनदाट जंगलाच्या भागात दहशतवादविरोधी कारवाई यशस्वीपणे करण्यासाठी हे सैनिक सज्ज होत आहेत. यामध्ये सहभागी झालेल्या देशांच्या तुकडीमध्ये 25 सैनिक आणि 5 निरीक्षकांचा समावेश आहे. या सरावात सहभागी होऊन अनेक नव्या युक्त्या शिकायला मिळाल्याची भावना सहभागी झालेल्या सैनिकांनी व्यक्त केली आहे.

## नेपाळ आणि थायलंडचा सहभाग का नाही

- नेपाळची राजधानी काठमांडूमध्ये झालेल्या बिम्सटेक संमेलनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व सदस्य देशांना युद्धसरावाचं निमंत्रण दिलं होतं. थायलंड वगळता सर्व देशांनी आपण यात सहभागी होणार असल्याचं सांगितलं. थायलंडने तेव्हाच स्पष्ट केलं होतं, की आपण फक्त निरीक्षक म्हणून यामध्ये सहभाग घेऊ.
- नेपाळने मात्र ऐनवेळी यातून माघार घेतली. नेपाळमधील अंतर्गत राजकीय कारण यामागे सांगितलं जात आहे. यानंतर नेपाळने फक्त निरीक्षकाच्या भूमिकेत यामध्ये सहभाग घेतला.

## काय आहे बिम्सटेक




- **बे ऑफ बंगाल इनिशिएटिव्ह फॉर मल्टीसेक्टरल टेक्निकल अँड इकॉनॉमिक को–ऑपरेशन म्हणजेच 'बिम्सटेक' ही दक्षिण आणि दक्षिण–पूर्व आशियातील सात देशांची आंतरराष्ट्रीय संघटना आहे.**
- 6 जून 1997 रोजी स्थापना करण्यात आलेल्या या संघटनेत भारत, बांगलादेश, नेपाळ, भूटान, श्रीलंका, थायलंड आणि म्यानमार या देशांचा समावेश आहे.
- बंगालच्या उपसागरावर अवलंबून असलेल्या या सात देशांसाठी 'बिम्सटेक' हे महत्त्वाचं व्यासपीठ मानलं जातं. दळणवळण, पर्यावरण, दहशतवाद रोखणं, पर्यावरण संवर्धन आणि नैसर्गिक आपत्ती रोखण्यासाठी मिळून काम करणं, ऊर्जा, आरोग्य, कृषी, व्यापार, तंत्रज्ञान, मासेमारी, हवामान बदल, संस्कृतीक समन्वय अशा घटकांवर बिम्सटेक संमेलनात प्रकाश टाकला जातो.
- **'बिम्सटेक'चं पहिलं संमेलन बँकॉकमध्ये (थायलंड) 31 जुलै 2004 रोजी झालं होतं.** तर दुसरं संमेलन 13 नोव्हेंबर 2008 रोजी नवी दिल्लीत, तिसरं संमेलन 4 मार्च 2014 रोजी न्याय प्यायी डॉ (म्यानमार) आणि चौथं संमेलन नेपाळची राजधानी काठमांडूमध्ये नुकतंच पार पडलं.

## 2022 मध्ये गगनयानाचे प्रक्षेपण



- **भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्रो) श्रीहरीकोटा येथून** GSLV-MK **या द्वारा 2022 मध्ये गगनयानाचे प्रक्षेपन केले जाणार आहे.**
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून भाषण करताना 2022 पर्यंत मानवाचा थेट सहभाग असलेले गगनयान हे अंतराळात प्रक्षेपित करण्याची घोषणा केली होती.
- या पहिल्या मानवी मोहिमेसाठी तीन भारतीय अंतराळविरांची निवड केली जाणार असून ते पृथ्वीच्या खालच्या कक्षेत पाच ते सात दिवस वास्तव करतील.
- **या यशस्वी मोहिमेनंतर भारत हा अमेरिका, रशिया, चिननंतर चौथा देश ठरणार आहे.**

### गगनयानविषयी

- **घोषणा :** 15 ऑगस्ट 2018
- **प्रक्षेपणाचे नियोजित वर्ष** : 2022 (75 व्या स्वातंत्र्यदिनी आधी)
- **प्रक्षेपण स्थळ :** श्रीहरीकोटा
- **मोहिमेचा खर्च :** 10000 कोटी रू.
- **मोहिमेचे सल्लागार :** राकेश शर्मा (पहिले अंतराळवीर)
- **मोहिमेसाठी सहकार्य करणारे देश :** फ्रान्स
- **गगनयान यशस्वी करणारे देश :** अमेरिका, रशिया, चीन




## 'जीसॅट-29'चे यशस्वी प्रक्षेपण



- **ईशान्य भारत तसेच जम्मू आणि काश्मीर या दुर्गम भागांतील संपर्क यंत्रणा गतिमान करण्यासाठी 'जीसेट-29' ही अवकाशात यशस्वीपणे झेपावला.**
- जीएसएलव्ही-एमके 3- डी 2 या प्रक्षेपक यानाने या उपग्रहासह अवकाशात यशस्वी झेप घेतली आणि ठरल्यानुसार 16 मिनिटांत तो धृवीय कक्षेत पोहोचला. आता काही दिवसांत तो नियोजित भूस्थिर कक्षेत स्थिरावणार आहे,
- **भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे प्रमुख के सिवन यांनी सांगितले की, उपग्रहाचे वजन 3423 किलो असून त्यात केए आणि बॅण्डचे ट्रान्स्पॉण्डर आहेत. त्याद्वारे दुर्गम भागांतील संपर्क अधिक सुलभ आणि गतिमान होईलच, पण डिजिटल इंडियाचे उद्दिष्टही साध्य होईल.**
- केयू बाट हा विद्युतचुम्बकीय क्षेत्रातील 12 ते 18 गिगाहर्टझ्‌ आकाशलहरींमार्फत संपर्क साधतो तर केए बॅण्ड हा त्यापेक्षा अधिक क्षमतेचा असून तो 26.5 ते 40 गिगाहर्टझ्‌ आकाशलहरींद्वारे संपर्कसोय निर्माण करतो.
- या उपग्रहाचे यशस्वी उडाण होताच भारतीय अंतराळ संशोधन संस्थेतील संशोधकांनी एकच जल्लोष केला.
- **जीएसएलव्ही-एमके 3-डी 2 याच प्रक्षेपक**



### वैशिष्ट्ये

- हा उपग्रह अनेक अद्ययावत तांत्रिक सेवांना चालना देणारा ठरणार आहे.
- उपग्रहाचा कार्यकाल दहा वर्षे अपेक्षित आहे.
- उपग्रहाचे वजन 3423 किलो आहे.
- ज्या प्रक्षेपक यानाद्वारे हा उपग्रह सोडला गेला त्याखी क्षमता 4000 किलो वजनापर्यंतचे उपग्रह नेण्याची आहे.

**यानाद्वारे चांद्रयान-2 हा प्रकल्प तसेच अंतराळवीरसिह यान सोडण्याचा प्रकल्प, असे दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्प पार पाडले जाणार आहेत. त्या प्रकल्पांना या यशामुळे उभारी आली आहे.**

- चांद्रयान प्रकल्प जानेवारी 2019 मध्ये अपेक्षित आहे आणि त्याद्वारेच तीन वर्षात देशी यानाद्वारे पहिला भारतीय अंतराळवीरही अवकाशात झेपावणार आहे.

## समिट जगातील सर्वांत शक्तिशाली महासंगणक




- **जगातील सर्वांत शक्तिशाली 500 संगणकांच्या यादीत पहिल्यांदाच अमेरिकेचा महासंगणक** (Supercomputer) **जगातील सर्वात शक्तिशाली महासंगणकांच्या यादीत प्रथम स्थानावर विराजमान झाला आहे.**
- **आयबीएम कंपनीने निर्माण केलेल्या आणि अमेरिकेतील ऊर्जा विभागाच्या 'ओक रिज नॅशनल लॅबोरेटरी येथे कार्यरत असणाऱ्या या महासंगणकाचे नाव 'समिट'** (Summit) **असे आहे.**
- 122.3 पेटाफ्लॉप्स (on High Performance Linpack (HPL)) एवढी संगणन शक्ती असणाऱ्या 'समिट'ने यापूर्वी अव्वल स्थानावर असणाऱ्या चीनच्या 'सनवे तायहुलाईट' या 93 पेटाफ्लॉप्स एचपीएल संगणन शक्तिच्या महासंगणकाला मागे टाकत अव्वल स्थान पटकाविले आहे.
- **जगातील सर्वात शक्तिशाली 500 महासंगणकांच्या यादीमध्ये सर्वाधिक महासंगणक चीनचे (206) आहेत. त्यानंतर अमेरिका (124), जपान (36), युनायटेड किंगडम (22), जर्मनी (21) आणि फ्रान्स (18) या देशांचा क्रमांक लागतो.**
- **महासंगणकांच्या एकूण स्थापित संगणन शक्तीनुसार अमेरिका अव्वल स्थानावर पोहोचले आहे, तर चीन दुसऱ्या स्थानावर आहे.** जगातील एकूण स्थापित संगणन शक्तीपैकी 38.2 टक्के हिस्सा अमेरिकेचा आहे, तर 29.1 टक्के हिस्सा चीनचा आहे.
- जगातील 500 सर्वाधिक शक्तिशाली महासंगणकांची एकूण संगणन शक्ती प्रथमच 1 एक्झाफ्लॉप्सहून अधिक म्हणजे 1.22 एक्झाफ्लॉप्स झाली आहे. तसेच 500 सर्वाधिक शक्तिशाली महासंगणकांमधील तब्बल 273 महासंगणकांची संगणन शक्ती 1 पेटाफ्लॉप्सपेक्षा अधिक आहे.
- जगातील सर्वाधिक ऊर्जा-कार्यक्षम म्हणजेच ग्रीन 500 महासंगणकांच्या यादीतील प्रथम तीन क्रमांक जपानने पटकाविले आहेत. या यादीत जपानचा 'शोऊबू सिस्टीम बी (Shoubu system B) हा महासंगणक अव्वल स्थानी आहे. सर्वाधिक शक्तिशाली 500 यादीत हा महासंगणक 362व्या स्थानावर आहे.

**शक्तिशाली 10 महासंगणक**

| क्र. | महासंगणक | देश |
|---|---|---|
| 1. | Summit | अमेरिका |
| 2. | Sunway TaihuLight | चीन |
| 3. | Sierra | अमेरिका |
| 4. | Tianhe-2 | चीन |
| 5. | Al Bridging Cloud Infrastructure (-BCI) | जपान |
| 6. | PizDaint | स्वित्झर्लंड |
| 7. | Titan | अमेरिका |
| 8. | Sequoia | अमेरिका |
| 9. | Trinity | अमेरिका |
| 10. | Cori | अमेरिका |

### भारतातील महासंगणक





- Indian Institute of Tropical Meteorology येथे कार्यरत असणारा प्रत्यूष (Pratyush) हा 3.764 पेटाफ्लॉप्स एचपीएल संगणन शक्तिचा महासंगणक भारताच सर्वात शक्तिशाली महासंगणक ठरला आहे.
- जगातील 500 सर्वात शक्तिशाली यादीत तो 39 व्या स्थानावर आहे. या यादीत भारताचे केवळ 5 महासंगणक आहेत.

**भारतीय शक्तिशाली महासंगणक**

| क्र. | महासंगणक | शक्ती |
|---|---|---|
| 39. | Pratyush | (3.764 पेटाफ्लॉप्स) |
| 66. | Mihir | (2.570 पेटाफ्लॉप्स) |
| 206. | InC1 | (1.123 पेटाफ्लॉप्स) |
| 327. | SERC | (0.901 पेटाफ्लॉप्स) |

# विभाग 5
# विशेष चर्चेतील व्यक्तिमत्वे








## निधन वार्ता

### अटलबिहारी वाजपेयी



- **भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे निधन 16 ऑगस्ट 2018 रोजी अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था**(AIIMS) नवी दिल्ली येथे झाले. ते 93 वर्षाचे होते.
- **स्वतंत्र भारतात पंतप्रधानपदाचा कार्यकाळ पूर्ण करणारे पहिले बिगर काँग्रेस नेते असलेले वाजपेयी हे तीन वेळा देशाचे पंतप्रधान झाले.**
- 1977 मध्ये जनता पक्षाच्या सरकारमध्ये त्यांनी परराष्ट्र मंत्रीपदाची जबाबदारी सांभाळली होती. याचवर्षी संयुक्त राष्ट्रसंघाच्या अधिवेशनात त्यांनी प्रथमच हिंदीतून भाषण केले होते.
- 1939 पासून वाजपेयी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ प्रसारक होते. त्यांनी 21 ऑक्टोबर 1951 रोजी स्थापन केलेल्या भारतीय जनसंघ पक्षाचे संस्थापक सदस्य होते. तसेच जनसंघाचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले आहे.
- वाजपेयी यांनी राष्ट्रीय स्वयंसवेक संघ आणि भारतीय जनसंघ यांतील मित्र लालकृष्ण अडवाणी आणि भैरोसिंग शेखावत यांच्यासोबत मिळून भारतीय जनता पक्षाची स्थापना 1980 साली केली. त्यानंतर भाजपचे पहिले अध्यक्ष बनले.

### अटलबिहारी वाजपेयी यांच्याविषयी :

- **अटलबिहारी वाजपेयी यांचा जन्म 25 डिसेंबर 1924 रोजी सध्याच्या मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर येथे झाला होता आग्रा विद्यापीठात राज्यशास्त्रातून त्यांनी एम.ए. केले.** महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांचा समाज कार्यात सहभाग वाढू लागला होता. 1939 मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघात ते स्वयंसेवक म्हणून दाखल झाले. त्यानंतर बाबासाहेब आपटे यांच्या प्रेरणेने 1940 ते 1944 अशी पाच वर्षे पदाधिकारी प्रशिक्षण वर्गात ते दाखल झाले आणि 1947 मध्ये पूर्णवेळ प्रचारक म्हणून त्यांनी संघाचे काम सुरू केले.
- फाळणीतील अशांत कालखंडात त्यांनी कायद्याचे शिक्षण सोडून दिले आणि संघ विस्तारक म्हणून उत्तर प्रदेशात त्यांनी कार्य सुरू केले. याचवेळी दीनदयाळ उपाध्याय यांच्या नियतकालिकांतही ते काम करू लागले. दैनिक स्वदेश, दैनिक वीर अर्जुन, साप्ताहिक पांचजन्य आणि मासिक राष्ट्रधर्ममध्ये त्यांच्यातील साहित्यिकालाही आकार मिळाला.
- 1948 मध्ये संघावर बंदी आली. बंदी उठल्यानंतर 1951मध्ये भारतीय जनसंघ या संघविचारी राजकीय पक्षाची स्थापना झाली आणि त्याची जबाबदारी वाजपेयी आणि दीनदयाळ उपाध्याय यांच्यावर सोपविण्यात आली. पक्ष सरचिटणीस म्हणून ते काम करू लागले.
- त्याचवेळी जनसंघाचे संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्याशी त्यांची नाळ जुळली. मुखर्जी यांनी काश्मीरमध्ये 1954 मध्ये उपोषण सुरू केले तेव्हाही वाजपेयी त्यांच्यासोबत होते.
- **1957 मध्ये त्यांनी प्रथम लोकसभेची निवडणूक लढवली. मथुरा मतदारसंघात ते पराभूत झाले. मात्र बलरामपूरमध्ये विजयी झाले.** त्यानंतर त्यांच्या वक्तृत्वाने आणि इतरांना जोडण्याच्या स्वभावामुळे राजकारणात त्यांचा लौकिक वाढू लागला.
- **दीनदयाळ उपाध्याय यांच्या मृत्यूनंतर 1968 मध्ये जनसंघाचे ते सर्वात तरुण अध्यक्ष झाले.** बलराज मधोक, नानाजी देशमुख आणि लालकृष्ण अडवाणी यांच्यासह त्यांनी राजकारणात या पक्षाचा प्रभाव वाढवीत नेला.
- 1975 मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी जाहीर केली. तेव्हा अनेक राजकीय नेत्यांसह वाजपेयी यांनाही अटक झाली.
- 1977 मध्ये जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली सर्व काँग्रेसविरोधी पक्षांचा 'जनता पक्ष' हा आघाडी पक्ष स्थापन झाला. त्यात वाजपेयी यांनी जनसंघ विलीन केला.
- **1977 मध्ये सार्वत्रिक निवडणुकीत जनता पक्ष विजयी झाला. मोरारजी देसाई हे पंतप्रधान झाले आणि त्यांच्या मंत्रिमंडळात परराष्ट्र मंत्री म्हणून वाजपेयी हे नियुक्त झाले.** याच काळात त्यांच्यातील सर्वसमावेश नेतृत्व ठळकपणे जगासमोर आले. 1979 मध्ये जनता पक्षाचे सरकार कोसळल्यावर जनता पक्षही फुटला. त्यावेळी **1980 मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांनी भारतीय जनता पक्षा'ची स्थापना केली. या पक्षाचे ते पहिले अध्यक्ष होते.**
- इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखालील सरकार पुन्हा सत्तेवर आले तेव्हा काँग्रेसविरोधी नेतृत्वाची धुरा वाजपेयी यांच्याकडे आली. मात्र 1984 मध्ये इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर लगोलग झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचा दणदणीत विजय झाला. भाजपचे अवघे दोन खासदार निवडून आले.
- त्याचवेळी भाजपमध्ये वाजपेयी यांचा मध्यममार्गी आणि सर्वसमावेश विचारप्रवाह आणि लालकृष्ण अडवाणी यांच्या

## संक्षिप्त जीवनपट



**25-12-1924** जन्म (जन्मगाव, ग्वाल्हेर)

**1939** संघ स्वयंसेवक

**1943** हिंदी, संस्कृत व इंग्रजी या तीन विषयात बी.ए.ची. परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**1945** राज्यशास्त्र एम.ए.ची परीक्षा विद्यापीठात द्वितीय क्रमांक

**1946** संघ प्रचारक म्हणून लखनौपासून 50 कि.मी.वरील सण्डीला येथे संघाचे काम सुरू

**1947** संघाच्या राष्ट्रधर्म या मासिकाचे संयुक्त संपादक

**1948** संघाच्या पांचजन्य साप्ताहिकाचे संपादक

**1950** दै. स्वदेशाचे संपादक दिल्लीहून प्रकाशित होणाऱ्या वीर अर्जुन संपादक

**1951** भारतीय जनसंघाची स्थापना

**1953** श्यामाप्रसाद मुखर्जींचा गूढ मृत्यू. राजकारण प्रवेश, लखनौ पोटनिवडणुकीत पराभव

**1957** बलारामपूर लोकसभा मतदारसंघातून विजयी पहिल्यांदा खासदार

**1962** बलरामपूरमधून पराभव राज्यसभेवर निवड.

**1967** बलरामपूरमधून लोकसभेवर निवड



**1968** जनसंघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष दिनदयाल उपाध्याय यांची मुगलसराय रेल्वेस्थानजवळ हत्या जनसंघाचे अ.भा. अध्यक्ष

**1972** ग्वाल्हेर मतदारसंघातून लोकसभेवर निवड.

**1975** आणीबाणीत बंगळूर येथे अटक

**1979** जनता पार्टी सरकारचे पतन




**1980** भाजपची स्थापना, पक्षाध्यक्षपदी संसदीय दल नेतेपदी निवड

**1984** ग्वाल्हेर लोकसभा मतदारसंघातून पराभव

**1986** मध्य प्रदेशातून राज्यसभेवर भाजप संसदीय दल नेतेपदी फेरनिवड

**1991** लखनौहून लोकसभेवर

**1992** प्रमुख विरोधी पक्षी नेतेपदी निवड. 'पद्मविभूषण किताबाने सन्मामित



**1995** मेरी इक्यावन्न कविताएँक या पहिल्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**1996** लखनौतून पुन्हा लोकसभेवर पहिल्यांदा पंतप्रधानपदी निवड.

**1998** लखनौतून पुन्हा लोकसभेवर दुसऱ्यांदा पंतप्रधानपदी निवड.

**1999** लखनौहून लोकसभेवर निवड. तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी निवड.

नेतृत्वाखाली राममंदिर आंदोलनामुळे एकवटू लागलेला हिंदुत्ववादी विचारप्रवाह असे दोन भेद भाजपमध्ये सुप्तपणे निर्माण झाले.

- 1986 मध्ये अडवाणी पक्षाध्यक्ष झाले आणि त्यानंतर राममंदिर आंदोलनाने भाजपला पुन्हा राजकीय बळ दिले. 16 मे ते 1 जून 1996 असे 13 दिवसांचे सरकार वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात सत्तेवर टिकले. अवघ्या एका मताने विश्वासदर्शक ठराव ते हरले.
- त्यानंतर 19 मार्च 1998 ते 22 मे 2004 अशी सलग पाच वर्षे ते पंतप्रधानपदी आरूढ झाले.

| ग्रंथ आणि वाङ्मयसेवा | |
|---|---|
| **नयी चुनौती, नया अवसर (हिंदी आवृत्ती)** | 2002 |
| **इंडियाज् पर्स्पेक्टिव्ह ऑन एशियान अँड एशिया पॅसिफिक रिजन** | 2003 |
| **न्यू डायमेन्शन्स ऑफ इंडियाज फॉरेन पॉलिसीए** | 1979 |
| **डिसायसिव्ह डेज्** | 1999 |
| **व्हेन विल अॅट्रोसिटीज ऑन हरिजन्स स्टॉप : अटलबिहारी वाजपेयी यांचे राज्यसभेतील भाषण** | 1988 |
| **हिल द वुन्ड : वाजपेयीज अपिल ऑन आसाम ट्रेजिडी टू पार्लमेंट** | 1983 |
| **नॅशनल इंटिग्रेशन** | 1961 |
| **शक्ती से शांती** | 1999 |
| **राजनीती की रपतिली रहेम** | 1997 |
| **विकारा बिंदू (हिंदी आवृत्ती)** | 1997 |
| **कुछ लेख, कुछ भाषण** | 1996 |
| **बॅक टू स्क्वे अर** | 1998 |
| **डायनॅमिक्स ऑफ अॅन ओपन सोसायटी** | 1977 |
| **सेक्युलरवाद : भारतीय परंपरा (डॉ. राजेंद्र प्रसाद स्मारक व्याख्यानमाला)** | 1996 |

| कवितासंग्रह | |
|---|---|
| **ट्वेंटीवन पोएम्स** | 2003 |
| **क्या खोया, क्या पाया : अटलबिहारी वाजपेयी, व्यक्तित्व और कविताएँ (हिंदी आवृत्ती)** | 1999 |
| **मेरी इक्यावन कविताएँ** | 1995 |
| **श्रेष्ठ कविता** | 1997 |

| अल्बम | |
|---|---|
| **नयी दिशा – जगजितसिंह यांच्यासोबत अल्बम** | 1999 |

## मानसन्मान पुरस्कार


- **1992 :** पद्मभुषण पुरस्कार (भारत सरकार)
- **1993 :** मानद डॉक्टरेट (कानपूर विद्यापीठ)
- **1994 :** लोकमान्य टिळक पुरस्कार
- **1994 :** सर्वोत्कृष्ट संसदपटू
- **1994 :** पं. गोविंद वल्लभ पंत पुरस्कार
- **2014 :** सुशासन दिन 25 डिसेंबर जन्मदिन (केंद्रशासनाकडून साजरा)
- **2015 :** डी. लिट (मध्य प्रदेश सरकार)
- **2015 :** भारतरत्न (भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार)
- **2015 :** फ्रेंडस् ऑफ बांग्लादेश लिबरेशन वॉर अवार्ड
- 16 मे 1996 ते 1 जून 1996 : भारताचे 10 वे पंतप्रधान

भारताचे पंतप्रधान

| क्रमांक | पंतप्रधानाचे नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| पहिले | पंडीत जवाहलाल नेहरु | 15 ऑगस्ट 1947 ते 27 मे 1964 |
| दुसरे | लालबहादूर शास्त्री | 9 जून 1964 ते 11 जानेवारी 1966 |
| तिसरे | इंदिरा गांधी (पहिली महिला) | 24 जाने 1966 ते 24 मार्च 1977 |
| चौथे | मोरारजी देसाई | 24 मार्च 1977 ते 28 जुलै 1979 |
| पाचवे | चरणसिंग | 28 जुलै 1979 ते 14 जानेवारी 1980 |
| | इंदिरा गांधी | 14 जानेवारी 1980 ते 31 ऑक्टोबर 1984 |
| सहावे | राजीव गांधी | 31 ऑक्टोबर 1984 ते 2 डिसेंबर 1989 |
| सातवे | वि. पी. सिंग | 2 डिसेंबर 1989 ते 10 नोव्हेंबर 1990 |
| आठवे | चंद्रशेखर | 10 नोव्हेंबर 1990 ते 21 जून 1991 |
| नववे | पी. व्हि. नरसिंहराव | 21 जून 1991 ते 16 मे 1996 |
| दहावे | अटलबिहारी वाजपेयी | 16 मे 1961ते 1 जून 1996 |
| अकरावे | एच डी. देवगौडा | 1 जून 1996 ते 21 एप्रिल 1997 |

| | | |
|---|---|---|
| बारावे | इंद्रकुमार गुजराल | 21 एप्रिल 1997 ते 19 मार्च 1998 |
| | अटलबिहारी वाजपेयी | 19 मार्च 1998 ते 22 मे 2004 |
| तेरावे | मनमोहन सिंग (पहिले शिख) | 22 में 2004 ते 26 मे 2009 |
| | मनमोहन सिंग | 26 मे 2009 ते 26 मे 2014 |
| चौदावे | नरेंद्र मोदी | 26 में 2014 पासून आजपर्यंत |

## कोफी अन्नान



- **संयुक्त राष्ट्रसंघाचे (युएन) पहिले कृष्णवर्णीय सरचिटणीस कोफी अन्नान यांचे 18 ऑगस्ट 2018 रोजी बर्न (स्वित्झलँड) येथे निधन झाले ते 80 वर्षाचे होते.**
- **1977 ते 2006 या काळात सरचिटणीस पदावर राहिलेले सातवे सरचिटणीस तसेच यूएनच्या कर्मचाऱ्याम धून निवडले गेलेले पहिलेच सरचिटणीस होते.**
- 8 एप्रिल 1938 रोजी यांचा जन्म गोल्ड कोस्ट म्हणून आत्ताच्या घाना देशात कुमासी येथे झाला. दोन आदिवासी प्रमुखांचे नातू आणि प्रांतीय राज्यपालाचे ते सुपूत्र होते.
- जागतिक दहशतविरोधी लढ्याबरोबरच द. आफ्रिकेतील एडस् रोखण्यासाठी ते जगभरातील आरोग्य प्रश्नावरील आणि दारिद्र्य निर्मुलन कार्याला त्यांनी मोठी चालना दिली होती.
- याच कार्यासाठी त्यांना **2001 मध्ये नोबेल शांतता पुरस्कार हा अत्यंत प्रतिष्ठेचा नागरी पुरस्कार देण्यात आला होता.**

### मानसन्मान पुरस्कार

- **1962 :** जागतिक आरोग्य संघटनेत बजेट अधिकारी म्हणून नियुक्ती
- **1980 :** संयुक्त राष्ट्र निर्वासित आयोगाचे अध्यक्ष
- **1983 :** प्रशासकीय व्यवस्थापन सेवा अध्यक्ष (संयुक्त राष्ट्र सचिवालय न्युयॉर्क)
- **1987 :** संयुक्त राष्ट्राचे मानव संसाधन व्यवस्थापन सहाय्यक महासचिव
- **1990 :** संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्यक्रम नियोजन, अंदाजपत्रक आणि आर्थिक सहाय्यक महासचिव
- **1992 :** शांतता रक्षणाचे अंडर सेक्रेटरी जनरल म्हणून नियुक्ती
- **1996 :** संयुक्त राष्ट्राचे महासचिव
- **2001 :** संयुक्त राष्ट्राच्या महासचिवपदी दुसऱ्यांदा निवड
- **2001 :** नोबेल शांतता पुरस्कार
- **2002 :** प्रोफाईल्स इन करेज ॲवॉर्ड
- **2003 :** इंदिरा गांधी पुरस्कार
- **2004 :** फ्रीडम मेडल
- **2008 :** घाना विद्यापीठाचे कुलगूरू
- **2008 :** संयुक्त राष्ट्र फाऊंडेशनचे अध्यक्ष मंडळाचे सदस्य
- **2012 :** सीरिया संलग्न विशिष्ट दूत
- **2012 :** Interventions : A cite in war and peace (आत्मचरित्र प्रकाशित)
- **2016 :** रोहिंग्या चौकशी समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती

### संयुक्त राष्ट्रसंघाचे महासचिव

| कार्यकाळ | महासचिव | देश |
|---|---|---|
| 1946-1952 | ट्रायल लाय | नॉर्वे |
| 1953-1961 | डॅग हॅम्पर ऑल्ड | स्वीडन |
| 1961-1971 | यु थॉट | मर्ा |
| 1972-1981 | कर्ट वाल्डेम | ऑस्ट्रिया |
| 1982-1991 | जॉविअर पेरेस दी कुलर | पेरू |
| 1992-1996 | बोट्रोस-घाली | इजिप्त |
| 1997-2006 | कोफी अन्नान | घाना |
| 2007-2016 | बान-की-मून | द.कोरिया |
| 1 जाने. 2017 पासून कार्यरत | ॲन्टिनिओ गुटेरेस | पोर्तुगाल |

## व्ही.एस. नायपॉल



- **भारतीय वंशाचे व लंडनमध्ये स्थायिक झालेले नोबेल पुरस्कार विजेते विद्याधर सुरजप्रसाद नायपॉल म्हणून व्ही.एस. नायपॉल यांचे 85 व्या वर्षी निधन झाले.**
- वसाहतवादाचे कंगोरे जगासमोर आणणारा साहित्यिक अशी नायपॉल यांची ख्याती होती. त्रिनिदाद येथे जन्मलेल्या नायपॉल यांनी तीसपेक्षा जास्त पुस्तकाचे लेखन केले आहे.
- त्यांचा जन्म 17 ऑगस्ट 1932 रोजी त्रिनिदादमध्ये भारतीय

हिंदू कुटुंबामध्ये झाला होता. त्यांचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये गेले होते. त्यानंतर वयाच्या 18 व्या वर्षी ते ब्रिटनमध्ये स्थलांतरित झाले.

- त्यावेळी ऑक्सफर्डच्या युनिर्व्हसिटी कॉलेजची शिष्यवृत्ती मिळाली आणि त्यानंतर पहिले पुस्तक लिहिले. मात्र प्रकाशक मिळाले नसल्याने ते प्रकाशित झाले नाही.
- त्यामुळे नैराश्यातून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता.
- शेवटी 1951 मध्ये त्यांचे द मिस्टिक मसॅर हे पहिले पुस्तक प्रकाशित झाले.

| ग्रंथसंपदा... | |
|---|---|
| **ललित पुस्तके** | |
| द मिस्टिक मसूर | 1957 |
| द सफ़ेज ऑफ अलविरा | 1958 |
| मिग्युल स्ट्रीट (1979) | |
| अ हाऊस फॉर मि. बिस्वास | 1961 |
| मि. स्टोन ॲण्ड द नाईट्स कम्पॅनियन | 1963 |
| द मिमिक मेन | 1967 |
| अ फ्लॅग ऑन द आयलॅण्ड | 1967 |
| इन अ फ्री स्टेट (बुकर पुरस्कार) | 1971 |
| ग्युरीला | 1975 |
| अ बेन्ड इन द रिव्हर | 1979. |
| द एनिग्मा ऑफ अरायवल | 1987 |
| अ वे इन द वल्र्ड | 1994 |
| हाफ अ लाईफ | 2001 |
| द नाईटवॉचमॅन्स् ऑकरन्स बुक : ॲण्ड द अदर कॉमिक इनव्हेन्शनस् (स्टोरीज) | 2002 |
| मॅजिक सीड्स | 2004 |
| **ललितेतर पुस्तके** | |
| द मिडल पॅसेज : इम्प्रेशन्स् ऑफ फाईव्ह सोसायटीज् – ब्रिटीश, फ्रेन्च, ॲण्ड डच इन द वेस्ट इंडिज ॲण्ड साऊथ अमेरिका | 1962 |
| ॲन ऐरीया ऑफ डार्कनेस | 1964 |
| द लॉस ऑफ अल डोराडो | 1969 |
| इंडिया : अ वुन्डेड सिव्हीलाजझेशन | 1977 |
| अ कॉंगो डायरी | 1980 |
| द रिटर्न ऑफ इवा पिरॉन ॲण्ड द किलिंग्स इन त्रिनिदाद | 1980 |
| अमॉग द बिलिवर्ज : ॲन इस्लामिक जर्नी | 1981 |
| फाइंडींग द सेंटर : टू नॅरेटिव | 1984 |
| अ टर्न इन द साऊथ | 1989 |
| इंडिया : अ मिलियन म्युटिनाईज नाऊ | 1990 |
| बियॉण्ड बिलिफ : इस्लामिक अकस्कझन अमॉग द कन्व्हर्टेड पिपल्स | 1998 |
| बिटविन फादर ॲण्ड सन : फॅमिली लेटर्स | 1999 |
| द रायटर ॲण्ड द वर्ल्ड : एसेज् | 2002 |
| अ रायटरस् पिपल : वेज ऑफ लुकिंग ॲण्ड फिलिंग | 2007 |
| द मास्क ऑफ आफ्रिका : ग्लिम्सेस ऑफ अफ्रीकन बिलिफ | 2010 |

## मानसन्मान पुरस्कार

- **1971 :** मॅन बुकर पुरस्कार (इन ए फ्री स्टेट)
- **1990 :** नाईडहुड सन्मान (सद पदवी बहाल)
- **1961 :** जगातील 50 महान लेखकात समावेश
- **1983 :** जेरुसलेम पुरस्कार प्रदान
- **2001 :** साहित्याचा नोबेल पुरस्काराने सन्मानित

## एम करुणानिधी



- **तामीळनाडूचे माजी मुख्यमंत्री आणि द्रमुकचे सर्वेसर्वा एम करुणानिधी यांचे 7 ऑगस्ट 2018 रोजी कावेरी रुग्णालय चेन्नई येथे झाले ते 94 वर्षांचे होते.**
- आपल्या राजकीय कारकिर्दित एकूण 5 वेळा ते मुख्यमंत्री पदावर विराजमान झाले. तसेच 27 जूलै 2018 ला द्रमुकच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारून 50 वर्षे पूर्ण झाली होती. देशातील अन्य कोणत्याही नेत्याला एवढी संधी मिळाली नाही.
- 1957 पासून त्यांनी लढवलेल्या सर्व 13 विधानसभा निवडणूकीमध्ये ते विजयी ठरले. 1984 मध्ये ते विधानपरिषदेमध्ये सदस्य होते.
- स्वतंत्र्यदिनी राज्याच्या मुख्यमंत्रांना ध्वज फडकवण्याचा मान त्यांनीच मिळवून दिला. तसेच तामिळनाडू राज्यासाठी स्वतंत्र गौरवगित त्यांनीच बनविले.
- **दोन वेळा त्यांचे सरकार बरखास्त केले गेले असे करूणानिधी हे एकमेव मुख्यमंत्री होते. 1976 मध्ये आणीबाणीच्या काळात आणि 1991 मध्ये 356 अन्वये त्यांचे सरकार बरखास्त केले गेले.**
- एम. करुणानिधी कलैनार या टोपण नावाने सुपरिचित होते. कलैनार म्हणजे कलेचे वरदान लाभलेला कलावंत होय.
- आणीबाणीच्या काळात त्यांनी ‘मुरासोली’ हे पक्षाचे नियतकालिक सुरू केले. तसेच आणीबाणीच्या काळात क्षेत्रीय

अस्मीतेवर आधारित पक्षांची गळचेपी होणार हे स्पष्ट झाले होते. द्रविड मुन्नेत्र कळघममधील द्रविड हा शब्द काडावा आणि दबाव येत होता परंतु ते दबावाला बघितले नाही.

- चित्रपटातून त्यांनी राजकीय संकल्पना मांडल्या. **पराशक्ती हा त्यांचा पहिला चित्रपट त्यातूनच त्यांची द्रविडीयन चळवळीचे तत्त्वे मांडली.** त्या चित्रपटाला बंदी येऊनही चित्रपट हिट झाला होता. त्यांचे पनाम व थंगरतनम हे चित्रपटही विधवा पूनर्विवाह, अस्पृश्यता यावर आधारित होते. तब्बल 39 चित्रपटांच्या पटकथा लिहिणारे करूणानिधी हो साहित्यिकही होते.


## मानसन्मान पुरस्कार

- **1949 :** द्रविड मुनेत्र कळघम पक्षाचे संस्थापक सदस्य / पहिले कोषाध्यक्ष
- **1957 :** विधानसभेत प्रथम निवड (कुलीथाल्लई मतदारसंघ)
- **1971 :** मानद डॉक्टरेट पदवीने सन्मामित (अन्नामलई विद्यापीठ)
- **1971 :** राजाराजन पुरस्कार (येनपंडी सिंघम पुस्तकासाठी)
- **2006 :** डॉक्टरेट पदवीने सन्मानित (मदुराई विद्यापीठ)
- **2007 :** यारो-ई-मिलन किताब

| **करुणानिधींची वाटचाल** |
|---|
| 1961 **:** द्रमुके खजिनदार |
| 1962 **:** विधानसभेत विरोधी पक्ष उपनेते |
| 1967 **:** सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री |
| **फेब्रुवारी** 1961**–जानेवीर :** 1971 दुसऱ्यांदा मुख्यमंत्री |
| **मार्च** 1971 **– जानेवारी :** 1976 तिसऱ्यांदा मुख्यमंत्री |
| **जानेवारी 1981 – जानेवारी 1981 :** तिसऱ्यांदा मुख्यमंत्री |
| **मे 1996– मे 2001** : चौथ्यांदा मुख्यमंत्री |
| **मे 2006–मे 2011 :** पाचव्यांदा मुख्यमंत्री |



## सोमनाथ चटर्जी



- **ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते व लोकसभेचे माजी अध्यक्ष सोमनाथ चटर्जी यांचे 13 ऑगस्ट 2018 रोजी कोलकत्ता येथे निधन झाले ते 89 वर्षाचे होते.**
- चटर्जी हे माकपच्या केंद्रीय समितीचे सदस्य होते. दहा वेळा ते लोकसभेचे खासदार म्हणून निवडून आले. 1968 मध्ये ते माकपमध्ये आले.
- फक्त ते ममता बॅनर्जीकडून एकदाच पराभूत झाले होते.
- **2004 ते 2009 या काळात ते लोकसभेचे अध्यक्ष होते.** 2008 मध्ये युपीए सरकारचा पाठिंबा माकपने काढला होता. त्यानंतर लोकसभाध्यक्ष पदाचा राजीनामा देण्याचा नकार दिल्याने 2008 मध्ये माकपने त्यांची पक्षातून हकालपट्टी केली होती.
- सोमनाथच चटर्जी यांचा जन्म 25 जुलै 1929 रोजी तेजपूर (आसाम) येथे झाला. त्यांच्या मातोश्रीचे नाव वीणापाणीदेवी असे होते. तर वडील निर्मलचंद्र चटर्जी ख्यातनाम वकील आणि हिंदुत्ववादी होते. तसेच हिंदू महासभेचे ते अध्यक्षही होते.
- 2004 ते 2009 या काळात लोकसभा अध्यक्षपद भूषविताना त्यांचा निर्देशांकानुसार जुलै 2006 मध्ये लोकसभेसाठी विशेष वाहिनी सुरू झाली होती.
- **लोकसभा अध्यक्ष गणेश वासुदेव माळवणकर यांच्यानंतर प्रोटेम स्पीकर म्हणून निवड झाल्यानंतर लोकसभा अध्यक्ष बनणारे दुसरे व्यक्ती ठरले आहेत.**


## मानसन्मान पुरस्कार

- **2004 :** लोकसभा अध्यक्ष म्हणून निवड.
- **1996 :** उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार प्रदान
- **2013 :** लिव्हिंग लिजंड पुरस्कार (भारत निर्माण अंतर्गत देण्यात येणारा)



| लोकसभा सभापती / अध्यक्ष | | |
|---|---|---|
| **क्रमांक** | **लोकसभा सभापतीचे नाव** | **कार्यकाल** |
| पहिले | गणेश वासुदेव मावळकर (पहिले महाराष्ट्रीयन) | 15 मे 1952 ते 13 जानेवारी 1956 |
| दुसरे | एम. ए. अय्यगार | 8 मार्च 1956 ते 16 एप्रिल 1962 |
| तिसरे | सरदार हुकूमसिंग | 17 एप्रिल 1962 ते 16 मार्च 1967 |
| चौथे | नीलम संजीव रेड्डी | 17 मार्च 1967 ते 19 जुलै 1969 |
| पाचवे | गुरूदयालसिंग धिल्लन | 8 ऑगस्ट 1969 ते 1 डिसेंबर 1975 |
| सहावे | बळीराम भगत | 5 जानेवारी 1976 ते 25 मार्च 1977 |
| सातवे | के.एस हेगड़े | 21 जुलै 1977 ते 21 जानेवारी 1980 |
| आठवे | बलराम जाखड़ | 22 जानेवारी 1980 ते 27 नोव्हेंबर 1989 |
| नववे | रवी रे | 19 डिसेंबर 1989 ते 9 जुलै 1991 |
| दहावे | शिवराज पाटील (दुसरे महाराष्ट्रीयन) | 10 जुलै 1991 ते 22 मे 1996 |
| अकरावे | पी, ए, संगमा | 25 में 1996 ते 23 मार्च 1998 |
| बारावे | जी. एम. सी बालयोगी | 24 मार्च 1995 ते 3 मार्च 2002 |
| तेरावे | मनोहर जोशी (तिसरे महाराष्ट्रीयन) | 10 में 2002 ते 2 जून 2004 |
| चौदावे | सोमनाथ चॅटर्जी | 4 जून 2004 ते 16 मे 2009 |
| पंधरावे | मिरा कुमार (पहिली महिला) | 4 जून 2009 ते 18 मे 2014 |
| सोळावे | सुमित्रा महाजन (चौ थी महाराष्ट्रीयन महिला) | 5 जून 2014 आजपर्यंत |

## अजित वाडेकर




- **भारतीय क्रिकेट संघाचा माजी प्रशिक्षक अजित वाडेकर यांचे 16 ऑगस्ट 2018 रोजी मुंबईत निधन झाले ते 77 वर्षांचे होते.**
- 1958 साली मुंबईच्या संघातून त्यांनी प्रथमश्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. 1966 ते 1974 या काळात त्यांनी भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले. 13 डिसेंबर 1966 मध्ये त्यांनी वेस्ट इंडिजविरुद्ध आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले.
- भारताकडून 37 कसोटी सामाने खेळताना त्यांनी 31.07 च्या सरासरीने 2113 धावा केल्या. यात एक शतक आणि 14 अर्धशतकांचा समावेश होता.
- अजित वाडेकरांच्या नेतृत्त्वाखाली खेळताना भारताने पहिल्यांदा1971 साली वेस्टइंडिज आणि इंग्लंडमध्ये कसोटी मालिका जिंकली **ते भारताचे पहिले वनडे कर्णधार होते.**
- आंतरराष्ट्रीय निवृत्तीनंतर 1990 भारतीय संघाचे व्यवस्थापक आणि भारतीय संघाचे प्रशिक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली होती.
- **कर्णधार, व्यवस्थापक आणि निवड समितीचे अध्यक्ष अशा प्रकारचे तीनही पदे भूषविणारे वाडेकर हे लाला अमरनाथ आणि चंदू बोर्डे या दोंघांव्यतिरिक्त फक्त तिसरेच खेळाडू ठरले होते**

### मानसन्मान पुरस्कार

- **1967 :** अर्जुन पुरस्कार
- **1972 :** पद्मश्री पुरस्कार
- **2010 :** पि.के. नायडू जीवनगौरव पुरस्कार
- **2011 :** कॅस्ट्रॉल जीवनगौरव पुरस्कार

## कुलदीप नय्यर



- **प्रख्यात लेखक आणि प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र व नागरी हक्कासाठी शेवटपर्यंत संघर्ष करणारे ज्येष्ठ पत्रकार कुलदीप नय्यर यांचे निधन 23 ऑगस्ट 2018 रोजी झाले ते 95 वर्षांचे होते.**
- नाय्यर यांचा जन्म 14 ऑगस्ट 1923 मध्ये आताच्या पाकिस्तानातील सियालकोट (पंजाब) येथे झाला.
- उर्दू भाषेतील वृत्तपत्रापासून त्यांनी पत्रकारितेची सुरूवात केली. इंडियन एक्सप्रेस, द स्टेटसमनसह अनेक दैनिकांचे संपादकपद

त्यांनी भूषविले.

- आणिबाणीच्या काळात त्यांना अटक करण्यात आली होती. त्यांनी पत्रकारिताच केली असे नव्हे तर मानवी हक्क, प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला.
- नाय्यर यांनी जवळपास 16 पुस्तकाचे लिखान केले आहेत. 'बियॉण्ड द लाईन्स 1996' मध्ये त्यांचे आत्मचरित्र प्रकाशित झाले.

## मानसन्मान पुरस्कार

- **1990 :** ब्रिटनमधील भारताचे उच्चायुक्त
- **1996 :** संयुक्त राष्ट्रात भारताच्या प्रतिनिधी मंडळात सदस्य म्हणून सन्मान
- **1997 :** राज्यसभेत नियुक्त सदस्य म्हणून निवड
- **2003 :** ॲस्टोर ॲवॉर्ड (वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी)
- **2015 :** रामनाथ गोयंका उत्कृष्ट जीवनगौरव पुरस्कार
- **2014 :** संत नामदेव राष्ट्रीय पुरस्कार
- **2007 :** शहिद नियोगी जिवनगौरव पुरस्कार

## विजय चव्हाण



- **मराठी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते विजय चव्हाण यांचे 24 ऑगस्ट 2018 रोजी मुंबई येथे निधन झाले. ते 63 वर्षांचे होते.**
- विजय चव्हाण यांनी आतापर्यतं 350-400 चित्रपटांमध्ये काम केले आहेत. मोरुची मावशी, श्रीमंत दामोदरपंत, ही त्यांची नाटक प्रचंड गाजली.
- प्रल्हाद केशव अत्रे यांनी लिहिलेल्या मोरुची मावशी या नाटकातील मावशीच्या स्त्री भूमिकेसाठी ते विशेष ओळखले जातात.
- तसेच एकाच नाटकात चौदा भूमिका करण्याचा विक्रम त्यांनी केला आहे.
- **1985 साली प्रदर्शित झालेल्या वहिनीची माया या चित्रपटाद्वारे त्यांनी मराठी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले.**
- दूरवर या नाटकाने त्यांनी व्यावसायिक रंगभूमिवरील कारकिर्दीला प्रारंभ केला.
- रंगभूमीवर विजय चव्हाण हे विजूमामा या नावाने प्रसिद्ध होत.
- हलाल हा त्यांचा शेवटचा चित्रपट ठरला.

## मानसन्मान पुरस्कार

- **1996 :** उत्कृष्ट सहाय्यक अभिनेता पुरस्कार (महाराष्ट्र सरकार)
- **1997 :** दामुअण्णा मालवणकर पुरस्कार (विनोदी भूमिकेसाठी)
- **1998 :** उत्कृष्ट सहाय्यक अभिनेता पुरस्कार
- **2009 :** डॉ. काशिनाथ घाणेकर पुरस्कार
- **2018 :** व्ही शांताराम जिवनगौरव पुरस्कार
- **2018 :** संस्कृती कलादर्शन जिवनगौरव पुरस्कार

## दादा जे.पी. वासवानी



- **शांतता, मानवता आणि शाकाहार यांच्या प्रसारासाठी वेचनारे अध्यात्मिक गुरू दादा जे.पी. वासवानी यांचे नुकतेच निधन झाले ते 99 वर्षांचे होते.**
- सध्याच्या पाकिस्तानातील सिंध प्रांतातील हैदराबाद येथे 2 ऑगस्ट 1918 रोजी त्यांचा जन्म झाला.
- जे.पी. उर्फ जशन पहलाजराय वासवानी असे त्यांचे मुळ नांव होते ते **अध्यात्मिक गुरू साधू वासवानी यांचे ते पुतणे होते.**
- जे.पी. वासवानी हे अविवाहित होते. त्यांचे भौतिकशास्त्रात त्यांची एमएस्सीपर्यंतचे शिक्षण झाले होते. त्यानंतर एलएलबीचीही पदवी संपादन केली होती.
- दादा जे.पी. वासवानी यांनी साधू वासवानी मिशन तर्फे अनेक सामाजिक कार्याला प्रारंभ केला. त्यांनी स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले. सेंट मिरा स्कूल व कॉलेज सुरू केले. त्यांनी सिंधी भाषेत सुमारे 190 पुस्तके लिहिली. देशभरात 18 शाखा काढल्या. तसेच पुण्यात इनलॅक्स बुधराणी हे हॉस्पिटल तसेच शांती क्लिनिकदेखील सुरू केले.
- विदेशी भाषेत त्यांच्या पुस्तकांचे अनुवाद झाले आहेत. जागतिक अनेक नामांकित नेत्यासह धर्मगुरू त्यांना भेटून त्यांच्याशी भेटून संवाद साधत असत.



## मानसन्मान / पुढाकार

- **2008 –** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा राज्यस्तरीय पुरस्कार
- **2008 –** कवयित्री बहिणाई पुरस्कार
- **2011 –** साहित्य अकादमीचा भाषांतरासाठीचा पुरस्कार ('रजई' या इस्मत चुगताई यांच्या लघुकथांच्या अनुवादासाठी)
- **विशेष –** मुख्याध्यापिका शशिकलाताई आगाशे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा राज्यस्तरीय बालवाड.मय पुरस्कार झाला होता.

## चर्चेतील व्यक्ती

### रंजन गोगोई



- **न्या. रंजन गोगोई यांची सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ते भारताचे 46 वे सरन्यायाधिश म्हणून 3 ऑगस्ट 2018 रोजी दीपक मिश्रा यांच्याकडून पदभार स्वीकारला. ते या पदावरद 17 नोव्हेंबर 2019 पर्यंत राहणार आहे.**
- न्या. दिपक मिश्रा नंतर गोगोई सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांच्या ज्येष्ठतेच्या दूसऱ्या स्थानावर होते. सर्वोच्च न्यायालयाच्या सर्वांत वरिष्ट न्यायमुर्तींना सरन्यायाधिश बनवले जाते.
- **गोगोईच्या निमित्ताने प्रथमच ईशान्य भारतातील व्यक्ती सरन्यायाधीशपदी नियुक्त झाली आहे.**
- गोगोई यांचा जन्म 18 नोव्हेंबर 1954 रोजी आसामच्या संपन्न घराण्यात जन्म झाल. **त्यांचे वडील के.सी. गोगोई हे आसाममधील नामवंत वकील होते. पुढे ते राजकारणात आले आणि आमसामचे मुख्यमंत्रीपदही त्यांनी भुषविले.**
- न्या. गोगोईची शिस्तबद्ध प्रतिमा तेव्हा समोर आली. जेव्हा त्यांनी माजी न्यायमूर्ती मार्कंडेय काटजू यांना अवमानाने एका प्रकरणात कोर्टात हजर राहण्याचे आदेश दिले.
- न्या. काटजू यांनी केरळमधील सौम्या बलात्कार प्रकरणात कोर्टाच्या निर्णयावर टिका केली होती. या प्रकरणातील दोषी गोविंद सामीला मानक आणि हत्येच्या आरोपातून मुक्त केलं.
- या निर्णयानंतर काटजू यांनी निर्णय देणाऱ्या न्यायमुर्तींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला.
- न्या. गोगाईंनी याला कोर्टाचा अवमान असल्याचा सांगत काटजू यांना कोर्टात हजर राहण्याचे आदेश दिले. हे इतिहासात पहिल्यांदा घडलं की सुप्रिम कोर्टाच्या माजी न्यायाधिशांना या पद्धतीने कोर्टात हजर रहावं लागलं.
- **12 जानेवारी 2018 रोजी इतिहासात पहिल्यांदाच रंजन गोगोई आणि न्या. जे. चेलामेश्वर, न्या. एम.बी. लोकूर व न्या. कुरियन जोसेफ या चार वरीष्ठ न्यायमुर्तींनी सुप्रिम कोर्टातील खटले वाटपावरून पत्रकार परीषद होती.**
- न्या. गोगोई आसाम मधील नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन (एनसीआर) अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेवर तसेच मतदारांना नोटाचा पर्याय उपलब्ध करून देणाऱ्या खंडपिठातही ते होते.
- रिलायन्स कपंनीने गुजरातमधील ठिकठिकाणी मोबाईल टॉवर उभारल्याने सरकारने त्यावर 13 कोटी कर लावला होता. हा कर अन्यायकारक असल्याने तो रद्द करावा यासाठी कंपनीने सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेतली. त्यावेळेस खंडपिठाचे अध्यक्ष नऊया. रंजन गोगोई होते. तसेच लोकपालच्या नियुक्तीसंदर्भात नमेलेल्या खंडपीठातही त्यांचा समावेश होता.

## मानसन्मान / पुढाकार

- **1978 :** गुवाहाटल उच्च न्यायालयात वकील
- **2001 :** गुवाहाटी उच्च न्यायालयात न्यायाधिश
- **2011 :** पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात मुख्य न्यायाधिश
- **2012 :** सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश
- **2018 (3 ऑक्टोबर) :** भारताचे 46 वे सरन्यायाधीश

**सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश**

| क्र. | सरन्यायाधिशांची नावे | कार्यकाल |
|---|---|---|
| 1 ले | हिरालाल जे. केनिया | 26 जानेवारी 1950 ते 6 नोव्हेंबर 1951 |
| 2 रे | एन पतांजली शास्त्री | 7 नोव्हेंबर 1951 ते 3 जानेवारी 1954 |
| 3 रे | महेरचंद्र महाजन | 4 जाने 1954 ते 22 डिसेंबर 1954 |
| 7 वे | पी. बी. राजेंद्र गडकर (पहिले महाराष्ट्रीयन) | 1 फेब्रुवारी 1964 ते 15 मार्च 1966 |
| 37 वे | के. जि. बाळकृष्णन (पहिले दलित) | 14 जानेवारी 2007 ते 12 मे 2010 |

| | | |
|---|---|---|
| 38 वे | एस.एच. कपाडिया | 12 मे 2010 ते 28 सप्टेंबर 2012 |
| 39 वे | अल्तमस कबीर | 29 सप्टेंबर 2012 ते 18 जुलै 2013 |
| 40 वे | पी. सदाशिवम | 19 जुलै 2013 ते 26 एप्रिल 2014 |
| 41 वे | राजेंद्रमल लोढा | 27 एप्रिल 2014 ते 27 सप्टेंबर 2014 |
| 42 वे | एच एल दत्तू | 28 सप्टेंबर 2014 ते 2 डिसेंबर 2015 |
| 43 वे | तिर्थसिंग ठाकूर | 3 डिसेंबर 2015 ते 4 जानेवारी 2017 |
| 44 वे | जगदीश सिंग खेटर | 4 जानेवारी 2017 ते 27 ऑगस्ट 2017 |
| 45 वे | दीपक मिश्रा | 28 ऑगस्ट 2017 ते 2 ऑक्टोबर 2018 |
| 46 वे | **रंजन गोगोई** | 3 ऑक्टोबर 2018 ते 17 नोव्हेंबर 2019 पर्यंत |

## गीता गोपीनाथ



- **हॉर्वर्ड विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय अभ्यास आणि अर्थशास्त्र विषयाच्या प्राध्यापक म्हणून कार्यरथ गीता गोपीनाथ यांची आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मुख्य अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांची निवड झाली आहे.**
- **त्या हे पद धारण करणाऱ्या प्रथम महिला व दुसऱ्या भारतीय व्यक्ती आहेत. त्यांच्या पूर्वी रघुराम राजन हे या पदावर होते.**
- गीता गोपीनाथ यांचा जन्म कोलकाता येथे झाला. त्या जन्माने भारतीय आहेत. त्यांचे शिक्षण दिल्ली विद्यापीठात झाले नंतर त्यांनी अमेरिकेचे नागरिकत्व पत्करले. प्रिस्टन विद्यापीठामधून त्यांनी पीएचडी केली.
- त्यांनी भारतीय वित्ता मंत्रालयाच्या जी 20 राष्ट्रविषयक सल्लागार मंडळाच्या सदस्यपदावर काम केले आहे. तसेच 2011 मध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमकडून यंग ग्लोबल लिडरने गौरविण्यात आले आहे.

## आंतरराष्ट्रीय नाणेनिधीविषयी थोडक्यात

- **स्थापना :** 27 डिसेंबर 1945
- **मुख्यालय :** वॉशिंगटन डी.सी., अमेरिका
- **अधिकृत भाषा :** इंग्लिश, फ्रेंच, स्पॅनिश
- **उद्देश :** आंतरराष्ट्रीय व्यापारातील देवाणघेवाणीतील समतोल राखणे
- **सदस्य देश :** 189 देश
- **मुख्य व्यवस्थापक / प्रमुख :** क्रिस्टिन लगार्ड

## कमलेश व्यास



- **केंद्र सरकारच्या मंत्रीमंडळ समितीने प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि मुंबईच्या भाभा अणुशक्ती केंद्राचे संचालक डॉ. कमलेश निलकंठ व्यास यांची अणुऊर्जा आयोगाच्या अध्यक्षपदी तसेच सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ते डॉ. शेखर बसु यांची जागा घेतली.**
- अणुशास्त्रज्ञांना संशोधनासाठी प्रोत्साहन देणे आणि त्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी असलेल्या आयोगावर ते वयाची 64 वर्षे पूर्ण होईपर्यंत म्हणजे 2021 पर्यंत ते अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष राहणार आहेत.
- बडोदा येथील एम.एस. विद्यापठीतून अभियांत्रिकीची पदवी घेऊन भाभा अणुशक्ती पदाच्या प्रशिक्षण विद्यालयात आले. त्यानंतर 1979 मध्ये अणुभट्टी विभागात रुजू झाले.
- याच विभागात इंधन आरेखन आणि विकास या क्षेत्रांत त्यांना विशेष रस असल्याने तेथे त्यांना आपली प्रतिभा आणि कौशल्य सिद्ध करता आले.
- या क्षेत्रात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल शासन तसेच विविध संस्थांनी घेतली. 2011 मध्ये न्युक्लिअर सोसायटीचा उत्कृष्ट सेवा पुरस्कार त्यांना मिळाला होता.
- त्याआधी 2006 ते 2013 या कालावधीत पाच वेळा ते होमी भाभा औद्योगिक पुरस्काराचे मानकरी ठरले होते. इंडियन नॅशनल ॲकॅडमी ऑफ इंजिनिअर्सचे ते फेलोही होते.



# तमीळनाडूचा 69% आरक्षण पॅटर्न





प्रा. हरी नरके

- **आ**रक्षणाची चर्चा करताना अनेकजण नेहमी तमीळनाडू पॅटर्नचा उल्लेख करतात. काय आहे हा पॅटर्न ते आपण सविस्तर पाहूयात. त्यासाठी आपल्याला या राज्याचा दिडशे वर्षांचा इतिहास पाहावा लागतो.
- तमीळनाडू राज्यात आज 69% आरक्षण आहे. अनुसुचित जाती, 18%, अनु. जमाती 01%, ओबीसी 30% आणि एमबीसी 20% = 69% हे आरक्षण 1989 पासूनचे आहे.
- मद्रास राज्यातील ब्राह्मणेतर हिंदू आणि मुस्लीम यांना राजकीय सत्तेमध्ये स्थान मिळालेले नाही. अशी ब्रिटीश राजवटीतील 1871 सालच्या मद्रासच्या पहिल्या जनगणना अहवालात नोंद सापडते.
- 1881 च्या मद्रासच्या दुसर्या जनगणना अहवालात या मागास घटकांसाठी सरकारने विशेष योजना आखण्याची गरज असल्याची शिफारस करण्यात आली.
- 1882 मध्ये या मागास घटकांच्या शिक्षणासाठी खास व्यवस्था करावी अशीही शिफारस करण्यात आली.
- 1885 साली त्यानुसार या घटकांच्या शिक्षणासाठी ब्रिटीश सरकारकडून विशेष अर्थसहाय्य पुरविण्यात आले.
- 1893 साली मद्रास सरकारने मागासलेल्या 49 जातींच्या शिक्षणासाठी विशेष योजना राबवायला सुरूवात केली.
- 1918 साली म्हैसूरच्या वडार ओडीयार राजांनी राज्यातील मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची पहिल्यांदा तरतूद केली. 1925 मध्ये रामस्वामी पेरियार जन्म 17 सप्टे. 1879 -मृत्यू, 24 डिसें. 1974 यांनी सेल्फ रिस्पेक्ट मुव्हमेंट सुरू केली. अण्णा दुराई, करूणानिधी यांनी ही चळवळ मजबूत केली. अब्राह्मणी राजकीय चळवळ देशात सर्वात मजबूत आहे ती तमीळनाडू मध्ये.
- मद्रास सरकारने 1927 साली शासकीय नोकर भरतीमध्ये मागासांसाठी सुमारे 90% आरक्षणाची व्यवस्था केली.
- 26 जानेवारी 1950 पासून भारतीय राज्यघटना लागू झाली. त्यानुसार मद्रास राज्यात आरक्षणाची घटनात्मक सोय उपलब्ध करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात तरतूद केल्याप्रमाणे अनु. जाती. व अनु. जमाती यांना आरक्षण मिळू लागले.
- आरक्षण विरोधातील पहिली केस मद्रासमध्ये दाखल झाली. चंपाकम दोराय राजन म्हणून मे 1951 मध्ये या राखीव जागा सुरक्षित ठेवण्यासाठी पहिली घटना दुरूस्ती करण्यात आली. पहिली घटना दुरूस्ती आरक्षणासाठी आणि मद्रास सरकारच्या तमीळनाडूच्या आग्रहावरून झाली.
- लगेच 1951 साली अनु.जाती/जमातींसाठी 16% आणि ओबीसींसाठी 25% अशी आरक्षणात वाढ करण्यात आली. एकुण आरक्षण 41%
- 1980 मध्ये ओबीसी आरक्षण 25% वरून 31% केले गेले.
- 1989 मध्ये तमीळनाडू सरकारने पंचवीस हजार 25000 शासकीय कर्मचार्यांना राज्याच्या जनगणनेचे काम दिले. त्यांनी प्रत्येक नागरिकाची जातीनिहाय मोजदाद केली. या खानेसुमारीनुसार तमीळनाडूत आदिवासी 1% आहेत. अनुसुचित जमातींचे नागरिक 18% आहेत. तर सामाजिक व शैक्षणिक मागास वर्गाची ओबीसींची लोकसंख्या 68% असल्याचे दिसून आले.
- तमीळनाडूत प्रगत जातींच्या नागरिकांची संख्या तेरा टक्के आहे असे सिद्ध झाले.
- या लोकसंख्येच्या आधारावर सरकारने ओबीसी आरक्षण वाढवले. 1989 मध्ये ओबीसी आरक्षण 50% केले गेले.
- 13 ऑगष्ट 1990 रोजी पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग यांनी केंद्रीय पातळीवर ओबीसींसाठी मंडल आयोग लागू केला. तमीळनाडूमध्ये ते आरक्षण आधीच दिलेले होते.
- 16 नोव्हेंबर 1992 ला मंडल आयोगाच्या इंद्र साहनी वि. भारत सरकार निकालपत्रात सर्वोच्च न्यायालयाने एकुण आरक्षण 50% पेक्षा कमी असावे असा आदेश दिला.
- 1992 मध्ये तमीळनाडू सरकारने ओबीसी आरक्षित गटाचे विभाजन करून ओबीसींसाठी 30% आणि त्यातील एमबीसींसाठी 20% आरक्षण अशी तरतूद केली.

- 1994 मध्ये हा आरक्षण कायदा, घटना दुरूस्ती करून घटनेच्या नवव्या सुचीत घालण्यात आला. नवव्या सुचीतील कायद्यांना न्यायालयात आव्हान देता येत नाही. नवव्या अनुसूचीमध्ये आजवर एकुण 284 कायदे समाविष्ट केलेले आहेत.
- पाहा, भारतीय संविधान, भारत सरकार करिता, शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग, महाराष्ट्र राज्य, सातवी आवृत्ती, 2014, पृ. 224 ते 236
- त्यामुळे या कायद्यांच्या विरोधात न्यायालयात दाद मागता येत नव्हती.
- आता तेही न्यायप्रविष्ट बनलेले आहेत.
- सर्वोच्च न्यायालयाचे 29 वे सरन्यायाधीश न्या. आदर्श सेन आनंद यांनी नववी सुचीही न्यायालय तपासू शकते असा निकाल दिला. आक्टो. 1998 ते आक्टो. 2001 ते या पदावर होते.
- तमीळनाडू राज्यात मागासवर्गीयांची एकुण लोकसंख्या 87% आहे तर प्रगत जातींची लोकसंख्या 13% आहे.
- यास्तव 87% मागासवर्गीय नागरिकांना 69% आरक्षण असा त्या सरकारचा दावा आहे.
- 69% आरक्षणाचा तमीळनाडू पॅटर्न 2006 मध्ये न्यायप्रविष्ठ बनला.
- गेली 11 वर्षे 69% आरक्षणाच्या ह्या तमीळनाडू रिझर्व्हे शन पॅटर्नबाबत सर्वोच्च न्यायलयाच्या 9 न्यायाधिशांच्या घटनापिठापुढे बेंचपुढे सुनावणी चालू आहे.
- तमीळनाडू राज्यातील 69% आरक्षण हे मंडल आयोगाच्या आधीचे आहे. त्याला घटनेच्या नवव्या सुचीचे संरक्षण आहे.
- आणि तरिही ही बाब सध्या सर्वोच्च न्यायालयात 9 न्यायाधिशांच्या घटना पिठासमोर सुनावणीला असल्याने ही टक्केवारी सर्वोच्च न्यायालय कायम ठेवणार की 50% पर्यंत कमी करणार ते सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतरच कळू शकेल.
- सर्व प्रकारचे आरक्षण कोणत्याही परिस्थितीत 50% टक्क्यांपेक्षा कमीच असले पाहिजे असे स्पष्ट मत घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना सभेत 30 नोव्हेंबर 1948 रोजी व्यक्त केले होते. पाहा- घटना सभा चर्चा खंड, 7, लोकसभा सचिवालय प्रकाशन, भारत सरकार, नवी दिल्ली, पृ. 701/702
- आरक्षणामुळे गुणवत्ता मारली जाते, राज्याची प्रगती खुंटते हे सगळे आरोप तमीळनाडूने आजवर खोटे ठरवलेले आहेत.
- औद्योगिक विकासात देशात तमीळनाडू क्र. 1 वर असून महाराष्ट्र क्र. 2 वर आहे.
- मानव विकास निर्देशांकात देशातील मोठ्या राज्यांमध्ये पंजाब, महाराष्ट्र आणि तमीळनाडू ही राज्ये पहिल्या तीनमध्ये आहेत.
- ज्यांचे ढोल पिटले जाताहेत ती गुजरात, उ.प्र. राजस्थान, म.प्र. बिहार, आदी राज्ये प्रगतीमध्ये खूपच मागे आहेत.
- शिक्षणात मोठ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र क्रमांक 1 वर असून तमीळनाडू क्रमांक 2 वर आहे.
- राज्य आरोग्यासाठी प्रतिनागरिक दरडोई किती खर्च करते याचा विचार केला तर तमीळनाडू मोठ्या राज्यांमध्ये दुसर्या तर महाराष्ट्र सहाव्या क्रमांकावर आहे. बालमृत्यूच्या प्रमाणाचा विचार करता सर्वात कमी बालमृत्यू होणार्या राज्यांमध्ये महाराष्ट्र दुसर्या तर तमीळनाडू तिसर्या क्रमांकावर आहे.
- जीडीपीनुसार देशात महाराष्ट्र क्र. 1 वर आहे तर तमीळनाडू क्र. 2 वर आहे.
- राज्य भाषेचा तमीळ आग्रह, विकास, प्रचार आणि प्रसार यांत तमीळनाडू देशात प्रथम क्रमांकावर तर महाराष्ट्र मराठीबाबत देशात शेवटून पहिले म्हणजे एकुणात 36 वे राज्य.

***(लेखक राज्य मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य, ज्येष्ठ विचारवंत, लेखक व व्याख्याते आहेत.)***


## महत्त्वाची सूचना

अथक परिश्रमांची जिगिषा मनात बाळगून, सर्वंकष यशाची स्वप्ने उराशी कवटाळत...हजारो तरुण-तरुणी स्पर्धा परीक्षांचा मार्ग स्वीकारतात, प्रारंभीच्या काळात अडखळत-चाचपडत चाललेल्या या वाटचालीत, समज-असमज, भय-आशंका याचेच मनावर गारूड असते. विद्यार्थ्यांच्या नेमक्या याच मन:स्थितीचा फायदा उठवीत बाजारू दर्जा असलेली पुस्तके, नोट्स, बाजारात भाऊगर्दी करतात. आजपर्यंत पुस्तकांमध्ये तेच ते रितीरीवाजाप्रमाणे पाठीमागील माहिती आपल्याला पुढच्या पुस्तकात मिळते पण काहीतरी दुसऱ्यापेक्षा आगळीवेगळी माहिती देण्याचा प्रामाणिक प्रयत्न म्हणून गेल्या काही वर्षांपासून स्पर्धा परीक्षेच्या चळवळीमध्ये विविध उपक्रमांच्या माध्यमांतून कार्य करीत आहोत.


याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी @SAIMkatta टेलिग्राम चॅनेल सुरू केला आहे. त्यामध्ये - 1) **लेखमाला** 2) **चालू घडामोडी** 3) **सामान्यज्ञान** 4) **विषयानुसार अभ्यास साहित्य** 5) **सराव प्रश्नसंच** 6) **महत्त्वाच्या ट्रिक्स** 7) **अभ्याससंदर्भ पुस्तके** 8) **रोजगार वार्ता इत्यादींचा समावेश केला आहे.**

**जॉईन होण्यासाठी @SAIMkatta वरती क्लिक करा.**

# विभाग 6
# आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक पुरस्कार











## नोबेल पुरस्कार


- नोबेल पुरस्कार हा जगातील सर्वात प्रतिष्ठेचा पुरस्कार आहे.
- **रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, साहित्य, शांतता, वैद्यकशास्त्र आणि अर्थशास्त्र या एकूण सहा क्षेत्राकरिता हा पुरस्कार दिला जातो.**
- या सहा क्षेत्रात सर्वोत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना, क्वचित संस्थांना हा पुरस्कार दिला जातो.
- स्विडिश शास्त्रज्ञ आल्फ्रेड नोबेल (रसायन शास्त्रज्ञ) यांनी आपल्या मृत्युपत्रात तरतूद केली होती. त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ यांच्या पुण्यतिथीला **(10 डिसेंबर मानवी हक्क दिन) हा पुरस्कार दिला जातो.**
- पुरस्काराची सुरुवात आल्फ्रेड नोबेल यांच्या पाचव्या पुण्यतिथीपासून 1901 मध्ये करण्यात आली.
- या पुरस्काराचे स्वरूप 80 लाख स्विडीश क्रोनर असे आहे.
- या पुरस्काराचे वितरण स्वीडनची राजधानी स्टॉकहोम येथे केले जाते. पण शांततेचा नोबेल पुरस्कार नॉर्वेची राजधानी ओस्लो येथे दिला जातो.
- अर्थशास्त्राचे नोबेल देण्याची सुरुवात 1969 पासून करण्यात आली.
- भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व अर्थशास्त्र हा पुरस्कार देण्याचा अधिकार द रॉयल स्वीडीश ॲकेडमी ऑफ सायन्सला तर वैद्यकशास्त्राचा पुरस्कार देण्याचा अधिकार द रॉयल कॅरोलीन मेडीको-सर्जीकल इन्स्टिट्युटकडे आहे.
- शांततेचा पुरस्कार देण्याचा अधिकार नार्वेच्या संसदेने नेमलेल्या नॉवेजियन नोबेल कमिटीला, तर साहित्याचा पुरस्कार देण्याचा अधिकार स्विडीश ॲकॅडमीला आहे.

### नोबेल पुरस्कार विजेत्या भारतीय व्यक्ती

| **अ. क्र.** | **पुरस्कार प्राप्त व्यक्तीचे नाव** | **शोध** | **क्षेत्र** | **वर्ष** |
|---|---|---|---|---|
| 1. | रविंद्रनाथ टागोर | गीतांजली | साहित्य | 1913 |
| 2. | हरगोविंद खुराना | जेनेटिक कोड | वैद्यकशास्त्र | 1968 |
| 3. | मदर तेरेसा | शांतता | शांतता | 1979 |
| 4. | सुब्रमण्यम चंद्रशेखर | चंद्रशेखर लिमिट | भौतिकशास्त्र | 1983 |
| 5. | अमर्त्य सेन | वेलफेअर इकॉनॉमिक्स | अर्थशास्त्र | 1998 |
| 6. | व्ही. एस नायपॉल | एकूण साहित्य | साहित्य | 2001 |
| 7. | वेंकटरमन राम कृष्णन | रायबोझोम | रसायनशास्त्र | 2009 |
| 8. | कैलास सत्यार्थी | बालहक्क | शांतता | 2014 |

## नोबेल विषयक महत्त्वाचे :

- **नोबेल पुरस्कार मिळणारी सर्वात कमी वयाची व्यक्ती –** मलाला युसूफझई (18 वर्ष) शांतता नोबेल.
- **नोबेल पुरस्कार मिळणारे जेष्ठ व्यक्ती–**ऑर्थर आश्किन (96 वर्ष) भौतिकशास्त्रासाठी.
- 1972 पासून नोबेल पुरस्कार मरणोत्तर दिला जात नाही. आतापर्यंत दोन व्यक्तींना मरणोत्तर पुरस्कार मिळाला आहे. कार्लफेल्डर (1931) आणि हामसजोल्ड (1961)
- **मोहनदास गांधींना** पाच वेळा 1937, 1938, 1939, 1947, 1948) नोबेल नामांकन मिळाले पण नोबेल मिळाला नाही.
- रेड क्रॉस सोसायटीला तीन वेळा नोबेल पुरस्कार मिळाला आहे.
- मेरी क्यूरी, जॉन पाउलिंग, फेडरिक सेंगर, जॉन बारडींग यांना दोन वेळा नोबेल मिळाला आहे.
- पहिला शांततेचा नोबेल महिलेला 1901 मध्ये हेनरी दुनात यांना मिळाला. आतापर्यंत 16 महिलांना शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला आहे.
- दोन पुरस्कार - चार व्यक्तींना 1) मेरी क्युरी, 2) जॉन बार्डिन, 3) फ्रेडरिक संगेर, 4) लिनस पॉलिंग.
- रेडक्रॉस संस्थेला तीन वेळा तर यू.एन.एच.सी.आर. या संस्थेला दोन वेळा पुरस्कार मिळाला आहे.



# 2018 चे नोबेल पुरस्कार विजेते

## वैद्यकशास्त्राचा नोबेल




- **कर्करोगावरील क्रांतिकारी उपचार पद्धतीसाठी अमेरिकेचे जेम्स ॲलिसन आणि जपानचे तासुक होन्जो यांना यंदाचा वैद्यकशास्त्राचा नोबेल पुरस्कार 1 ऑक्टोबर 2018 रोजी जाहीर करण्यात आला.**
- शरीराची नैसर्गिक रोगप्रतिकारशक्तीच कर्करोगाशी कशी लढू शकते, हे या दोन संशोधकांनी दाखवून दिले. या संशोधनाने कर्करुग्णांना आशेचा किरण दाखवला आहे.
- **पुरस्काराची नऊ दशलक्ष स्वीडिश क्रोनर म्हणजे सात लाख 75 हजार पौंडाची रक्कम ॲलिसन आणि होन्जो यांना विभागून दिली जाईल, स्टॉकहोम येथील कॅरोलिन्स्का इन्स्टिट्यूटमध्ये या पुरस्काराची घोषणा करण्यात आली.**
- शरीराची संरक्षक यंत्रणा असलेल्या रोगप्रतिकारशक्तीचा उपयोग कर्करोगग्रस्त पेशींविरुद्ध करण्याची उपचारपद्धती होन्जो आणि जेम्स यांनी शोधून काढली. कर्करोगाच्या उपचार पद्धतींपैकी आजवरचे हे क्रांतिकारक संशोधन आहे.
- कर्करोगग्रस्त पेशींना नष्ट करण्यासाठी रेडियो थेरपी आणि केमोथेरपीचा वापर केला जातो नव्या संशोधनामुळे रुग्णाची प्रतिकारशक्तीच कर्करोगाच्या पेशींवर हल्ला करून त्यांना नष्ट करण्यास मदत करू शकेल. थोडक्यात रुग्धाची नैसर्गिक रोगप्रतिकारशक्तीच कर्करोगाशी लढा देईल, अशी ही उपचार पद्धती आहे.

## नोबेल कशासाठी?

- काही प्रथिने ही रोगप्रतिकारशक्ती यंत्रणेत अडथळा आणतात, असे डॉ. अलिसन आणि डॉ. होन्जो यांनी 1990 मध्ये दाखवून दिले.
- रोगप्रतिकारशक्तीच्या कार्यात अडथळा आणणाऱ्या प्रथिनांमुळे रक्तातील टी पेशी काम करीत नाहीत. त्यांची कर्करोगग्रस्त पेशींवर हल्ल्याची क्षमता मर्यादित होते. ज्या प्रथिनांमुळे हा दोष निर्माण होतो, तो दूर करण्याचा उपाय या दोघांनी शोधला, त्यातून कर्करोग बरा होण्याचे प्रमाण खूप वाढले.
- कर्करोगात शस्त्रक्रिया, रेडिओथेरपी, केमोथेरपी अशा उपचारपद्धती आहेत. या दोघांनी चौथी पद्धत शोधून काढली, कर्करोगाविरुच्या लढ्यातील ही क्रांतिकारी उपचारपद्धती आहे.


## कोण आहेत विजेते

### डॉ. होन्जो (वय 76)



- **हे जपानच्या क्योटो विद्यापीठात प्राध्यापक असून त्यांनी क्रांतिकारी संशोधन केले.** या आधी त्यांनी ओसाका विद्यापीठ, टोकियो विद्यापीठ, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ- वॉशिंग्टन येथे संशोधन केले होते.

### डॉ. अलिसन (वय70)



- अमेरिकेतील टेक्सास विद्यापीठात प्रतिकारशक्ती विभागाचे अध्यक्ष, अण्डरसन कर्करोण केंद्राचे प्रमुख, बर्कले येथील कॅलिफोर्निया विद्यापीठ व न्यूयॉर्कमधील मेमोरियल स्लोन केटरिंग कर्करोग केंद्रात संशोधन.

## रसायनशास्त्राचे नोबेल



- **द रॉयल स्वीडिश ॲकॅडमी ऑफ सायन्सेस' या संस्थेकडून रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार विजेत्यांची नावे जाहीर करण्यात आली.** या फ्रान्सिस एच, अरनॉल्ड, जॉर्ज पी. स्मिथ आणि सर ग्रेगरी पी. विंटर या तीघांना हा पुरस्कार विभागून देण्यात येणार आहे. गेल्या वर्षीचा म्हणजेच, 2017 सालचा रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार जॅकस इबोचेट, जोकीम फेंक आणि रिचर्ड हेंडरसन या तिघा शास्त्रज्ञांना विभागून देण्यात आला होता.
- अमेरिकेतील फ्रान्सिस अरनॉल्ड यांनी एन्झामाईन बनविण्याची थेट प्रक्रिया शोधून काढली आहे. अशापद्धतीने तयार केलेले एन्झामाईन जैविक इंधनापासून फार्मास्युटीकलमध्ये वापरण्यात येतील. यासोबतच स्मिथ आणि विंटर यांनीही अनुक्रमे प्रोटीन निर्मिती आणि रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी आवश्यक असणारा घटक बनविण्यासाठी सन्मानित करण्यात आले आहे.
- उत्क्रांतीच्या शक्तीचा वापर करून नवीं प्रथिने निर्माण करणाऱ्या

## नोबेल कशासाठी?

- डॉ. अरनॉल्ड यांनी वितंचकांच्या रूपातील अथिनांची उत्क्रांती प्रक्रिया उलगडली. डॉ. स्मिथ यांनी फेड डिस्प्लेची निर्मिती करुन जीवाणूला संसर्ग करणाऱ्या विषाणूच्या उदाहरणातून वितंचकांच्या रूपातील नव्या प्रथिनांची निर्मिती प्रक्रिया उलगडली. विंटर यांनी फेज डिस्प्लेचा वापर नवीन औषधांच्या निर्मितीसाठी केला.

### संशोधनाचे काहत्व का

- या संशोधनातून नवे रासायनिक पदार्थ वितंचकांच्या रूपात तयार करण्यात आले, त्यामुळे पर्यावरणस्नेही जैवइंधने निर्माण करता आली. कर्करोगासह इतर अनेक रोगांवर प्रथिन टेणेच्या म्हणजेच प्रगत वितंचकांच्या रूपात औषधे विकसित करणे शक्य झाले. उत्क्रांतीतूनच जनुकीय बदल होत हजारो पट वेगाने प्रथिनांचा वितंचकांच्या रूपात विकास झाला हे पहिल्यांदाच स्पष्ट करण्यात आले.

संशोधनाला या वर्षीचा रसायनशास्त्राचा नोबेल पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या प्रथिनांचा वापर जैवइंधनापासून औषधे आणि इतर उपचारांमध्येही करता येणे शक्य आहे.

- डार्विन यांचा उत्क्रांतीच्या सिद्धांताचा वापर प्रत्यक्ष परीक्षानळीत करून नवी प्रथिने तयार करण्याचे काम या तिघा शास्त्रज्ञांनी केले, असे नोबेल पुरस्कार समितीने म्हटले आहे.
- या शास्त्रज्ञांनी विकसित केलेल्या पद्धतीमुळे नवी एन्झाईम आणि नवी प्रतिपिंड (अँटिबॉडी) तयार करणे शक्य झाले. त्यामुळे पर्यावरणस्नेही रसायन उद्योगाकडे वाटचाल करणे शक्य होईल; तसेच विविध आजारांवर उपचार करून मानवी जीवन अधिक समृद्ध करता येऊ शकेल, असे पुरस्कार समितीने म्हटले आहे.
- डॉ. फ्रान्सेस अरनॉल्ड या कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ ग्रेगरी पी, विंटर टेक्नॉलॉजीमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी एन्झाइम तयार करण्यासाठी थेटपणे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांचा वापर करून दाखविला. **अरनॉल्ड या नोबेल पुरस्कार मिळविणाऱ्या अमेरिकेच्या केवळ पाचव्या महिला ठरल्या आहेत. यापूर्वी अदा योनाथ (2009), डोरोथी क्रोफूट हॉजकिन (1964), आयरन जोलिओट क्युरी (1935) आणि त्यांची आई मेरी क्युरी (1911) यांना पुरस्कार मिळाला आहे.**
- डॉ. जार्ज स्मिथ हे मिसुरी विद्यापीठात प्राध्यापक आहेत. त्यांनी फेज डिस्प्ले ही पद्धत विकसित केली त्याद्वारे नवी प्रथिने निर्माण करणे शक्य झाले
- सर ग्रेगरी विंटर हे ब्रिटनमधील कॅब्रिज विद्यापीठात कार्यरत आहेत. त्यांनी नव्या अँटिबॉडी शोधून काढल्या. त्याचा उद्देश नवी औषधे तयार करण्यासाठी होता, या अँटिबॉडीजच्या साह्याने विषद्रव्यांचा प्रभाव नष्ट करता येऊ शकतो. **पुरस्कार्थींना 90 लाख स्वीडीश क्रोनर देण्यात येणार आहेत. त्यापैकी निम्मी रक्कम अरनॉल्ड यांना, तर उर्वरित निम्मी रक्कम स्मिथ आणि विंटर यांना विभागून देण्यात येणार आहे.**


## कोण आहेत विजेते

### डॉ. फ्रान्सेस अरनॉल्ड :



- अमेरिका, रसायनशास्त्रात नोबेल मिळवणाऱ्या पाचव्या महिला, कलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (कालटेक) येथे संशोधन. स्तनाच्या कर्करोगातून वाचलेल्या एकल माता, त्यांना तीन मुलगे आहेत.

### डॉ. जार्ज स्मिथ :




- अमेरिका, मिसुरी विद्यापीठ बॅक्टेरिया फेजवर संशोधन.

### सर ग्रेगरी विंटर :



- ब्रिटन, प्रतिपिंड औषध उपचार पद्धतीचा शोध, कर्करोगावर संशोधन केंब्रिजमधील एमआरसी रेणवीय जीवशास्त्र प्रयोगशाळेत जनुकीय अभियंता.

## भौतिक शास्त्राचे नोबेल



- **जागतिक प्रतिष्ठेचे नोबेल पुरस्कार यंदा भौतिक शास्त्रातील तीन संशोधकांना जाहीर झाले आहे. आर्थर आश्कीन, गेरार्ड मोरौ आणि डोना स्टीक्लंड या संशोधकांना हा बहुमान मिळाला आहे.**
- गेरार्ड मोरौ आणि डोना स्टिक्लंड यांना हा पुरस्कार विभागून देण्यात आला आहे.
- दि रॉयल स्वेडीश ॲकडमी ऑफ सायन्सेसने या पुरस्काराची घोषणा केली. या तिघांनी लेझर फिजिक्स विषयात केलेल्या

## संशोधनाचे महत्त्व काय

- डॉ. मोरोऊ व डॉ. स्ट्रीक्लण्ड यांचे काम उच्चशक्ती लेझरशी संबंधित आहे. त्यांचे प्रत्यक्षात अनेक उपयोग असून डोळ्यांच्या शस्त्रक्रिया व औद्योगिक उत्पादन प्रक्रियेत त्याचा वापर होतो, अँशकिन यांनी प्रकाशीय चिमटे तयार केले, त्यातून सूक्ष्म गोष्टींच्या हालचाली नियंत्रित करता आल्या. विषाणू व जीवाणूही त्याच्या मदतीने पकडता येतात..

संशोधनाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला आहे. हे तंत्रज्ञान आरोग्य आणि उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वापरले जाते, लेसर परिक्षेत्राचा वापर करून जमीन किंवा भूपृष्ठ फोडण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.


- आर्थर आश्कीन यांनी ऑप्टिकल ट्रिजर्जसह केलेल्या जैविक प्रणालीचा विकास केला आहे. तर गेरार्ड मोरी आणि डोना स्टीक्लंड यांनी उच्च तिव्रता असणारे अल्ट्रा-शॉर्ट ऑप्टिकल प्लस ही प्रणाली विकसित केली आहे.

### 55 वर्षांनंतर महिला संशोधकाला नोबेल :

- **कॅनडामधील ओंटारियो विद्यापीठात संशोधक म्हणून कार्यरत असणाऱ्या डोना स्टिक्लंड यांनी नवा इतिहास रचला आहे. कारण, तब्बल 55 वर्षांनंतर एका महिला संशोधकाला नोबेल पुरस्कार मिळाला आहे.**
- यापूर्वी 1963 मध्ये मारिया मेयर यांना हा पुरस्कार मिळाला होता. त्यांनी न्यूक्लियर स्ट्रक्चरवर संशोधन केले होते. भौतिक शास्त्रात नोबेल पुरस्कारप्राप्त करणाऱ्या स्टिक्लंड या तिसऱ्या महिला संशोधक आहेत. पहिला पुरस्कार मैरी क्युरी र्थी यांना 1903 मध्ये मिळाला होता. रेडिओ ॲक्टिव्हिटीच्या संशोधनासाठी हा पुरस्कार त्यांना मिळाला होता.
- मैरी क्युरी, त्यांचे पती पियरे क्युरी आणि हैनरी बॅक्वेरल यांना हा संयुक्तपणे हा पुरस्कार मिळाला होता.
- अमेरिकेचे ॲशकिन यांना 90 लाख स्वीडिश क्रोनरमधील (1.01 दशलक्ष डॉलर्स) निम्मी रक्कम मिळणार असून इतर दोघांना उरलेली रक्कम वाटून दिली जाईल.
- ॲशकिन हे 96 वर्षांचे असून त्यांनी ऑप्टिकल ट्विझर्सचा शोध लावला. त्यामुळे अणू, विषाणू व जिवंत पेशी लेझर किरणांच्या बोटांनी पकडता येतात.
- **1987 मध्ये अँशकिन यांनी लेझर चिमटे वापरून जिवंत जीवाणु त्याला कुठली हानी न करता पकडून दाखवला होता. आश्कीन यांनी 1952 ते 1991 दरम्यान हे संशोधन केले होते. ते सर्वांत वयस्कर नोबेल विजेते आहेत, यापूर्वी 2007 मध्ये अर्थशास्त्राचे नोबेल लिओनिद हुरविझ यांना ते 90 वर्षांचे असताना मिळाले होते.**

## कोण आहेत विजेते

### डॉ. ॲशकिन



- वय 96, देश- अमेरिका, त्यांनी 1960 पासून लेसरवर संशोधन करून न्यूजर्सीतील बेल प्रयोगशाळेत काम केले.

### डॉ. स्ट्रीक्लण्ड



- वय 59, देश- कॅनडा, त्या भौतिशास्त्राचे नोबेल मिळवणाऱ्याा तिसऱ्या महिला असून त्या कॅनडातील वॉटलू विद्यापीठात सहायक प्राध्यापक आहेत. डॉ. मोराऊ यांच्या विद्यार्थिनी.

### डॉ. मारौ



- वय 74, देश-फ्रान्स, इकोल बहुतंत्रनिकेतनात लेसरवर संशोधन, रॉचेस्टर विद्यापीठातही 1980 पर्यंत संशोधन.

## शांततेचा नोबेल





- शांततेसाठी दिल्या जाणाऱ्या 2018 सालच्या नोबेल पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहेत. **यावर्षी डेनिस मुकवेगे आणि नादिया मुराद यांना शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार दिला जाणार आहे. या दोघांनीही युद्धभूमीवर लैंगिक अत्याचारांचा वापर शस्त्रासारखा करण्याविरोधात लढा सुरु केला होता.**
- यावर्षीच्या शांततेसाठीच्या नोबेलसाठी एकूण 331 जणांना नामांकन देण्यात आलं होतं. यात 216 व्यक्ती तर 115 संघटनांचा समावेश आहे. 2016 साली शांततेसाठीच्या नोबेलसाठी 376 व्यक्तींना नामांकन देण्यात आलं होतं, त्यामुळे यावर्षी नामांकनासाठीची दुसरी सर्वात मोठी संख्या होती.
- **आतापर्यंत शांततेसाठी 98 नोबेल पुरस्कार देण्यात आले आहेत.** ज्यात 104 व्यक्ती आणि 27 संघटनांचा समावेश आहे. **एकूण**

**104 नोबेल विजेत्यांपैकी 16 महिलांना हा पुरस्कार मिळाला** आहे.

- 2017 साली IC-N संस्थेला शांततेच्या नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. ही संस्था आण्विक शस्त्रांविरोधात काम करते. इंटरनॅशनल कँपेन टू एबोलिश न्यूक्लीअर वेपन्स असं या संस्थेचं पूर्ण नाव आहे.

## कोण आहेत विजेते

### डॉ. डेनिस मुक्वेगा :



- डॉ. मुक्वेगे काँगोचे आहेत, त्यांनी राष्ट्रीय आणि अंतरराष्ट्रीय पातळीवर युद्धातील लैंगिक हिंसाचाराच्या विरोधात सातत्याने आवाज उठविला.
- युद्धात सैनिकांनी बलात्कार केलेल्या आणि लैंगिक हिंचाराची शिकार ठरलेल्या महिलांवर डॉ. मुक्वेगा उपचार करीत आहेत. अशा महिलांना लैंगिक अत्याचाराच्या धक्क्यातून बाहेर काढण्याचे आव्हानात्मक काम ते दोन दशकांपासून करीत आहेत.
- डॉ. मुक्वेगा 63 वर्षांचे आहेत.

### नादिया मुराद :



- नादिया मुराद या इराकच्या असून त्या यझिदी या अल्पसंख्याक समाजातील आहेत.
- इस्लामिक स्टेट ऑफ इराक ॲण्ड सीरिया (आयसिस) या दहशतवादी संघटनेने नादिया यांचे अपहरण केले.
- आयसिसच्या दहशतवाद्यांनी त्यांचे तीन महिने लैंगिक शोषण केले, दहशतवाद्यांच्या तावडीतून निसटल्यानंतर नादिया यांनी महिलांच्या लैंगिक अत्याचाराला वाचा फोडली. त्याविरोधात जनजागृती केली.
- नादिया 25 वर्षांच्या आहेत.



## अर्थशास्त्राचा नोबेल

- दीर्घकालीन शाश्वत विकास साध्य करण्याच्या हेतूने आर्थिक विकासाची पर्यावरणाच्या संवर्धनाशी सांगड घालणाऱ्या संशोधनासाठी अमेरिकी अर्थतज्ज्ञ विल्यम नॉर्डहौस व पॉल रोमर यांचा सन्मान करण्यात आला.

### विल्यम नॉर्डहौस :



- येल विद्यापीठात प्राध्यापक, दीर्घकालीन व सूक्ष्म अर्थशास्त्रीय विश्लेषणात पर्यावरणाचा समावेश.
- 1990 च्या दशकात अर्थव्यवस्था व वातावरण यांच्यातील आंतरसंबंधाचे प्रारूप तयार केले. हे प्रारूप Integrated Assessment Model नावाने ओळखले जाते.
- मानवी वर्तनाचा पर्यावरणावर होणारा परिणाम' हा अभ्यासाचा विषय. वातावरण बदलाचे विश्लेषण चुकवली जाणारी किंमत व फायदे (Cost & Benefit) स्वरूपात शक्य व्हावे, असा आराखडा निश्चित करण्याचा प्रयत्न, हरितगृह वायूंच्या उत्सर्जनावरची प्रभावी उपाययोजना म्हणजे कार्बन कराची जागतिक संरचना विकसित करून लागू करणे.

### पॉल रोमर :



- न्यूयॉर्क विद्यापीठाच्या स्टर्न स्कूल ऑफ बिझनेसमध्ये प्राध्यापक, जागतिक बँकेचे माजी अर्थतज्ज्ञ, कल्पनाशक्ती ही इतर घटकांपेक्षा वेगळी असते व तिला बाजारपेठेत यशस्वी करण्यासाठी विशिष्ट परिस्थिती आवश्यक असते, हा सिद्धांत, नियमन न केली जाणारी अर्थव्यवस्था तांत्रिक बदल घडवून आणते; परंतु संशोधन व नवोन्मेषी विकास घडविण्यात अपुरी पडते.
- त्यामुळे शासनाने संशोधन व नवोन्मेषी विकासासाठी अनुदान द्यावे. आजवरच्या स्थूल अर्थशास्त्रामध्ये तांत्रिक शोध कसे आर्थिक वाढीसाठी साहाय्यकारी ठरतात याचे विश्लेषण.
- परंतु नवीन तंत्रज्ञान विकासास बाजारपेठ व अर्थव्यवस्थेचे निर्णय कसे प्रभावित करतात याकडे दुर्लक्ष. कल्पनाशक्तीच्या आधारावरील वाढ ही काळाच्या निकषावर जास्त शाश्वत ठरते.
- यांचे संशोधन 'Endogenous Growth Theory' नावाने प्रसिद्ध.


## साहित्याचा नोबेल



- स्वाडीश ॲकॅडमीन यंदा साहित्यातला नोबेल न देण्याचा निर्णय घेतला आहे. ॲकॅडमीतल्या सदस्यांच्या पतीवर झालेल्या लैंगिक छळाच्या आरोपामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.
- पुढच्या वर्षी 2018 आणि 2019 या दोन्ही वर्षाचा पुरस्कार जाहीर करण्यात येईल. अस ॲकॅडमीकडून स्पष्ट करण्यात आले आहे.
- आतापर्यंत फक्त सात वेळा हा पुरस्कार जाहीर करण्यात आलेला नाही. महायुद्धाच्या काळातील सहा वर्ष आणि 1935 मध्ये योग्य पुरस्कारार्थी नसल्याने हा पुरस्कार कुणालाही देण्यात आला नव्हता.
- **स्विडीश ॲकॅडमीच्या साहित्याच नोबेल ठरविणाऱ्या समितीच्या तत्कालीन सदस्य कॅटरिना प्रोस्टेन्सन यांचे पती जीन स्लाउड अरनॉल्ट यांच्या विरोधात 18 महिलांनी लैंगिक छळाचा आरोप केला.**
- इतकंच नाही तर अरनॉल्ट यांनी स्विडीश ॲकॅडमीकडून अर्थसहाय्य घेऊन एक प्रकल्प हाती घेतला होता. म्हणजेच त्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. तेव्हा फ्रोस्टेन्सन यांना राजीनामा देणे भाग पडलं.
- त्यानंतर सात सदस्यांनी आपला राजीनामा दिला होता. या समितीमध्ये 18 सदस्य असतात.
- नोबेल पुरस्कारासाठी 12 सदस्यांनी मतदान करण आवश्यक असत पण सध्या समितीमध्ये फक्त 11 सदस्य आहेत. त्यामुळे हा पुरस्कार पुढील वर्षी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



## मॅन बुकर पुरस्कार – 2018



- **2018 चा मॅन बुकर पुरस्कार उत्तर आयर्लंडमधील लेखिका ॲना बर्न्स यांच्या मिल्कमन या कादंबरीला देण्यात आला आहे.**
- **हा पुरस्कार मिळणाऱ्या त्या उत्तर आयर्लंडमधील पहिल्याच लेखिका आहेत. तसेच सतराव्या महिला ठरल्या आहे.**
- विसाव्या शतकाच्या अखेरीस उत्तर आयर्लंडमध्ये उद्‌भवलेल्या राजकीय संघर्षाच्या पार्श्वभूमीवर एक तरूण महिला आणि एक विवाहित पुरुष यांच्या प्रेमप्रकरणाची कहाणी मिल्कमन मध्ये रंगविण्यात आली आहे.

### पुरस्काराविषयी


- **पुरस्काराची सुरुवात –** 1969 पासून
- **पुरस्काराची स्वरुप –** 50 हजार पौंड.
- **पुरस्कार देणारी संस्था/देश –** मॅन ग्रुप इंग्लंड युनायटेड किंग्डम)
- **पहिला पुरस्कार –** पी.एच.न्युबॉय (समथिंग टू आन्सर फॉरसाठी)
- **2016 चा पुरस्कार –** पॉल बेटी (द सेल आऊट)
- **2017 चा पुरस्कार –** जॉर्ज सॉडर्स
- **दोन वेळा पुरस्कार मिळणारी महिला –** हिलरी मॅटल.
- राष्ट्रकूल परिषद सदस्य देश ऑयलँड व झिम्बाब्वे यांना हा पुरस्कार दिला जात होता.
- 2014 मध्ये बद्दल करून सर्व देशांच्या इंग्रजी लेखन करणाऱ्या ब्रिटनमध्ये प्रकाशित झालेल्या साहित्यिकांना दिला जातो.

**मॅन बुकर पुरस्कार मिळणारे भारतीय**

| क्र. | वर्ष | मानकरी | कादंबरी |
|---|---|---|---|
| 1. | 1971 | व्ही.एस. नायपॉल | एन अ फ्री स्टेट |
| 2. | 1981 | सलमान रश्दी | मिडनाईट चिल्ड्रेन |
| 3. | 1997 | अरुंधती रॉय | द गॉड ऑफ स्मॉल थिंग |
| 4. | 2006 | किरण देसाई | इन द हेरीटेल्स ऑफ लॉस |
| 5. | 2008 | अरविंद अडिगा | द व्हाईट टायगर |
| 6. | 2017 | जॉर्ज सॉडर्स | लिंकन इन बार्डो |

# विभाग 7

# क्रिडा घडामोडी
















## जागतिक बॉक्सिंग स्पर्धेत मेरी कोम सहाव्यांदा जगज्जेतेपद



- **भारताची आघाडीची बॉक्सर मेरी कोमने 24 नोव्हेंबर 2018 रोजी इतिहास रचला. महिलांच्या जागतिक बॉक्सिंग स्पर्धेत तिने 48 किलो वजनी गटात युक्रेनच्या हुँना ओख्रोतावर 5–0 असा निर्भेळ विजय मिळवून जागतिक स्पर्धेतील सहाव्या सुवर्णपदकावर मोहोर उमटविली.**
- जागतिक स्पर्धेत सहा सुवर्णपदके जिंकणारी मेरी कोम ही पहिलीच महिला बॉक्सर ठरली आहे.
- 35 वर्षीय मेरी कोमने अंतिम फेरीत धडक मारली तेव्हाच तिच्याकडून सुवर्णपदकाची अपेक्षा होती. आता जागतिक स्पर्धे त तिच्या खात्यात 6 सुवर्णपदके आणि एक रौप्य अशी सात पदके जमा आहेत. हे सुवर्णपदक जिंकल्यानंतर मेरीला अश्रू आवरले नाहीत. तिने उपस्थित चाहत्यांना अभिवादन केले. नंतर तिरंगा स्वतःभोवती गुंडाळून तिने चाहत्यांचे आभार मानले.
- जागतिक स्पर्धेआधी, मेरी कोम आणि आयर्लंडची केंटी टेलर यांच्यात पदक संख्येच्या बाबतीत बरोबरी होती. कॅटीच्या खात्यात 5 सुवर्ण आणि एक ब्राँझ आहे. मेरीकडे तेव्हा पाच सुवर्ण आणि एक रौप्य होते. टेलर आता व्यावसायिक बॉक्सिंगमध्ये स्थिरस्थावर झाली आहे.
- मेरीने पुरुष बॉक्सिंगमधील फेलिक्स सॅव्हॉनच्या विक्रमाशी बरोबरी केली. (फेलिक्सने जागतिक स्पर्धेत सहा सुवर्ण) आणि एक रौप्यपदक पटकावले आहे. ।

### दृष्टिक्षेप...

- मेरी कोमने जागतिक स्पर्धेत सहाव्यांदा सुवर्ण पटकावले. यापूर्वी, 2002 (45 किलो), 2005 (46 कि.), 2006 (46 कि.), 2008 (46 कि.), 2010मध्ये (48 कि.) मेरी कोमने सुवर्ण पटकावले होते. तसेच, 2001मध्ये मेरी कोमने रौप्यपदक मिळविले होते.
- महिलांच्या वर्ल्ड बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये सहा सुवर्ण पटकाविणारी मेरी कोम पहिलाच बॉक्सर ठरली. मेरी कोमने आयलंडच्या कटा टेलरला मागे टाकले. कॅटीने 2006 ते 2016 दरम्यान पाच सुवर्णपदके पटकावली होती.
- 'एआयबीए वल्र्ड बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये सहा सुवर्ण आणि एक रौप्य पटकाविणारी मेरी कोम दुसरीच बॉक्सर ठरली. यापूर्वी पुरुषांच्या 91 किलो गटात क्युबाच्या फेलिक्स सँव्हॉनने 1986 ते 1999दरम्यान सहा सुवर्ण आणि एक रौप्य पटकावले होते. फेलिक्सच्या या विक्रमाशी मेरी कोमने बरोबरी साधली.
- यंदाच्या स्पर्धेत भारताने 1 सुवर्ण, 1 रौप्य आणि 2 ब्राँझपदके मिळविली. मेरी कोमने सुवर्ण, सोनियाने रौप्य आणि सिमरनजीत कौर (64 कि.), लहलिना (69 कि.) यांनी आँझ मिळविले.

## आशियाई क्रिडा स्पर्धा : 2018




- **18 वी आशियाई क्रिडा स्पर्धा 18 ऑगस्ट 2018 रोजी इंडोनेशियाची राजधानी जर्कार्ता येथे सुरू झाली. यापूर्वी इंडोनेशियामध्ये 1986 मध्ये ही स्पर्धा आयोजित केली होती.**
- भारताचे 570 स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. ही स्पर्धा इडोनेशियात जकार्तामधील पालेमबांग येथे पार पडली असून या स्पर्धेचे बोधवाक्य 'आशियाई ऊर्जा' हे ठरविण्यात आले होते.
- 18 व्या आशियाई स्पर्धेचे शुभंकर म्हणून भीन-भीन ग्रेटर बर्ड ऑफ पॅराडाईस्, अटंग या बेवीन हरणाची तर काका या जावाचीन गेंड्याची आशा तिघांची निवड करण्यात आली.
- या स्पर्धेत 45 देशांच्या 11,648 खेळाडूंनी सहभाग घेतला होता. तसेच 40 खेळांतील 465 प्रकार स्पर्धेत खेळविले गेले. यावर्षी पहिल्यांदा ई-स्पोर्टस् व कॅनाई पोलो हे दोन नवीन क्रिडा प्रकार खेळविण्यात आले.
- भारतातर्फे उद्घाटन संचालनाच्या ध्वज धारकाचा मान निरज चोप्रा (भालाफेक) तर समोरीपीय संचलनाच्या ध्वजधारकाचा मान राणी रामपाल (हॉकी कर्णधार) यांना देण्यात आला होता.
- भारतासाठी या स्पर्धेचे पहिले सुवर्णपदक बजरंग पुनिया (कुस्ती) यांनी पटकविले तर भारताकडून शेवटचे पदक प्रणव वर्धन व



शिवनाथ सरकार यांनी पटकविले.

- भारताने यावर्षीच्या स्पर्धेत आतापर्यंतच्या आशियाई स्पर्धेत सर्वाधिक (69) पदके मिळविली. यापूर्वी चीनमध्ये झालेल्या स्पर्धेत 65 पदक पटकविली होती.
- 18 व्या आशियाई स्पर्धेत 465 सुवर्ण, 465 रजत व 622 कास्य असे 1522 पदकाचे वाटप करण्यात आले.

**इंडोनेशियातील एशियाडचा पदतक्ता**

| क्र. | देश | सुवर्ण | रौप्य | ब्राँझ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | चीन | 132 | 92 | 65 | 289 |
| 2 | जपान | 75 | 56 | 74 | 205 |
| 3 | द.कोरिया | 49 | 58 | 70 | 107 |
| 4 | इंडोनेशिया | 31 | 24 | 43 | 98 |
| 5 | उझबेकिस्तान | 21 | 24 | 43 | 98 |
| 6 | इराण | 20 | 20 | 22 | 62 |
| 7 | तैपेई | 17 | 19 | 31 | 67 |
| **8** | **भारत** | **15** | **24** | **30** | **69** |
| 9 | कझाकस्तान | 15 | 17 | 44 | 76 |
| 10 | उ.कोरिया | 12 | 12 | 13 | 37 |
| 11 | बहारिन | 12 | 7 | 7 | 26 |
| 12 | थायलंड | 11 | 16 | 46 | 73 |
| 13 | हाँगकाँग | 8 | 18 | 20 | 46 |
| 14 | मलेशिया | 7 | 13 | 16 | 36 |
| 15 | कतार | 6 | 4 | 3 | 13 |
| 16 | मंगोलिया | 5 | 9 | 11 | 25 |
| 17 | व्हिएतनाम | 4 | 16 | 18 | 38 |
| 18 | सिंगापूर | 4 | 4 | 14 | 22 |
| 19 | फिलिपिन्स | 4 | 2 | 15 | 21 |
| 20 | युएई | 3 | 6 | 5 | 14 |

**भारताची 2018 एशियाड कामगिरी**

| देश | सुवर्ण | रौप्य | ब्राँझ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ॲथलेटिक्स | 7 | 10 | 2 | 19 |
| नेमबाजी | 2 | 4 | 3 | 9 |
| कुस्ती | 2 | 0 | 1 | 3 |
| ब्रिज | 1 | 0 | 2 | 3 |
| रोइंग | 1 | 0 | 2 | 3 |
| टेनिस | 1 | 0 | 2 | 3 |
| बॉक्सिंग | 1 | 0 | 1 | 2 |
| तिरंदाजी | 0 | 2 | 0 | 2 |
| अश्वारोहण | 0 | 2 | 0 | 2 |
| स्क्वॉश | 0 | 1 | 4 | 5 |
| सेलिंग | 0 | 1 | 2 | 3 |
| बॅडमिंटन | 0 | 1 | 1 | 2 |
| हॉकी | 0 | 1 | 1 | 2 |
| कबड्डी | 0 | 1 | 1 | 2 |
| कुराश | 0 | 1 | 1 | 2 |
| वुशू | 0 | 0 | 4 | 4 |
| टेबल टेनिस | 0 | 0 | 2 | |
| सेपाक टकरॉ | 0 | 0 | 1 | 1 |
| **एकूण** | **15** | **24** | **30** | **69** |

**भारतातर्फे सुवर्णपदक विजेते**

| क्र. | खेळाडूचे नांव | क्रीडाप्रकार |
|---|---|---|
| 1 | बजरंग पुनीया कुस्ती | (65 किलो फ्रीस्टाइल पुरुष गट) |
| 2 | विनेश फोगट | कुस्ती (50 किलो फ्रीस्टाइल महिला गट) |
| 3 | सौरभ चौधरी | नेमबाजी (10 मी पिस्तुल नेमबाजी पुरुष) |
| 4 | राही सरनोबत | नेमबाजी (25 मी पिस्तुल नेमबाजी महिला गट) |
| 5 | सवर्ण सिंग, दत्तू भोकनळ | रोइंग |
| | आन प्रकाश, सुखमित सिंग | |
| 6 | रोहन बोपण्णा, द्विज शरण | टेनिस (पुरुष दुहेरी) |
| 7 | तजिंदरपाल सिंग तुर | ॲथलेटिक्स (पुरुष शॉट पुट) |

| | | |
|---|---|---|
| 8 | नीरज चोप्रा | ॲथलेटिक्स (पुरुष भालाफेक) |
| 9 | मनजित सिंग | ॲथलेटिक्स (पुरुष 800 मी.) |
| 10 | अरपिंदर सिग | ॲथलेटिक्स (पुरुष ट्रिपल जंप) |
| 11 | स्वप्ना बर्मन | ॲथलेटिक्स (महिला हेप्थेलॉन) |
| 12 | जिन्सन जॉनसन | ॲथलेटिक्स (पुरुष 1500 मी.) |
| 13 | एम.आर. पुवाम्मा, सरिताबेन गायकवाड, हिमादास, विस्मया | ॲथलेटिक्स (महिला 4 x 400 रिले ) |
| 14 | अमित पंगल | बॉक्सिंग (लाइट फ्लायवेट 49 किलो) प्रणब बर्धन, शिवनाथ सरकार |

## आशियााई स्पर्धेविषयी

- **स्पर्धेचे आयोजन :** दर चार वर्षांनी
- **पहिल्या (भारतात) आशियाई स्पर्धेचे आयोजन :** 1951 (एशियन्स गेम्स फेडशनतर्फे)
- **आशियाई स्पर्धेचे आयोजन देश:** 9 (46 देशांनी सहभाग)
- **भारतात आशियाई स्पर्धेचे आयोजन :** दोन वेळा (1951, 1992)
- **आशियाई नेमबाजीत सुवर्ण विजेती पहिली महिला :** राही सरनोबत
- **आशियाई कुस्तीत सुवर्ण पदक विजेती पहिली महिला :** विनेश फोगट
- **आशियाई भालाफेकीत पहिले सुवर्ण पदक विजेते :** निरज चोप्रा

### आशियाई स्पर्धेचे आयोजन

| वर्ष | देश | आयोजन शहर |
|---|---|---|
| 2002 | दक्षिण कोरिया | बुसान |
| 2006 | कतार | दोहा |
| 2010 | चीन | ग्वांगची |
| 2014 | दक्षिण कोरिया | इचेऑन |
| 2018 | इंडोनेशिया | जाकार्ता, पॅलेम्बर्ग |
| 2022 | चीन | हांगचौ |
| 2026 | जपान | नागोया |

## बिसीसीआयसाठी घटनेच्या नव्या मसूद्याला मान्यता

- एक राज्य, एक मत आणि पदाधिकाऱ्यांचा कार्यकाल याबाबतीत नियम शिथिल करण्याची भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची (बीसीसीआय) मागणी अखेर सर्वोच्च न्यायालयाने मान्य केली आणि या काही सुधारणांसह न्यायालयाने बीसीसीआयच्या घटनेचा सुधारित मसुदा मंजूर केला.
- बीसीसीआयशी संलग्न असलेल्या काही संघटनांनी याआधीच सर्वोच्च न्यायालयाने मान्य केलेल्या न्या. राजेंद्र लोढा समितीच्या शिफारशी मंजूर केल्या होत्या. पण काही संघटनांचा पदाधिकाऱ्यांची कार्यकाल आणि एक राज्य, एक मत या मुद्यावरून संघर्ष सुरू होता.
- लोढा समितीने आपल्या शिफारशीत म्हटले होते की, तीन वर्षाचा एक कार्यकाल संपुष्टात आल्यानंतर पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यकालासाठी तीन वर्षांचा विराम घ्यावा लागेल. त्याशिवाय, लोढा समितीने एक राज्य, एक मत याचीही शिफारस केली होती. त्यामुळे मुंबई, विदर्भ, सौराष्ट्र, बडोदा तसेच रेल्वे, सेनादल आदिंचे मतांचे अधिकार हिरावून घेतले जाणार होते.
- सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आताच्या आदेशात म्हटल्याप्रमाणे, मुंबई, सौराष्ट्र, बडोदा, विदर्भ, रेल्वे, सेनादल, विद्यापीठ संघ यांचा मतदानाचा अधिकार अबाधित राहणार आहे. याआधी, महाराष्ट्र व गुजरात या अंतर्गत येणाऱ्या तीन्न राज्य संघटनांना क्रमाक्रमाने हे अधिकार बहाल करण्यात आले होते.

## आता निवड समिती पाच सदस्यांची

- एमएसके प्रसाद यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय निवड समिती यानंतर पुन्हा कार्यरत राहण्याची शक्यता नाही, नव्या घटनेत निवड समिती ही पाच सदस्यांची असणे गरजेचे आहे. मुख्य न्यायाधीश दीपक मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील न्या. खानविलकर व न्या. चंद्रचूड यांच्या पीठाने नव्या घटना मसुद्याला मंजुरी दिली. आता नव्या नियमानुसार निवड समिती केवळ कसोटीपटूच निवड समितीत असावेत हा निकष बदलण्यात येऊन कसोटी, 10 वनडे किंवा 30 प्रथम श्रेणी क्रिकेट खेळणारी व्यक्ती निवड समिती सदस्य बनू शकते.

# विभाग 8

# परीक्षाभिमुख अहवाल निर्देशांक











## मानव विकास अहवाल 2018

- **संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाकडून 2017चा मानव विकास अहवाल 14 सप्टेंबर 2018 रोजी प्रकाशित करण्यात आला.**
- **यावर्षीच्या अहवालाचा विषय युवा लोकसंख्येच्या संधीसाठी नियोजन (Planning opportunity for a yothful population)** असा आहे.
- **या अहवालामध्ये 189 देशांचे मुल्यांकन करण्यात आले असून त्यामध्ये भारताचा 130 वा (0.640) क्रमांक आहे.**
- पहिल्या पाचमध्ये नॉर्वे (0.953), स्वित्झर्लंड (0.944), ऑस्ट्रेलिया (0.939), आयर्लंड (0.938), जर्मनी (0.936), सेंटर आफ्रिकन रिपब्लिक (0.367), द. सुदान (0.388), छाद (0.404), अफगाणिस्तान (0.498), क्रमांक लागतो.

### मानव विकास निर्देशांक – 2018

| पहिले पाच देश | | | शेवटचे पाच देश | | |
|---|---|---|---|---|---|
| क्र | देश | HDI मूल्य | क्र | देश | HDI मूल्य |
| 1 | नॉर्वे | 0.953 | 185 | बुरुंडी | 0.417 |
| 2 | स्वित्झर्लंड | 0.944 | 186 | चाद | 0.404 |
| 3 | ऑस्ट्रेलिया | 0.939 | 187 | द. सुदान | 0.388 |
| 4 | आयर्लंड | 0.938 | 188 | मध्य आफ्रिका रिपब्किक | 0.67 |
| 5 | जर्मनी | 0.936 | 189 | नायजर | 0.354 |

### काही महत्त्वाच्या देशांचे मानव विकास निर्देशांक

| क्र | देश | मूल्य |
|---|---|---|
| 13 | अमेरिका (युएसए) | 0.924 |
| 14 | इंग्लंड (यु के) | 0.922 |
| 19 | जपान | 0.909 |
| 49 | रशिया | 0.816 |
| 76 | श्रीलंका | 0.770 |
| 79 | ब्राझील | 0.759 |
| 86 | चीन | 0.752 |
| 101 | मालदीव | 0.717 |
| 113 | दक्षिण आफ्रिका | 0.699 |
| 130 | भारत | 0.640 |
| 134 | भूतान | 0.612 |
| 136 | बांग्लादेश | 0.608 |
| 148 | म्यानमार | 0.578 |
| 149 | नेपाळ | 0.574 |
| 150 | पाकिस्तान | 0.562 |

### मानव विकास अहवालाविषयी

- **मानव विकास अहवालाची सुरूवात :** 1990
- **मानव विकास अहवालाचे श्रेय / संकल्पना :** अमर्त्य सेन व मेहबुब-उल-हक
- **मानव विकास अहवाल सर्व प्रथम प्रसिद्ध करणारे राज्य :** मध्यप्रदेश
- **मानव विकास अहवालाचे निकष :** अपेक्षित आयुर्मान, शिक्षणाचा निर्देशांक, जीवनमानाचा दर्जा
- **मानव विकास निर्देशांकात सर्वाधिक वेळा प्रथम देश :** नॉर्वे (14 वेळा)


### जिल्हा निहाय मानव विकास निर्देशांक – 2012

| जिल्हा | मानव विकास निर्देशांक 2012 (2011 नुसार) | माविनि स्थिती |
|---|---|---|
| नंदुरबार | 0.604 | अल्प |
| गडचिरोली | 0.608 | |
| वाशिम | 0.646 | |
| हिंगोली | 0.648 | |
| उस्मानाबाद | 0.649 | |
| नांदेड | 0.657 | |
| जालना | 0.657 | |
| लातूर | 0.663 | |
| धुळे | 0.671 | |
| बीड | 0.678 | मध्यम |
| परभणी | 0.683 | |
| बुलढाणा | 0.684 | |

| | | |
|---|---|---|
| यवतमाळ | 0.700 | |
| गोंदिया | 0.701 | |
| अमरावती | 0.701 | |
| भंडारा | 0.718 | |
| चंद्रपूर | 0.718 | |
| अहमदनगर | 0.720 | उच्च |
| अकोला | 0.722 | |
| वर्धा | 0.723 | |
| जळगाव | 0.723 | |
| औरंगाबाद | 0.727 | |
| सोलापूर | 0.728 | |
| रत्नागिरी | 0.732 | |
| सातारा | 0.742 | |
| सांगली | 0.742 | अति उच्च |
| नाशिक | 0.746 | |
| सिंधुदुर्ग | 0.753 | |
| रायगड | 0.759 | |
| कोल्हापूर | 0.770 | |
| नागपूर | 0.786 | |
| ठाणे | 0.800 | |
| पुणे | 0.814 | |
| मुंबई | 0.841 | |
| **महाराष्ट्र** | **0.752** | |

## चालू आर्थिक गुंतवणूकीत कर्नाटक प्रथम

- चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तीन तिमाहींमध्ये गुंतवणुकीसाठी कर्नाटकला पहिले प्राधान्य मिळाल्याचे दिसून आले आहे. गुंतवणुकीच्या बाबतीत कर्नाटकने महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांना पिछाडीवर टाकले आहे.




- केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार कर्नाटकमध्ये एकूण 83 हजार 236 कोटी रुपयांचे गुंतवणूक प्रस्ताव आले आहेत. संपूर्ण देशभरात चालू 58 या पहिल्या तिमाहीत आलेल्या 3.38 लाख कोटी रुपयांच्या एकूण गुंतवणूक प्रस्तावांपैकी 25 टक्के प्रस्ताव एकट्या कर्नाटकमध्ये आहेत.
- गुंतवणुकीसाठी इच्छुक असणाऱ्या प्रस्तावित प्रकल्पांपैकी सहा टक्के प्रकल्पांनी कर्नाटकला पसंती दिल्याचे दिसून आले आहे. या नऊ महिन्यांमध्ये देशांतर्गत गुंतवणुकीचे एक हजार 486 प्रस्ताव प्राप्त झाले असून, पैकी 92 प्रस्तावांनी कर्नाटकला पसंती दिली आहे. याचाच अर्थ येणाऱ्या एकूण प्रकल्पांपैकी बड्या प्रकल्पांचे प्रमाणही कर्नाटकात अधिक असल्याचे दिसून आले आहे. 1 या प्रस्तावांमध्ये 240 कोटी रुपयांचा जेएसडब्ल्यू सोलर प्रोजेक्ट', 100 कर्नाटक राज्य कोटी रुपयांचा 'एमके ॲग्रोटेक'चा प्रकल्प, मैनी समूहाचे अनेक प्रस्ताव, एसके स्टीलचा पोलाद प्रकल्प, अल्ट्राटेक आणि अदानी सिमेंटच्या प्रत्येकी एका प्रकल्पाचा समावेश आहे.
- गुजरातमध्ये (347) सध्या कर्नाटकच्या तुलनेत चौपट, तर महाराष्ट्रात 275 प्रकल्प प्रस्तावित आहेत. एकूण प्रकल्पांचा विचार करता गुजरातमध्ये एकूण 59 हजार 89 कोटी रुपयांचे तर, महाराष्ट्रात 46 हजार 428. कोटी रुपयांचे प्रकल्प प्रस्तावित आहेत. गेल्या दोन महिन्यांमध्ये कर्नाटकमध्ये एअरोस्पेस, लोह, पोलाद, फार्मा, वाहन उद्योग, वस्त्रोद्योग, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांनी 23 प्रस्ताव केले आहेत.

**पहिल्या नऊ महिन्यांतील गुंतवणूक**

| राज्य | प्रकल्पांची संख्या | प्रस्तावित गुंतवणूक (कोटी रूपयांत) |
|---|---|---|
| कर्नाटक | 92 | 83236 |
| गुजरात | 347 | 59,089 |
| महाराष्ट्र | 275 | 46,428 |
| राजस्थान | 65 | 35,192 |
| मध्य प्रदेश | 99 | 22,288 |
| अन्य राज्ये | 608 | 92,334 |
| देशभरात | 1486 | 3,38,567 |

(स्रोत : केंद्रीय वाणिज्य मंत्रालय)



# Right To Privacy



## चर्चेत असण्याचे कारण?

देशात सन 2014 मध्ये सत्ता पालट होऊन एनडीए सरकार सत्तेवर आले असून या सरकारने सन 2014 पासून आधार कार्डला अनिवार्य बनवून हे प्रत्येक सामाजिक कल्याणकारी योजनांचा फायदा घेण्यासाठी अनिवार्य केले होते. यावेळेसच लोकांनी सरकारच्या या धोरणाला विरोध दर्शवून या विरोधात न्यायालयामध्ये दाद मागितली होती. या वेळेसच खासगी अधिकाराविषयीची चर्चा सुरु झाली असून या संबंधी ठोस उपाययोजना करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने सन 2015 मध्ये एक घटनापीठ स्थापन करण्याचे निर्देश दिले.

## घटनापीठाविषयी :

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार स्थापन झालेल्या 9 सदस्यी घटनापीठाने काही दिवसांपूर्वी आपला निर्णय सर्वोच्च न्यायालयाला सादर केला होता. सर्वोच्च न्यायालयाने 24 ऑगस्ट 2017 ला दिलेल्या निर्णयात असे म्हटले की, खासगीपणाचा अधिकार हा मूलभूत अधिकार असून हा अधिकार कलम 21 अंतर्गत येणाऱ्या गरिमापूर्ण जीवन जगण्याच्या हक्काचाच एक भाग आहे.

यासाठी सर्वोच्च न्यायालयाने 9 सदस्यीय घटना पीठ बसवली असून यामध्ये खालील न्यायामुर्तींचा समावेश होता.–

1. **जे.एस.खेहर (अध्यक्ष) सरन्यायाधीश**
2. **जस्टीस चमलेश्वर**
3. **आर.के.अग्रवाल**
4. **एस.ए.बोबडे**
5. **ए.एम.सापरे**
6. **आर.एम.नरिमन**
7. **जी.वाय.चंद्रचूड**
8. **संजय किसन कौल**
9. **एस.अब्दुल नजीर**



## मूलभूत अधिकाराविषयी :

**उद्देश –** व्यक्तीचा आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकास करून न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता लोकशाही मूल्यांची जोपासना करणे. भारतीय संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकास काही मूलभूत अधिकार प्रदान केले असून या अधिकारांना व्यक्तींच्या विकासासाठी महत्त्वाचे मानले जाते. भारतीय संविधानानुसार नागरिकांना पुढील प्रकारचे अधिकार प्रदान करण्यात येतात.



**अभिजित राठोड**

| | |
|---|---|
| समानतेचा अधिकारी | स्वातंत्र्याचा अधिकार : |
| शोषणाविरुद्धचा अधिकार | धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार |
| संस्कृती तसेच शिक्षणाचा अधिकार | घटनात्मक उपाय करण्याचा अधिकार |
| खासगीपणाचा अधिकार | |

## खासगीपणासंबंधातील इतिहास–

सन 1895 मध्ये सर्वप्रथम खासगीपणाबाबतच्या अधिकाराविषयीची गोष्ट समोर आली. यावेळी एक विधेयक तयार करण्यात आले असून या विधेयकामध्ये असे म्हणण्यात आले होत की, सरकार कुठल्याही ठोस कारणाशिवाय व्यक्तीच्या खासगी अधिकारावर बंधन आणू शकत नाही.

## या अधिकारासंबंधी महापुरुषांचे मते :

त्यानंतर अशाच प्रकारचा एक मुद्दा सन 1925 मध्ये प्रकर्षाने समोर आला. यावेळी एक समिती नियुक्त करण्यात आली होती. यावेळी या समितीचे सदस्य म्हणून स्वतः महात्मा गांधी यांनी हे काम पाहिजे. या समितीचे नाव – कॉमनवेल्थ ऑफ इंडिया बील असे असून महात्मा गांधी यांनी यावेळी व्यक्तीला खासगीपणाचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे मत मांडले. यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मत बघितल्यास भारत स्वातंत्र्याच्यावेळी प्रत्येक व्यक्तीस त्याच्या खासगीपणाचा अधिकार असल्याचे मौल्यवान मत यांच्याकडून मांडल्या गेले. त्याचप्रमाणे व्यक्तीच्या खासगी अधिकारांतर्गत सरकारला काही चौकशी करायची असल्यास अशी चौकशी न्यायमंडळाच्या देखरेखीखाली झाली पाहिजे असेही मत यांनी मांडले. अरुण जेटली यांनी मार्च 2016 मध्ये आधार विधेयकाच्या वादविवादाच्या संबंधी खासगी अधिकार हा राज्यघटनेच्या कलम 21 अंतर्गत येणाऱ्या गरिमापूर्ण जीवन जगण्याच्या हक्काशी संबंधीत असल्याचे मत मांडले होते.

## खासगीपणाच्या अधिकाराविषयी :

भारतीय संविधानातील भाग 3 मध्ये कलम 12 ते 35 पर्यंत प्रत्येक नागरिकास दिलेल्या मूलभूत अधिकारांचा उल्लेख केलेला असून

हे अधिकार सर्व भारतीय नागरिकांना स्वतःचा आर्थिक, सामाजिक तसेच सांस्कृतीक विकास करण्यासाठी वापरता येतात. हे मूलभूत अधिकार कुठल्याही ठोस कारणास्तव कुठलिही सरकारी यंत्रणा/संस्था/अधिकारी हिरावून घेवू शकत नाही. याच अधिकारांमध्ये खासगी अधिकाराविषयी उल्लेख मिळत असून असा उल्लेख कलम 21 मध्ये अंतभूत आहे.

## कलम 21 विषयी :

कुठल्याही भारतीय नागरिकास त्याच्या गरिमापूर्ण जीवन जगण्याच्या संबंध असणाऱ्या हक्कास त्याच्यापासून दूर करता येत नाही. कारण कलम 21 हे Right to Life and Personal Liberty यासंबंधी आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीस तिचे जिवीत व व्यक्तीगत स्वातंत्र्य यापासून वंचीत करता येणार नाही.

न्यायालयाने कलम 21 मध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो असे सांगितले–

1. प्रतिष्ठेसह जीवन जगण्याचा अधिकार
2. स्वच्छ पर्यावरण–प्रदुषण रहीत जल आणि हवेमध्ये जगण्याचा अधिकार
3. जीवन रक्षणाचा अधिकार
4. आरोग्याचा अधिकार
5. खाजगी स्वातंत्र्याचा अधिकार
6. आश्रय घेण्याचे स्वातंत्र्य
7. 14 वर्षापर्यंत मोफत शिक्षणाचा अधिकार
8. मोफत कायेदशीर सहाय्य मिळविण्याचा हक्क
9. त्वरीत न्यायाचा अधिकार
10. कारावासात एकटे राहण्याविरुद्धचा अधिकार (अंधार कोठडी विरुद्धचाअधिकार)
11. मानवी प्रतिष्ठेला धोका पोहोचेल अशा व्यवहारा विरुद्धचा अधिकार
12. हातकडी लावण्याविरुद्धचा अधिकार
13. प्रतिष्ठेचा अधिकार
14. माहितीचा अधिकार
15. सार्वजनिक फाशी विरुद्धचा अधिकार
16. सुनवाईचा हक्क
17. कैद्यांच्या जीवनाच्या आवश्यकतांचा हक्क
18. निष्पक्ष सुनवाईचा हक्क
19. राज्याबाहेर जाण्याचा हक्क
20. सरकारी दवाखान्यात वेळेवर उपचाराचा हक्क
21. अतितातडीच्या वेळी चिकित्सा सुविधा मिळण्याचा हक्क
22. कोठडीतील शोषणाविरुद्धचा हक्क
23. बेठबिगारी विरुद्धचा हक्क
24. परदेशात जाण्याचा हक्क
25. उशिरा फाशी देण्याविरुद्धचा हक्क
26. महिलांबरोबर आदर आणि सन्मान पूर्वक व्यवहाराचा अधिकार

न्यायालयाने खासगीपणाचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे असा निर्णय दिल्यामुळे पुढील प्रकारचे मुद्दे उपस्थित होतात.

## कलम 377 :

खासगीपणाला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिल्यामुळे भारतीय दंड विधान संहितेतील कलम 377 ला आव्हान मिळणार आहे. कारण या कलमानुसार समलैंगिकता गुन्हा माणण्यात येतो. मात्र न्यायालयाच्या खासगीपणाबाबतच्या अधिकारावर दिलेल्या निर्णयामुळे कुणाला घराम ध्ये प्रवेश द्यायचा हा त्या व्यक्तीचा अधिकार आहे. त्यामुळे तो घरामध्ये कोणत्याही नातेसंबंधात जगू शकतो.घराच्या खासगीपणामध्ये कुटुंब, विवाह, संतती, लैंगिक भावना या सर्वांना या अधिकाराच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले आहे.

## इच्छा मरण :

खासगीपणाला मूलभूत अधिकाराचा दर्जा मिळाल्यामुळे इच्छा मरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. अर्थात व्यक्तीचे आयुष्य हे खासगीपणाच्या अधिकारात येणारा मुद्दा असला तरी अद्यापही न्यायालयाने इच्छा मरणाची परवानगी मान्य केलेली नाही. इच्छा मरण हे भारतीय न्याय व्यवस्थेसमोरील एक किचकट प्रश्न असून भविष्यात या अधिकाराच्या अंतर्गत यावर काय निर्णय घेतला जातो हे महत्त्वाचे.

गर्भपाताचा अधिकार–

एखाद्या महिलेने आपत्त्यास जन्म द्यावा की नाही याचा तिला अधिकार असेल त्यामुळे महिलांच्या गर्भपात करण्यासंबंधीचे नियम शिथिल होण्याची शक्यता आहे.

## बीफ कायदा–

मुंबई उच्च न्यायालयाने सन 2015 मध्ये सरकार व्यक्तींच्या खासगीपणामध्ये प्रवेश करून बीफ आहे की नाही याचा शोध घेवू शकत नाही असा निर्णय दिला होता. यावेळी महाराष्ट्र सरकारने मुख्यतः खासगीपणाचा अधिकार मूलभूत अधिकारामध्ये समाविष्ट नसल्याचे मत मांडले होते. परंतु सध्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार सरकारला व्यक्तीच्या घरामध्ये थेट घुसता येणार नाही.

न्या. चेलमेश्वर यांनी व्यक्त केलेल्या मतानुसार कुणी काय खावे, काय खावू नये, कोणता पोशाख वापरावा, कोणती विचारधारा स्विकारावी हे सरकारने सांगणे कोणालाही आवडणार यामुळे सरकारचे बीफ संबंधीचे नियम शिथिल होण्याची शक्यता दिसून येते.

## खासगीपणाच्या अधिकारासंबंधातील यापूर्वीचे खटले :

### एस.पी.शर्मा विरुद्ध सतीशचंद्र (1954) :

मेसर्स दालमिया जैन एअरवेज गैर मार्गाचा अवलंब करत आहे या बाबतचा प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात आला त्यानंतर न्याय दंडाधिकाऱ्यांनी त्याचा निकाल लावण्यासाठी तपास करण्याचे निर्देश दिले. तेव्हा कंपनीने या निर्देशाला आव्हान देण्यासाठी रिट अर्ज दाखल करून यामुळे आमच्या कंपनीचे मालमत्ता मिळवणे, ताब्यात ठेवणे तसेच त्याची विल्हेवाट लावणे या अधिकाराचे उल्लंघन होत असल्याची भूमिका मांडली.

त्यावेळी आठ न्यायाधीशांच्या खंडपीठाने मालमत्ता मिळवणे हा गोपनियतेचा अधिकार नाही असा निर्णय दिला.

## खडकसिंग विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार (1962) :

खडकसिंग हा उत्तरप्रदेशातील कुख्यात गुंड असून डाकूगिरी केल्याच्या आरोपातून पुरेशा पुराव्या अभावी खडकसिंग सुटला तरी पोलीसांची त्यावर पाळत होती. या पाळतीने खडकसिंग यांनी राज्यघटनेने हमी दिलेल्या मूलभूत अधिकारांवर गदा येत असल्याचा दावा न्यायालयात केला.

यावर न्यायालयाने गोपनियतेचा अधिकार हा राज्यघटने नाही असा निकाला दिला.

## गोविंद विरुद्ध मध्य प्रदेश सरकार (1975) :

वरील प्रमाणे याही खटल्याने पोलीसांकडून गोविंद यांच्यावर पाळत ठेवली जात असल्याने त्यांनीही राज्यघटनेतील मूलभूत अधिकारांचा उल्लेख करत या मूलभूत अधिकारांवर गदा येत असल्याचे आव्हान न्यायालयात केले.

यावेळी न्यायालयाने यांचे आव्हान फेटाळून लावले.

## मेनका गांधी विरुद्ध भारत सरकार (1977) :

सन 1977 मध्ये आणीबाणी संपल्यानंतर मेनका गांधी यांना सार्वजनिक हितासाठी तुमचे पारपत्र जप्त करण्यात येत असल्याचे सरकारकडून कळवण्यात आले यावेळी त्यांनी परदेशात प्रवासाला जाणे हा राज्यघटनेने कलम 21 अन्वये दिलेल्य व्यक्तीगत स्वातंत्र्याचा भाग असल्याचा दावा केला.

तेव्हा सात न्यायाधीशांच्या पीठाने गोपनियतेचा हक्का हा व्यक्तीगत स्वातंत्र्याशी निगडीत असल्याचे मात मांडले.

## राजगोपाल विरुद्ध तामिळनाडू सरकार (1995) :

राजगोपाल यांना सहा जणांचा खून केल्याप्रकरणी मद्रासच्या तुरुगांत शिक्षा झाली होती. या शिक्षेदरम्यान राजगोपाल यांना स्वतः चे आत्मचरित्र प्रकाशित करायचे होते त्यावेळी त्यांनी आपल्या आत्मचरित्र्यात काही आयपीएस अधिकाऱ्यांचा नावानिशी उल्लेख केला होता. या कारणास्त त्याचे हे प्रकाशन रद्द करण्यात आले होते.

यावेळी त्यांनी आपल्या गोपनियतेच्या अधिकाराचे उल्लंघन होत असल्याचे मत मांडले.

## आर.सुकण्या विरुद्ध आर.श्रीधर (2004) :

सुकण्या आणि श्रीधर या दोघांमध्ये वैवाहिक वाद असल्यामुळे यावर त्यांची न्यायालयात सुनावणी सुरु होती. ही सुनावणी वार्तांकन प्रसिद्धीला मनाई करावी या संबंधातील माहिती इतरांना देवू नये अशी मागणी करणारा अर्ज सुकण्याकडून करण्यात आला.


न्यायालयाने हा अर्ज फेटाळला पण उच्च न्यायालयाने तो मान्य करून इन कॅमेरा सुनावणिचा आदेश दिला.

कारण न्यायालयाच्या निर्णयानुसार घटस्फोटाच्या खटल्यात गोपनियतेचा अधिकार हा बातम्या प्रसिद्धीच्या अधिकारापेक्षा वरचढ ठरतो.

## टाटा खटला (2013) :

टाटा यांच्याकडून निरा राडीया यांच्याबरोबर झालेला व्यक्तीगत संवाद हा आपल्या व्यक्तीगत गोपनीयतेचा भाग असल्यामुळे त्याला प्रसिद्धी देवू नये असा दावा करण्यात आला.

***(लेखक संरक्षण पत्रकार, यारी इंटरनॅशनलचे सदस्य तसेच राज्यशास्त्र व राज्यव्यवस्थाचे अभ्यासक आहेत.)***



# विभाग 9

# लेटेस्ट व परीक्षाभिमुख योजना



## आयुष्यमान भारत योजना



- **प्रस्तावना : आयुष्यमान भारत योजनेचा शुभारंभ 23 सप्टेंबर 2018 रोजी झारखंडच्या रांची येथून पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते झाली.**
- **योजनेची घोषणा :** भारताचे पंतप्रधान यांनी 15 ऑगस्ट 2018 रोजी या योजनेची घोषणा केली होती.
- या योजनेमुळे जवळपास 50 कोटी भारतीयांना फायदा होणार आहे. जगातील सर्वांत मोठी जनयोजना आहे. या योजनेसाठी महाराष्ट्रातील 84 लाख कुटुंबाची निवड करण्यात आली आहे.
- **पूर्ण नांव :** या योजनेचे पूर्ण नांव आयुष्यमान भारत : राष्ट्रीय आरोग्य संरक्षण अभियान (Ayushman Bharat - National Health Protection Mission - ABNHPM) असून या योजनेचे सुधारित नांव प्रधानमंत्री आरोग्य योजना आहे.
- अमेरिकेतील ओबामा केअर योजनेच्या धर्तीवर ही घोषणा भारतात सुरू करण्यात आली.
- **योजनेचे उद्दिष्टे :** या योजनेंतर्गत पात्र कुटुंबाला सामाजिक, आर्थिक व जातीय जनगणनेच्या माहितीवर आधारित गरीब व वंचित कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळवून देणे.
- योजनेची व्याप्ती : देशातील सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशातील सर्व जिल्ह्यामध्ये राबविली जाणार आहे.
- आयुष्यमान भारत योजनेसोबतच राज्य शासनाची सध्या सुरू असलेली महात्मा फुले जनआरोग्य योजना एकत्रित राबविण्यात येणार आहे.
- आयुष्यमान भारत योजनेची पहिली लाभार्थी हरिणायातील कर्नाल येथील रहिवासी कश्मीरा असून 19 दिवसांच्या मुलाने तिच्या आई-वडिलांना 9 हजार रूपये देण्यात आले.

## नारळ विकास योजना



- नारळ असे फळ आहे की, याचा कोणताही भाग वाया जात नाही. म्हणूनच शासनाने याकडे लक्ष दिले असून, यामध्ये विविधता व आधुनिकता आणण्यासाठी नारळ विकास योजना अमलात आणली आहे.
- ही योजना केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयामार्फत राबविण्यात येत असून नारळ विकास कोची यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. अगदी सुरूवातीला ही योजनेची सुरूवात ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर जिल्ह्यांत झाली. नारळाच्या लागवडीखालील क्षेत्रांत वाढ घडवून आणणे, एकात्मिक शेतीद्वारा हे नारळ बागांच्या उत्पादकतेत वाढ करणे, नारळ बियाणे/रोपे उत्पादनासाठी युनिट स्थापन करणे, लागवड साहित्याचे उत्पादन व वितरण, नारळाच्या प्रात्यक्षिक क्षेत्राची स्थापना करणे, सेंद्रिय व रासायनिक खताच्या बाबत माहिती देणे, असा उद्देश योजनेचा आहे.
- या योजनेसाठी नारळ विकास मंडळ, कोची यांच्याकडून 53 लाख 6 हजारांचा निधी मंजूर झाला. या योजनेची अंमलबजावणी संचालक, फलोत्पादन, कृषी आयुक्तालय, पुणे यांच्याकडून करण्यात येते. एक एकरात नारळाच्या 64 झाडांची लागवड करता येते.

## राष्ट्रीय स्वराज अभियान



- **प्रस्तावना :** 24 एप्रिल 2018 रोजी मध्य प्रदेशातील मंडला येथून या योजनेची सुरूवात करण्यता आली.
- शाश्वत विकास उद्दिष्टे गाठण्याच्या उद्देशाने ई-पंचायत मिशन मोड प्रकल्पांतर्गत ई-प्रशासन उपक्रम वाढविणे, पायाभूत सुविधा उभारणे आणि प्रशिक्षण देण्यावर भर देणारे हे पुनर्रचित केंद्र पुरस्कृत अभियान आहे.
- **ही योजना देशातील सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशामध्ये राबविण्यात येईल. तसेच राज्यघटनेतील भाग-9 बाहेरील, पंचायती नसणाऱ्या क्षेत्रांमधील, ग्रामीण स्थानिक शासन संस्थाही या योजनेमध्ये दोन्ही केंद्रीय व राज्य घटकांचा समावेश आहे.**
- केंद्रीय घटकामध्ये राष्ट्रीय स्तरावरील उपक्रम जसे की ; तंत्रविषयक साहाय्यासाठीचा राष्ट्रीय आराखडा, तर ई पंचायत मिशन मोड प्रकल्प आणि पंचायतींना प्रोत्साहन.
- राज्य घटकमध्ये पंचायत राज संस्थांची क्षमता वृद्धी.
- वित्त पुरवठ्याचे प्रमाण : या योजनेतील केंद्रीय घटकांसाठी केंद्र सरकार आर्थिक पाठबळ पुरवेल. राज्य घटकांसाठी केंद्र व राज्य यांचे वित्त पुरवठ्याचे प्रमाण 60:40 असेल. ईशान्येकडील राज्ये, डोंगराळ राज्ये यांसाठी यांसाठी हे प्रमाण 90:10 असे असेल, तर केंद्रशासित प्रदेशांसाठी केंद्राचा वाटा 100% राहील.

# स्वामीनाथन आयोग



## पार्श्वभूमी :

सध्या दिसून येत असलेली विविध शेतकरी संघटनेची आंदोलने आणि त्याबरोबरच शेतकरी संप या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर शेतकरी वर्ग हा रस्त्यावर उतरलेला दिसून येत आहे. यामुळे महाराष्ट्रात कृषी क्षेत्र पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या सर्व आंदोलकांची मागणी म्हणजे स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी ही आहे. कारण मोदी सरकारने सत्तेवर येताच तात्काळ स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन 2014 च्या निवडणुक जाहीर नाम्यात दिले होते. परंतु गेल्या काही दिवसांपासून या आयोगाच्या शिफारशींकडे सरकारचे दुर्लक्ष झाल्या कारणाने सध्या हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सर्वप्रथम असा प्रयत्न सन 1990 मध्ये तत्कालीन विश्वनाथ प्रतापसिंह सरकारने केला होता. त्या सरकारने मार्च 1990 मध्ये राष्ट्रीय कृषी धोरण निश्चितीसाठी एक स्थायी सल्लागार समिति शरद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली होती.

या समितीने आपला आराखडा सरकारला सादर केला परंतु सरकारने केलेल्या दुर्लक्षामुळे या संदर्भात कुठलेही पाऊल उचलण्यात आले नाहीत.

## स्वामीनाथन आयोगाविषयी :

या आयोगाची स्थापना तत्कालीन युपीए सरकारने केली असली तरी या आयोगाची मुळ कल्पना वाजपेयी सरकारची होती. 14 व्या लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर फेब्रुवारी 2004 मध्ये तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी आणि तत्कालीन कृषीमंत्री राजनाथ सिंह यांनी सोमपाल यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय कृषक आयोगाची स्थापना करण्याचे ठरवले होते. परंतु तत्कालीन लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपचा पराभव झाल्यामुळे कृषक आयोगाची कल्पना फोल ठरली. यावेळी या निवडणुकीमध्ये मनमोहनसिंग सरकार सत्तेवर आले होते त्यावेळी त्यांना शेतकरी आत्महत्येंचा प्रश्न ही एक मोठी समस्या भेडसावत होती. यास्तव त्यांनी 18 नोव्हेंबर 2004 रोजी ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ.स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय कृषक आयोगाची स्थापना केली.

**या वेळच्या आयोगात पुढील सदस्यांचा समावेश होता :**

| | |
|---|---|
| **अध्यक्ष :** | डॉ.एम.एस.स्वामीनाथन |
| **सदस्य सचिव :** | अतुल सिन्हा |
| **सदस्य :** | आर.बी.सिंह, वाय.सी.नंदा |
| **अंशकालिन सदस्य :** | जगदीश प्रधान, चंदा निंबरकर, डॉ.रमाकांत पितळे, अतुलकुमार अंजान |

अशा प्रकारचा आयोग स्थापन करण्याची ही पहिलीच वेळ असून कृषी क्षेत्रासंबंधी समस्यांवर तोडगा काढण्यासाठी यापूर्वी काही समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या व यांचा मुख्य उद्देश म्हणजे कृषी क्षेत्राची समस्या दूर करणे एवढाच होता.

जमीन फेरवाटप, पतपुरवठा, बाजारभाव इ. प्रकारच्या समस्या यांच्या केंद्रस्थानी नव्हत्या. त्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्येचे निराकरण करण्यास या समित्यांना पुरेपुर यश मिळाले नव्हते. स्वामीनाथन आयोगाने दोन वर्षांच्या कालावधीत राज्यभर विविध ठिकाणी बैठका घेवून शेतकऱ्यांचे प्रश्न जाणून घेतले तसेच या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी शेतकरी वर्ग, विविध शेतकरी संघटना, कृषी विद्यापीठांचे तज्ज्ञ इ. घटकांसोबत चर्चा केल्यानंतर या आयोगाने स्थापनेनंतर दोन वर्षांनी म्हणजेच ऑक्टोंबर 2006 मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला होता. सरकारने हा अहवाल काही दुरुस्त्यांसह 2007 मध्ये स्विकारला.

## स्वामीनाथन आयोगाची उद्दिष्ट्ये :

- अन्न सुरक्षा आणि पोषण यांसाठी नियोजन करणे.
- शेतमालाची गुणवत्ता आणि किंमत यांची जागतिक बाजाराशी सांगड घालणे व सक्षम बनविणे.
- कोरडवाहू व डोंगराळ भागातल्या शेतीसाठी उपाय योजना करणे.
- उत्पादन आणि नफ्याचे प्रमाण या निकषांवर शेतीची व्यवस्था निर्माण करणे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार देवून त्यांच्याकडून शेतीपूरक पर्यावरण आणि जीव संस्थांचे जनत आणि संवर्धन करणे.
- आंतरराष्ट्रीय बाजारात किंमतींच्या होणाऱ्या चढ-उतारामुळे होणाऱ्या आयातीचा परिणाम कमीत कमी प्रमाणात देशातील शेतीवर होईल अशी व्यवस्था/यंत्रणा निर्माण करणे.

- ग्रामीण भागातला थेट शेतीला होणाऱ्या पतपुरवठ्यात वाढ करणे.

**या उद्दिष्टांवर आयोगाने खालीलप्रकारे सुधारणा सुचविल्या:**

- बागायती जमिनीचा व वनक्षेत्राचा वापर उद्योगांसाठी करण्यास प्रतिबंध करणे.
- शेती खरेदी करताना कोण कशासाठी आणि किती प्रमाणात जमिन खरेदी करत आहे याचे नियमन करण्यासाठी सक्षम यंत्रणा/व्यवस्था उभारणे.
- गवताळ जमिनीवर चराईचे अधिकार आणि वनसंपत्ती संबंधीचे अधिकार आदिवासी आणि पशुपालकांना देणे.
- सिलिंगप्रमाणे अतिरिक्त आणि उपयोगात नसलेल्या जमिनींचे फेरवाटप करणे.
- पर्यावरण आणि खनिज संपत्ती यांच्या अभ्यासातून जमिनीच्या योग्य वापरासाठी एक केंद्रीय जमीन वापर समिती निर्माण करणे.

**स्वामीनाथन आयोगाने खालील घटकांविषयी काही उपाययोजना सुचविलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे :**

1. अन्न सुरक्षा, 2. शेतकरी आत्महत्या, 3. शेतकरी सक्षम ता, 4. सिंचनाची व्यवस्था, 5. रोजगाराची उपाययोजना, 6. जैव संसाधने

## 1. अन्न सुरक्षा संबंधातील उपाययोजना :

- सार्वजनिक अन्नधान्य वितरण व्यवस्थेत सुधारणा करणे.
- महिला बचत गटांच्या मदतीने पाणी बँक आणि कम्युनिटी फुड निर्माण करणे.
- सुक्ष्म पोषक द्रव्यांची भासणारी कमतरता भरून काढण्यासाठी उपाययोजना करणे.
- राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा मंजूर करून कामाच्या बदल्यात अन्न आणि रोजगार हमी योजना प्रभावीपणे राबविण्यावर भर द्यावा.
- पोषण आहार योजनेचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मदतीने नुतनीकरण करावे.
- लहान व मध्यम शेतकऱ्यांना उत्पादनाची गुणवत्ता तसेच नफा वाढवण्यासाठी व शेतमाल प्रक्रिया उद्योगांना स्थापन करण्यासाठी उत्तेजन देणे.

## 2. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीच्या उपाय योजना :

- राज्यस्तरीय शेतकरी आयोगाची स्थापना करणे.
- शेतकऱ्यांना करण्यात येणाऱ्या सुक्ष्म पतपुरवठा योजनांची पुनर्रचना करणे.
- सामाजिक सुरक्षा जाळे अधिकाधिक विस्तारीत करणे.
- जनजागृती मोहिम मोठ्या प्रमाणावर राबविणे. जेणेकरून आत्म हत्या करण्याची प्रवृत्ती किंवा लक्षण इतर माणसांना समजेल.
- उच्च गुणवत्तेच्या बियाणांचा आणि इतर पुरक बाबींचा योग्य वेळेला परवडेल अशा दरात आणि योग्य ठिकाणी पुरवठा करणे.
- कमी जोखमीचे आणि कमी किंमतीचे तंत्रज्ञान पुरवण्यात यावे जेणेकरून पिक हातातून गेले तरी किंवा पिकाचे नुकसान झालेले तरी होणारा तोटा मर्यादीत राहील.
- वृद्धांना आरोग्य विमा आणि इतर सुविधा पुरवायला सामाजिक सुरक्षा यंत्रणा सक्षम करावी.
- शेतकऱ्यांचा सहभाग असलेल्या शेतकरी आयोगाने सरकारी यंत्रणेचा त्वरीत प्रतिसाद शेतकऱ्यांच्या समस्या सोडवायला मि ळेल याची काळजी घेणे.
- योग्य दरात आरोग्य विमा उपलब्ध करून द्यावा तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थिती सुधारण्यात यावी व आत्महत्या बहुल क्षेत्रात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनला जास्त काम करायला लावणे आवश्यक आहे.
- शेतमालाच्या आयातीवर आयात शुल्क लावण्यासाठी त्वरीत उपाय योजना कराव्यात.
- शेतकऱ्यांना आवश्यक ती माहिती सहज उपलब्ध होण्यासाठी गावा गावात माहिती केंद्र स्थापन करावेत.
- पावसाचे पाणी साठवण्यासाठी आणि जलस्त्रोत पुनर्भरणाला उत्तेजन द्यावे तसेच पाणी वापर आणि वाटप नियोजन गाव पातळीवर करावे.
- प्रत्येक गावाला जल स्वराज्य मिळविणे आणि ग्रामसभा ह्या पाणी पंचायती म्हणुन काम करतील अशी व्यवस्था निर्माण करणे.
- जिरा किंवा तत्सम पिके जी कोरडवाहू भागात घेतली जातात अशा पिकांच्या बाजार भावावर नियंत्रण ठेवण्यासाठी यंत्रणा उभारावी व त्याचबरोबर किंमतीत होणारा चढ-उतार सोसण्यासाठी किंमत स्थिरीकरण निधी उभारावा.

## 3. शेतकरी सक्षमता :

- सिंचन, पाण्याचा निचरा, जमिनीचा पोत आणि गुणवत्ता, भुजल पातळी वाढवणे, जलस्त्रोत रक्षण, संशोधन आणि शेतमालाच्या वाहतूकीसाठी ग्रामीण रस्ते या शेतीशी निगडीत पायाभूत सुविधांमध्ये जास्तीत जास्त गुंतवणुक व्हावी.
- मातीची गुणवत्ता टिकून राहण्यासाठी मार्गदर्शन, लोकांना मातीची गुणवत्ता वाढविण्यासाठी तसेच पाण्याची शुद्धता व जैवविविधता टिकवण्यासाठी प्रवृत्त करणे.
- किमान आधारभूत किंमत अंमलबजावणीत सुधारणा करावी.
- शेतमालाच्या उत्पादन खर्चाच्या किमान 50% अधिक किमान आधारभूत किंमत असावी.
- विशिष्ट शेतमालाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचा गट/ संस्था उभाराव्यात जेणेकरून प्रक्रिया, मूल्यवर्धन, विक्री प्रभावी रितीने करणे शक्य होईल.



- कायदे बाजार असलेल्या 93 वस्तुंची सद्याची आणि संभावी किंमत समजण्यासाठी आणि त्याची माहिती व माहितीची विश्लेषण करण्यासाठी सक्षम यंत्रणा बाजारसमीत्यांच्या इलेक्टॉनिक नेटवर्कच्या माध्यमातुन उभी करण्यात यावी.

## 4. सिंचनाची व्यवस्था :

- देशामध्ये लागवडीखाली असलेले एकूण क्षेत्र 192 दशलक्ष हेक्टर्स असून त्यापैकी जवळपास 60% क्षेत्र कोरडवाहू आहे.
- याच क्षेत्रातून एकूण 45% उत्पादन होते.
- या सिंचनाच्या व्यवस्थेवर स्वामीनाथन आयोगाने काही उपाययोजना सुचविल्या त्या म्हणजे पावसाच्या पाण्याच्या जास्तीत जास्त वापर करून जलस्रोत पुनर्भरण सक्तीचे करणे.
- शेतकऱ्यांना शाश्वत आणि समान पाणी मिळण्यासाठी धोरणात्म क सुधारणा करणे.
- पंचवार्षिक योजनेत जास्तीत जास्त निधी सिंचनासाठी राखून ठेवून त्यातला जास्तीत जास्त वाटा हा लघुप्रकल्प आणि भू-जल पातळी वाढविण्यासाठी तसेच जमिनीमध्ये पाणी जिरविण्यासाठी करण्यात यावा.

## 5. रोजगार उपाययोजना :

- अर्थव्यवस्था वाढीचा वेग वाढविणे.
- अधिकाधिक रोजगार निर्मिती करू शकणाऱ्या उद्योगांना उत्तेजन देऊन या उद्योगांच्या वाढीसाठी पोषक धोरण राबविणे.
- शेतकऱ्यांना खर्च वजा जाता मिळणारे निव्वळ उत्पन्न नोकरदारांच्या बरोबरीच राहील यासाठी व्यवस्था निर्माण करणे.
- बिगर शेती उद्योगात रोजगार संधी जास्तीत जास्त उपलब्ध करणे.

## 6. जैव संसाधने :

- पारंपारिक वनांची वाढ करून त्यांची जपवणूक करणे.
- पशुपालन, मासेमारी यांच्या संशोधन, संगोपन व व्यवस्थापनास उत्तेजन देणे.
- आदिवासींचा जंगलात मध, डिंक तसेच औषधी वनस्पती गोळा करण्यासाठीचा जो हक्क आहे तो अबाधित राखणे त्यावर कुठल्याही प्रकारची गदा येणार नाही याकडे जाणीवपूर्वक लक्ष देणे.
- स्थानिक जातींच्या जनावरांची उत्पादकता वाढविणेबरोबरच देशी जातींच्या जनावरांची निर्यात वाढविण्यासाठी उपयुक्त असा पथदर्शी कार्यक्रम राबविणे.

## शिफारशी :

- शेतकऱ्याच्या उत्पादनाला नफ्यातील 50 टक्के वाटा मिळायला हवा.
- शेतकऱ्यांचे खर्च वजा जाऊन उत्पन्न सरकारी कर्मचऱ्याप्रमाणे असावे.
- शेतमालाचा हमीभाव उत्पादन खर्च वगळता 50 % असावा.
- शेतमालाची आधारभूत किमत लागू करण्याची पद्धत सुधारून गहू आणि इतर खाद्यान्न वगळता इतर पिकांना आधारभूत किंमत मिळायची व्यवस्था करावी.
- बाजाराच्या चढउतारापासून शेतकऱ्यांचे संरक्षण व्हावे म्हणून 'मूल्य स्थिरता निधी' ची स्थापना करावी.
- आंतरराष्ट्रीय बाजारातील किमतीच्या दुष्परिणाम पासून शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी इतर देशामधून येणाऱ्या शेतमालाला आयात कर लावावा.
- दुष्काळ व इतर आपत्तीपासून बचावासाठी 'कृषी आपत्कालीन निधी' ची स्थापना करावी.
- कृषी पतपुरवठा प्रणालीचा विस्तार करावा.
- पिक कर्जावरील व्याजाचा दर कमी करावा.
- हलाखीची स्थिती असेलेल्या क्षेत्रामध्ये ,नैसर्गिक आपत्ती वेळी,पूर्वस्थिती येईपर्यंत गैरसंस्थात्मक कर्जासाहित सर्व कर्जाची वसुली स्थगित करून त्यावरील व्याज माफ करावे
- संपूर्ण देशातील सर्व पिकांना कमीत कमी हप्त्यावर विमा संरक्षण मिळेल अशा रीतीने पिक विमा योजनेचा विस्तार व 'ग्रामीण विमा विकास निधी' ची स्थापना करावी.
- पिकांच्या नुकसानीचे मूल्यमापन करत असताना ब्लॉक (तालुका) च्या एवजी गाव हा घटक वापरून विमा संरक्षण द्यावे
- सामाजिक सुरक्षेचे जाळे निर्माण करून त्या अंतर्गत शेतकऱ्यांसाठी वृद्धावस्थेत आधार तसेच स्वास्थ्य विम्याची तरतूद करावी
- परवडणाऱ्या दरात बी-बियाणे व इतर यंत्रसामुग्री उपलब्ध करून द्यावी.
- संपूर्ण देशात प्रगत शेती व माती परीक्षण प्रयोगशाळेचे संचालन करावे.
- शेतीला कायम आणि सम प्रमाणात सिंचन आणि वीजपुरवठा व सिंचन व्यवस्थेत आमुलाग्र सुधारणा घडवून आणाव्यात.

**डॉ. विवेक दोडे**
परिविक्षाधिन उपजिल्हाधिकारी

विभाग 10

# विशेष संकिर्ण घडामोडी

पहिल्यावाल्या घटना

महत्त्वाचे दिनविशेष

चर्चेतील पुस्तके

समित्या व आयोग

संस्था, संघटना व परिषदा

केंद्रिय व राज्य मंत्रिमंडळ

आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक उच्चपदस्थ

भारतातील राज्यपाल व मुख्यमंत्री

## देशातील पहिल्यावाल्या घटना

- देशातील पहिले उर्जा संवर्धन धोरण तयार करणारे राज्य – **महाराष्ट्र**.
- देशातील पहिले अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना आदिवासी उपयोजनेंतर्गत पाच टक्के निधीचे थेट अनुदान देणारे राज्य – **महाराष्ट्र**.
- देशातील पहिले 'सक्षम' ऑनलाईन शिष्यवृत्ती व्यवस्थापन प्रणाली राबविणारे राज्य – **उत्तरप्रदेश.**
- देशातील पहिले मल्टी मॉडेल इलेक्ट्रिक वाहन प्रकल्प सुरू करणारे शहर – **नागपूर**.
- देशातील पहिले बांधकाम क्षेत्रासाठी प्राधिकरण स्थापन करणारे राज्य – **महाराष्ट्र**.
- देशातील पहिले महिलांमध्ये गर्भाशयाचे प्रत्यारोपन करणारे शहर – पुणे **महाराष्ट्र)** .
- देशातील पहिले स्वाईन फ्लूची मोफत लस देणारे राज्य – **महाराष्ट्र**.
- देशातील पहिले जीएसटी घटनादुरुस्तीला मान्यता देणारे राज्य – **आसाम**.
- देशातील पहिले मलजल व सांडपाणी धोरण राबविणारे राज्य – **राजस्थान**.
- देशातील पहिला बालमजुरीमुक्त जिल्हा – **मयुरगंज (उडिया)**
- देशातील पहिला कॅशलेस राज्य – **गोवा**.
- देशातील पहिले कॅशलेस शहर – **चंदीगड.**
- देशातील पहिला कॅशलेस केंद्रशासित प्रदेश – **चंदीगड**.
- देशातील पहिली कॅशलेस मेट्रो – **मुंबई मेट्रो**.
- देशातील पहिला कॅशलेस जिल्हा – **हेलाकंडी (आखात)**
- देशातील पहिले कॅशलेस गाव – **अकोदरा जिल्हा साबरकंठा, राज्य – गुजरात)**
- देशातील पहिले गुन्हेगारांना DNA आधारीत माहितीचे संकलन करून प्रोफाइल तयार करणारे राज्य – **आंध्रप्रदेश.**
- देशातील पहिली रेल्वे विद्यापीठ – **वडोदरा (बडोदा), गुजरात.**
- देशातील पहिले कायद्यानुसार सामाजिक बहिष्कार टाकणे गुन्हा ठरविणारे राज्य – **महाराष्ट्र**.
- देशातील पहिला नदीबेट जिल्हा – **माजुली (आसाम)**
- देशातील पहिले किटक संग्रहालय – **कोईम्बतूर (तामिळनाडू)**
- देशातील पहिले डिजिटल स्वाक्षरीत सातबारा देणारे पहिले राज्य – **महाराष्ट्र**
- देशातील पहिले तृतीयपंथियांना पोलीस दलात स्थान देणारे राज्य – **तमिळनाडू**.
- देशातील पहिली जागतिक गतिशिलता शिखर परिषद – **नवि दिल्ली**
- देशातील पहिल्या जनुकीय बँकेची स्थापना : **हैद्राबाद**
- देशातील पहिला जनगत रोबोड्रोन : **ट्यूना**
- देशातील पहिला रोबोटिक टेलिस्कोप : **लठाख**
- देशातील पहिली पेमेंट बँक – **एअरटेल पेमेंट बँक नवी दिल्ली)**
- देशातील पहिला आंतरराज्यीय नदीजोड प्रकल्प – **केन बेतवा उत्तरप्रदेश – मध्यप्रदेइ)**
- देशातील पहिल्या LNG (Liguitied Natural Gas) बसची सुरुवात होणारे शहर – **तिरुअनंतपुरम (केरळ)**
- देशातील पहिला कार्बन तटस्थ जिल्हा (Carbon Neutral District) - **माजूली**.
- देशातील पहिली सौर उर्जेवर चालणारी बस या राज्यात कार्यान्वित झाली – **केरळ.**
- देशातील पहिली युनिफाईड पेमेंट इन्टरफेस यंत्रणा (युपीआय) वापरणारी बँक – **ठाणे जनता बँक.**
- देशातील पहिले क्रीडा विद्यापीठ – **मणिपूर.**
- देशातील पहिले सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये सायबर पोलीस स्टेशन सुरू करणारे राज्य – **महाराष्ट्र.**
- देशातील पहिले योग व निसर्गोपचार पद्धतीला मान्यता देणारे राज्य – **पं. बंगाल (दुसरे – महाराष्ट्र)**
- देशातील पहिले केरोसिन थेट लाभ हस्तांतरण अंमलबजावणी करणारे राज्य – **झारखंड.**
- देशातील पहिले व्यावसायिक न्यायालय स्थापन करणारे राज्य – **छत्तीसगड.**
- देशातील पहिले स्वत:च्या अंतर्गत सुरक्षा कायद्याचा मसुदा तयार करणारे राज्य – **महाराष्ट्र.**
- देशातील पहिले ई–टॉयलेट निर्मितीचे गाव – **पूळूविला (तिरुअनंतपुरम)**
- देशातील पहिले CCTNS Crime and criminal Tracking Networks system) प्रणालीचा पूर्णत: अंमलबजावणी करणारे राज्य – **महाराष्ट्र.**
- देशातील पहिले भारत स्टेज 6 (BS-6) इंधन पूरवठा करणारे शहर – **दिल्ली.**
- देशातील पहिले उच्च शिक्षणात कौशल्य विकास कार्यक्रमाचा समावेश करणारे राज्य – **राजस्थान.**
- देशातील पहिले ई–पोस्टल मनपत्रिका वापरणारे राज्य – **गोवा.**
- देशातील पहिले डिजीटल राज्य – **केरळ.**
- देशातील पहिले हरीत विमानतळ – **कोची (दुसरे वडोदरा)**

# विभाग 11
# अंतिम सत्य स्पेशल
# परीक्षेला जाता जाता....





- **योगाचार्य विश्वासराव मंडलिक यांना पंतप्रधान पुरस्कार –** योगाची प्रगती आणि विकासासाठी दिलेल्या योगदानाबद्दल केंद्र सरकारने नाशिक येथील योगाचार्य विश्वासराव मंडलीक यांची पंतप्रधान पुरस्कारासाठी निवड केली आहे. योग विद्या धाम संस्थेमार्फत त्यांनी लाखो लोकांपर्यंत योगा पोहोचविला आहे. विविध गटात प्राप्त झालेल्या 186 नामांकनातून त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. चषक, प्रमाणपत्र आणि 25 लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.
- **सहावे व्यसनमुक्ती संम्मेलन 2018 –** सहावे राज्यस्तरीय व्यसनमुक्ती संम्मेलन 2018 बीड येथे आयोजित करण्यात आले होते. या सम्मेलनाचे उद्घाटन पंकजा मुंडे यांच्या हस्ते झाले. या सम्मेलनाचे अध्यक्ष महाराष्ट्र भूषण डॉ. अभय बंग यांनी भूषविले होते.
- **रुपश्री योजना –** मुलीच्या विवाहाला वित्तीय साहाय्य देण्यासाठी पं. बंगाल सरकारने 'रुपश्री योजना' सुरू केली आहे. या योजनेंतर्गत 18 वर्षाच्या मुलीला लग्नासाठी 25 हजार रुपये देण्यात येणार आहे.
- **21 वा विधी आयोग –** न्या. बी.एस. चौहान यांच्या अध्यक्षतेखाली 2015 ते 2018 या कालावधीसाठी 21 वा विधी आयोग स्थापन करण्यात आला. केंद्र सरकारकडून दर तीन वर्षांनी विधी आयोग स्थापन केला जातो. लॉड मेकॉलेच्या अध्यक्षतेखाली 1834 मध्ये पहिला विधी आयोग (स्वातंत्र्यानंतर 1955 अध्यक्ष – एम.सी. सेटलवाड) स्थापन करण्यात आला.
- **सुफल बांगला योजना –** राज्यातील भाजीपाला विक्रीसाठी सुफल बांगला योजना पं. बंगाल राज्याने सुरू केली आहे. त्यामुळे या योजनेतर्गत शेतकऱ्याकडून थेट भाजीपाला खरेदी केला जाणार आहे. यासाठी कोलकता येथे 21 खरेदी विक्री केंद्र सुरू केली आहेत.
- **राष्ट्रीय जल माहिती केंद्र –** 1 मे 2018 रोजी केंद्रीय जलस्त्रोत, नदीविकास व गंगा पुनरुज्जीवन मंत्रालयाने नवी दिल्ली येथे राष्ट्रीय जल माहिती केंद्राची स्थापना केली आहे. केंद्रीय सहसचिव दर्जाचा अधिकारी या केंद्राचा प्रमुख असणार आहे. देशभरातील जलस्त्रोतांची आकडेवारी व माहिती एकाची ठिकाणी संकलन करण्यासाठी तसेच जलसंवर्धनाच्या क्षेत्रात जनजागृती वाढविण्यासाठी या केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे.
- **उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ –** जळगाव येथील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव असा नामविस्तार करण्याचा निर्णय 3 मे 2018 रोजी करण्यात आला. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावची स्थापना 1989 करण्यात आली असून या विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुधीर मेश्राम हे आहेत.
- **फर्ग्युसन महाविद्यालयाला विद्यापीठाचा दर्जा –** फर्ग्युसन महाविद्यालय पुणेला विद्यापीठाचा दर्जा देण्यात आला आहे. राष्ट्रीय उच्च तर शिक्षा अभियान (रुसा) आणि विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) यांनी फर्ग्युसनला विद्यापीठाचा दर्जा देण्यास मान्यता दिली. देशभरातील तीन महाविद्यालयांना विद्यापीठाचा दर्जा देण्यात आला आहे. यापैकी बंगळूरुमधील दोन तर म हाराष्ट्रातून फर्ग्युसनची निवड करण्यात आली आहे.
- **सुखदेव थोरात यांना डॉ. आंबेडकर पुरस्कार –** जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांना मारवाडी फाऊंडेशन तर्फे देण्यात येणारा यंदाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार जाहीर करण्यात आला. 5 लाख रुपये या पुरस्काराचे स्वरुप आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर श्रद्धा ठेवून विविध क्षेत्रातील एका मान्यवर व्यक्तीला दरवर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. आतापर्यंत हा पुरस्कार डॉ. भालचंद्र मुणगेकर, डॉ. नरेंद्र जाधव, पद्मश्री नामदेव ठसाळ, रा. सू. गवई, डॉ. यशवंत मनोहर, शरद पवार यांना देण्यात आला आहे.
- **डॉ. अरविंद नातू यांना ऑर्डर ऑफ मेरीट सन्मान –** विज्ञान क्षेत्रातील आणि भारत–जर्मनी संबंध वृद्धिगत करण्यासाठी दिलेल्या योगदानाकरिता डॉ. अरविंद नातू यांना जर्मनीचा 'ऑर्डर ऑफ मेरीट' या सन्मानाने पुरस्कृत करण्यात आले.
- **फॉरच्यूनच्या यादीत तीन भारतीयांचा समावेश –** फॉरच्यून मासिकाने 2018 मधील जगातील सर्वात महान 50 नेत्याची यादी प्रसिद्ध केली यामध्ये इंदिरा जयसिंग (20), मुकेश अंबानी (24), व बाळकृष्ण दोशी (43) या तीन भारतीयांचा समावेश करण्यात आला.
- **राष्ट्रीय बौद्धिक संपदा पुरस्कार 2018 –** विज्ञान व औद्योगिक संशोधन परिषद (The Council of Scientific and Industrial Research - CSIR) या संस्थेला (स्थापना – 26 सप्टेंबर 1942) 2018 चा राष्ट्रीय बौद्धिक संपदा पुरस्कार (सुरुवात – 2009, स्वरुप – 1 लाख,) 26 एप्रिलला म्हणजेच जागतिक बौद्धिक संपदा दिनानिमित्त वितरीत करण्यात आले. पेटंट व व्यावसायिकरण क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट संस्था व श्रेणीअंतर्गत हा पुरस्कार देण्यात आला.
- **मुंबईला जागतिक शहरी संस्कृती मंचाचे सदस्यत्व बहाल –** मुंबई शहराला जागतिक शहरी संस्कृती मंचाचा (World Cities Culture Forum) सदस्य बनविण्यात आले आहे. हा बहूमान मिळणारे मुंबई शहर देशातील पहिले शहर ठरले आहे. जागतिक

# लोकराज्य आणि योजना मासिकावर आधारित अंतिम सत्य असलेले महाराष्ट्रातील पहिले पुस्तक




**मुल्य प्रत्येकी**
**₹ 80**

Also Available on
amazon CART1

SAIMkatta™
Student's Academic Improvement Movement

**पुस्तकांसाठी संपर्क :**
**9595382922**